ग्र. सं. होम
निबंध
४२५.

# सच्ची देशसेवा



CFBK-0005246

॥ राष्ट्रदेवो भव ॥

# काँग्रेसची देशसेवा

[ काँग्रेसनें गेल्या ५० वर्षांत केलेल्या कामगिरीचा वृत्तांत ]

५२४५

*If we do not speak they ( the British people ) say we are satisfied. If we speak we become agitators ! The Indian people are properly asked to act constitutionally, while the Government remains unconstitutional and despotic.*

ना. गोखले

REFBK-0005246

श्रीपाद शंकर नवरे, बी. ए.

किंमत ६ आणे

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. सं.
ता.

हे पुस्तक पांडुरंग महादेव भागवत यांनीं मौज प्रिन्टिंग ब्युरो,
खटाववाडी गिरगांव मुंबई येथें छापून प्रसिद्ध केले.

# बीजमंत्र

Sons of Ind, why sit ye idle,
Wait ye for some Deva's aid?
Buckle to, be up and doing !
Nations by themselves are made!

Yours the land, lives, all, at stake, tho'
Not by you the cards are played:
Are ye dumb? Speak up and claim them
By themselves are nations made!

What avail your wealth, your learning,
Empty titles, sordid trade?
True self-rule were worth them all!
Nations by themselves are made!

Whispered murmurs darkly creeping,
Hidden worms beneath the glade,
Not by such shall wrong be righted!
Nations by themselves are made!

कॉंग्रेसचे जनक
मि. ए. ओ. ह्यूम

# काँग्रेसचे मार्गदर्शक

| क्रम | वर्ष | स्थळ | अध्यक्ष | प्रतिनिधि संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | १८८५ | मुंबई | उमेशचंद्र बानर्जी | ७२ |
| २ | १८८६ | कलकत्ता | दादाभाई नौरोजी | ४३४ |
| ३ | १८८७ | मद्रास | बद्रुद्दिन तय्यबजी | ६०७ |
| ४ | १८८८ | अलाहाबाद | ज़ार्ज यूल | १२४८ |
| ५ | १८८९ | मुंबई | सर विल्यम वेडरबर्न | १८८९ |
| ६ | १८९० | कलकत्ता | फेरोजशहा मेहता | ६७७ |
| ७ | १८९१ | नागपूर | आनंदा चार्लू | ८१२ |
| ८ | १८९२ | अलाहाबाद | उमेशचंद्र बानर्जी | ६२५ |
| ९ | १८९३ | लाहोर | दादाभाई नौरोजी | ८६७ |
| १० | १८९४ | मद्रास | आल्फ्रेड वेब | ११६३ |
| ११ | १८९५ | पुणे | सुरेंद्रनाथ बानर्जी | १५८४ |
| १२ | १८९६ | कलकत्ता | एम्. आर. सयानी | ७८४ |
| १३ | १८९७ | उमरावती | शंकरन् नायर | ६९२ |
| १४ | १८९८ | मद्रास | आनंदमोहन बोस | ६१४ |
| १५ | १८९९ | लखनौ | रमेशचंद्र दत्त | ७४० |
| १६ | १९०० | लाहोर | ना. ग. चंदावरकर | ५६७ |
| १७ | १९०१ | कलकत्ता | दिनशा वाच्छा | ८९६ |
| १८ | १९०२ | अहमदाबाद | सुरेंद्रनाथ बानर्जी | ४७१ |
| १९ | १९०३ | मद्रास | लालमोहन घोस | ५३८ |
| २० | १९०४ | मुंबई | एच्. इ. ए. कॉटन | १०१० |
| २१ | १९०५ | बनारस | गो. कृ. गोखले | ७५८ |
| २२ | १९०६ | कलकत्ता | दादाभाई नौरोजी | १६६३ |
| २३ | १९०७ | सुरत ( मोडली ) | रासबिहारी घोस | १६०० |
| | १९०८ | मद्रास | रासबिहारी घोस | ६२६ |
| २४ | १९०९ | लाहोर | पं. मदनमोहन मालवीय | २४३ |
| २५ | १९१० | अलाहाबाद | सर विल्यम वेडरबर्न | ६३६ |
| २६ | १९११ | कलकत्ता | बिशन नारायण धार | ४४६ |
| २७ | १९१२ | बांकीपूर | रं. न. मुधोळकर | २०७ |

# कॉंग्रेसचे मार्गदर्शक

| क्रम | वर्ष | स्थळ | अध्यक्ष | प्रतिनिधि संख्या |
|---|---|---|---|---|
| २८ | १९१३ | कराची | नबाब सय्यद महमद | ५५० |
| २९ | १९१४ | मद्रास | भूपेंद्रनाथ बसु | ८६६ |
| ३० | १९१५ | मुंबई | सत्यप्रसन्न सिंह | २२५९ |
| ३१ | १९१६ | लखनौ | अंबिकाचरण मुजुमदार | २३०१ |
| ३२ | १९१७ | कलकत्ता | डॉ. ॲनी बेझंट | ४९६७ |
| | १९१८ | मुंबई ( खास ) | सय्यद हसन इमाम | ३५०० |
| ३३ | १९१८ | दिल्ली | [लो.टिळक नियुक्त अध्यक्ष]<br>पं. म. मो. मालवीय | ४८६९ |
| ३४ | १९१९ | अमृतसर | पं. मोतीलाल नेहरू | ७०३१ |
| | १९२० | कलकत्ता ( खास ) | लाला लजपतराय | —— |
| ३५ | १९२० | नागपूर | सी. विजय राघवाचार्य | १४५८३ |
| ३६ | १९२१ | अहमदाबाद | हकीम अजमलखान | ४७२६ |
| ३७ | १९२२ | गया | चित्तरंजन दास | ३२४८ |
| | १९२३ | दिल्ली ( खास ) | अबुलकलम अझाद | —— |
| ३८ | १९२३ | कोकोनाडा | मौ. महमदअली | ६१८८ |
| ३९ | १९२४ | बेळगांव | म. गांधी | १८४४ |
| ४० | १९२५ | कानपूर | श्री. सरोजिनी नायडू | २६८८ |
| ४१ | १९२६ | गोहत्ती | श्रीनिवास अय्यंगार | ३००० |
| ४२ | १९२७ | मद्रास | एम्. ए. अन्सारी | २६९४ |
| ४३ | १९२८ | कलकत्ता | पं. मोतीलाल नेहरू | ५२२१ |
| ४४ | १९२९ | लाहोर | पं. जवाहरलाल नेहरू | ३५०० |
| ४५ | १९३१ | कराची | वल्लभभाई पटेल | |
| ४६ | १९३२ | दिल्ली– बंदी असतां | रणछोडदास अमृत[illegible] | |
| ४७ | १९३३ | कलकत्ता ,, ,, | श्रीमती निली[illegible] | |
| ४८ | १९३४ | मुंबइ | बाबू राजेंद्र[illegible] | |

कायदेभंगाचे चळवळीमुळें १९३० सालीं २

# प्रास्ताविक

कॉंग्रेस–सुवर्ण–महोत्सवाच्या निमित्तानें ‘ प्रभात ’ दैनिकाकरितां कॉंग्रेस-विषयक लिहिलेले लेख पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्यांत येत आहेत. हें पुस्तक म्हणजे कॉंग्रेसचा ५० वर्षांचा कालानुक्रमानें संगतवार आणि सविस्तर लिहिलेला इतिहास नव्हे. तसा इतिहास कॉंग्रेसच्या वतीनें आजच प्रसिद्ध होत आहे. कॉंग्रेसनें पन्नास वर्षांत केलेल्या कार्यांची विषयवारीनें अगदीं थोडक्यांत माहिती देण्याचा येथें प्रयत्न केला आहे. अर्थात कालानुक्रमानें लिहिलेल्या इतिहासाप्रमाणें यालाहि स्वतंत्र महत्त्व आहेच.

कॉंग्रेसशीं संबद्ध असलेल्या अशाच आणखी विषयांची माहिती संकलित करून पुस्तक वाढवितां आलें असतें. त्याप्रमाणें ‘ प्रभात ’ पत्रांतून आणखी थोडे विषय जाहीरहि केले होते. पण पुस्तकाची आगाऊ ठरलेली मर्यादा संपली व कॉंग्रेसच्या महोत्सवाचा दिवसहि उजाडला. महोत्सवाच्या वेळींच पुस्तक प्रसिद्ध करण्यामध्यें औचित्य असल्यामुळें हात आखडता घ्यावा लागला. तथापि मुख्य मुख्य विषय यामध्यें येऊन गेले असल्यामुळें फारशी हानी झालेली नाहीं.

‘ प्रभात ’ दैनिकामध्यें रोज एक याप्रमाणें १५ डिसेंबरपासून २८ डिसेंबरपर्यंत हे लेख प्रसिद्ध झालेले आहेत. “कॉंग्रेस व परराष्ट्रीय चळवळ” हा लेख ता. २७–१२–३५ च्या ‘ केसरी ’त व “ कॉंग्रेसच्या इतिहासांतील मौजा ” हें प्रकरण २५–१२–३५ च्या ‘ मौज ’ पत्रांत प्रसिद्ध झालें होतें. ‘कॉंग्रेस व संस्थानें’ हा लेख नागपूरच्या ‘महाराष्ट्रा’चे सहसंपादक श्री. दत्तात्रय पुरुषोत्तम भागवत यांनीं स्वयंस्फूर्तीनें पाठवून दिला. विषयांच्या पूर्ततेसाठीं त्याचाहि याच संग्रहांत समावेश केला आहे.

'प्रभात' करितां हे लेख लिहावयाचें अगदीं आयत्या वेळीं ठरलें. त्यामुळें हाताशीं असलेल्या साधनसामुग्रीवरच निभावून न्यावें लागलें. तथापि डॉ. ॲनि बेझंट यांच्या " How India Wrought for Freedom " व बाबू अंबिकाचरण मुजुमदार यांच्या "Indian National Evolution " या दोन पुस्तकांचा विशेष उपयोग झालेला आहे हें येथें नमूद केलें पाहिजे. कॉंग्रेसतर्फे आजच प्रसिद्ध होत असलेला अधिकृत इतिहास अर्थातच लेखकाच्या डोळ्यासमोर नव्हता.

पुस्तक करतांना 'प्रभात' मधील लेखांमध्यें कांहीं ठिकाणीं भर घातली आहे. विषयवार इतिहास देतांना मधून मधून लेखकाच्या विशिष्ट विचारांचें प्रतिबिंब त्यांवर पडणें अपरिहार्य आहे. विषयांचा अनुक्रम अमुकच पद्धतीनें कां लावला, या प्रश्नाला 'लेखकाची सोय' या खेरीज दुसरें उत्तर नाहीं.

'प्रभात' कचेरी
गिरगांव, मुंबई.
( २८-१२-३५ )

श्री. शं. नवरे

# अनुक्रम


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | कॉंग्रेसचा जन्म ... ... ... ... | १ |
| २ | कॉंग्रेसचें ध्येय ... ... ... ... | ७ |
| ३ | कॉंग्रेस व राष्ट्रीय एकीकरण ... ... | १२ |
| ४ | कॉंग्रेस व महाराष्ट्र ... ... ... | १९ |
| ५ | कॉंग्रेस व सरकार ... ... ... | २७ |
| ६ | कॉंग्रेसची घटना ... ... ... | ३५ |
| ७ | कॉंग्रेस व मुसलमान ... ... ... | ४३ |
| ८ | कॉंग्रेस व औद्योगिक सुधारणा ... ... | ५१ |
| ९ | कॉंग्रेस व शेतकरी-कामकरी ... ... | ५७ |
| १० | कॉंग्रेस व कौन्सिलें ... ... ... | ६२ |
| ११ | कॉंग्रेसच्या इतिहासांतील मौजा ... ... | ७० |
| १२ | कॉंग्रेस व परराष्ट्रीय चळवळ ... ... | ७७ |
| १३ | कॉंग्रेस व राष्ट्रभाषा ... ... ... | ८३ |
| १४ | कॉंग्रेसचें यश ... ... ... | ८७ |
| १५ | कॉंग्रेस व संस्थानें ... ... ... | ९३ |
| १६ | कॉंग्रेस व राष्ट्रीय शिक्षण ... ... ... | ९९ |

नि. नं. ६६८
३३८

# कॉंग्रेसचा जन्म

ता. २८ डिसेंबर १८८५ सालीं दुपारीं बरोबर १२ वाजतां मुंबई येथें गोवालिया तलावाजवळील गोकुळदास तेजपाळ संस्कृत कॉलेजच्या भव्य दिवाणखान्यांत कॉंग्रेसचा जन्म झाला. हा जन्मकाल लक्षांत घेऊन कॉंग्रेसची कुंडली कोणीं बनविल्याचें पहाण्यांत नाहीं. तथापि अजूनहि तसा कोणी प्रयत्न केल्यास तो मनोरंजक होईल यांत शंका नाहीं. कुंडली वर्तविण्या-एवढी ही संस्था पुढें महत्त्वाची ठरेल, असें त्या वेळीं कोणालाही वाटलें नसेल व म्हणून तसे प्रयत्न झाले नसतील.

कॉंग्रेसची कल्पना मूळ कोणाच्या डोक्यांत आणि कशी उदय पावली, हें सांगणें फार कठीण आहे. नदीच्या मुळाएवढेंच तें काम अवघड आहे. जमिनीच्या पोटांतून अनेक दिशांकडून झिरपणारें पाणी कोठें तरी एकत्र होऊन दृश्य स्वरूपांत त्याचा ओघ बनतो व मगच त्याला ' नदीचा उगम ' हें नांव मिळतें. त्याप्रमाणेंच कॉंग्रेससारख्या अखिल भारतीय संस्थेचेंही होणें शक्य आहे. एकादा पुरुष मोठेपणाला चढला म्हणजे त्याच्याशीं बादरायणसंबंध जोडून आपलाही मोठेपणा मिरविण्याचा पुष्कळांकडून प्रयत्न होतो. कोणी म्हणतो ते व आम्ही एकाच घराण्यांतले, कोणी म्हणतो तो माझा शिष्य होता, कोणी म्हणतो. तो व मी एकाच वेळीं कॉलेजांत शिकत होतों, तर कोणी म्हणतो, तो व मी कांहीं दिवस एकाच खानावळींत जेवलेले आहों ! कॉंग्रेस महत्वाला चढल्यावर तिच्या जन्माशीं कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारें आपला संबंध नेऊन पोंचविण्याचा कांहीं प्रांतांतील लोकांकडून असा प्रयत्न करण्यांत आलेला आहे.

कोणत्याहि कार्याला तत्कालिक आणि दूरचीं अशीं दोन प्रकारचीं कारणें असूं शकतात. कॉंग्रेसच्या बाबतींत तत्कालिक कारण म्हणजे इ.स.१८८४ सालीं डिसेंबर महिन्यांत मद्रास येथें थिऑसफिस्ट लोकांची भरलेली परिषद होय. ही परिषद भरल्यानंतर दि. ब. रघुनाथराव यांच्या घरीं निरनिराळ्या प्रांतांतून आलेले सतरा लोक जमले होते. या १७ लोकांची नामावली सुदैवानें आज उपलब्ध आहे, ती अशी—

## मद्रास

ना. एस. सुब्रह्मण्य अय्यर, श्री. पी. रंगय्या नायडू व श्री. पी. आनंदा चार्लू

## बंगाल

बाबू नरेंद्रनाथसेन, बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी, बाबू चारुचंद्र मित्र व बाबू एम्. घोस.

## मुंबई

ना. विश्वनाथ नारायण मंडलिक, श्री. काशिनाथ त्रिंबक तेलंग, श्री. दादाभाई नौरोजी, श्री. विजयरंग मुदलीयार व पांडुरंग गोपाळ.

## संयुक्त प्रांत

श्री. हरिश्चंद्र, सरदार दयाळसिंग, श्री. काशीप्रसाद, पं. लक्ष्मी-नारायण व श्री. श्रीराम.

या १७ पुढाऱ्यांच्या मध्यें झालेल्या खलबताचें पर्यवसान म्हणून पुढील डिसेंबर महिन्यांत नाताळच्या सुटींत पुणें मुक्कामीं देशांतील सर्व प्रांताच्या प्रतिनिधींची एक परिषद बोलाविण्याचें ठरलें. 'इंडियन नॅशनल यूनियन'ची परिषद असें तिला नांव देण्यात आलें होतें. अर्थात कॉंग्रेस हें नांव मागाहून रूढींत आलें.

## पहिली निमंत्रणपत्रिका

या परिषदेकरितां जी निमंत्रणपत्रिका काढण्यांत आली होती तींत असें म्हटलें होतें कीं ता. २५ पासून ३१ डिसेंबरपर्यंत

बंगाल, मुंबई व मद्रास इलाख्यांतील इंग्रजी भाषेचा चांगला परिचय असलेले प्रमुख राजकीय पुढारी एकत्र जमतील. परस्परांचा परिचय करून घेणें व पुढील वर्षी करावयाचें राजकीय कार्य निश्चित करणें, हे या परिषदेचे उद्देश देण्यांत आलेले होते. याच परिषदेचा हिंदी पार्लमेंटामध्यें विकास होईल आणि हिंदी लोकांना प्रातिनिधिक संस्था चालवितां येत नाहींत या आक्षेपाला खरमरीत उत्तर मिळेल, हा व्यापक उद्देशही परिषदेच्या मुळाशीं होता असें स्पष्ट दिसतें.

## जन्मस्थानाची निवड

या पहिल्या परिषदेची व्यवस्था करण्याचें काम पुण्याच्या सार्वजानिक सभेवर सोंपविण्यांत आलें होतें. पर्वतीजवळील हिराबाग हें परिषदेचें व प्रतिनिधी उतरण्याचें ठिकाण मुक्रर करण्यांत आलें होतें. प्रतिनिधींनीं गांवांत वेगवेगळ्या ठिकाणीं उतरण्यापेक्षां याच ठिकाणीं उतरणें परस्परांचा निकट परिचय होण्याच्या दृष्टीनें अधिक चांगलें, असें निमंत्रणपत्रिकेंतच सूचित केलें होतें. त्यांच्या रहाण्याजेवणाचीच नव्हे तर स्टेशनवरून गांवांत आणण्याची आणि गांवांतून पुन्हां स्टेशनवर पोंचविण्याची सर्व व्यवस्था स्वागत मंडळातर्फे फुकट होणार होती. सर्व हिंदुस्थानांतून या परिषदेला फार तर ७० प्रतिनिधी येऊं शकतील असा अंदाज करण्यांत आला होता.

## ७२ प्रतिनिधि व ३० प्रेक्षक

याप्रमाणें पुण्याला काँग्रेसची पहिली बैठक भरण्याची सर्व तयारी झाली खरी- पण इतक्यांत तेथें कॉलऱ्याची सांथ उद्भवल्यामुळें आयत्या वेळीं ती मुंबईला वर सांगितलेल्या ठिकाणीं— भरवावी लागली. पहिल्या बैठकीला प्रतिनिधि म्हणून ७२ व स्नेही किंवा प्रेक्षक म्हणून ३० असे एकंदर १०२ लोक हजर होते. प्रेक्षकांमध्यें मद्रासचे दि. ब. रघुनाथराव आणि मुंबईचे न्या. रानडे व प्रो. भांडारकर हे प्रमुख होते. प्रतिनिधींच्या यादींत पुढील नांवें सांपडतात—सिमल्याचे मि. ह्यूम, कलकत्त्याचे बाबू उमेशचंद्र बानर्जी व बाबू नरेंद्रनाथ सेन, पुण्याचे गोपाळ गणेश आगरकर व वामन शिवराम आपटे, मुंबईचे दादाभाई नवरोजी, काशिनाथ त्रिंबक तेलंग, फिरोजशहा मेथा, दिनशा एदलजी

वाच्छा, मलबारी शेठ, नारायण गणेश चंदावरकर, लखनौचे गंगाप्रसाद वर्मा, मद्रासचे पी. रंगय्या नायडू, एस. सुब्रह्मण्य अय्यर, जी. सुब्रह्मण्य अय्यर, पी. आनंद चार्लू, एम. विजयराघवाचार्य आणि पी. केशव पिळे.

## पहिला मान

अध्यक्षांचें नांव सुचविण्याच्या निमित्तानें पहिल्या काँग्रेसमध्यें सर्वांत प्रथम बोलण्याचा मान ए. ओ. ह्यूम यांना मिळाला. त्यांच्या भाषणाला ना. एस. सुब्रह्मण्य अय्यर व श्री. काशिनाथपंत तेलंग यांनीं अनुक्रमें अनुमोदन आणि पुष्टी दिल्यावर बंगालचे पुढारी बाबू उमेशचंद्र बानर्जी स्थानापन्न झाले.

## प्रसूतिकाळच्या वेदना

याप्रमाणें काँग्रेस जन्माला आली. या जन्माचें तत्कालिक कारण वर्षापूर्वी मद्रास येथें भरलेली १७ पुढाऱ्यांची खासजी सभा होय, हें खरें असलें तरी दूरचीं कारणेंही बरींच आहेत हें विसरतां कामा नये. इंग्रजांचा अम्मल सुरू झाल्यावर कांहीं काळ दिङ्मूढ अवस्थेंत गेला. पण त्या अवस्थेनंतर कांहीं तरी हालचाल करण्याची अवश्यकता प्रत्येक प्रांतांतील विचारी लोकांना वाटूं लागली. आपल्याला कांहीं तरी सामुदायिक जीवन असल्याखेरीज आपल्या दुःखांचा परिहार करतां येणार नाहीं, ही जाणीव बऱ्याच ठिकाणीं उत्पन्न झाली. तिचें दृश्य स्वरूप म्हणूनच मुंबई येथें बॉंबे असोसिएशन, मद्रास येथें महाजन सभा, पुण्याची सार्वजनिक सभा, आणि कलकत्त्याची ब्रिटिश इंडियन ॲसोसिएशन या प्रांतिक संस्था जन्माला आल्या. निरनिराळ्या दिशांकडून झिरपत येऊन नदी बनविणारे हे ओघच होते, असें म्हणावयास हरकत नाहीं. राजकीय जागृति होण्याला राजसत्तेकडून होणारी दडपशाही नेहमीं उपयोगी पडत असते, हा इतिहासाचा सिद्धांत आहे. काँग्रेस जन्माला येण्यापूर्वी कांहीं वर्षें हिंदुस्थानांत निरनिराळ्या प्रकारांनीं अशीच दडपशाही चालू होती. प्रसूतिकाळच्या त्या वेदनाच होत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. भयंकर दुष्काळांनीं सर्व देश अत्यंत हैराण होऊन गेलेला होता. त्यांतच लिटनशाहीच्या सोट्याची भर पडली. देशी वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्यावर गदा आली. रिपनसाहेबांनीं आपल्या उदार धोरणानें खवळलेलें लोकमत शांत करण्याचा प्रयत्न केला. पण विशेष

उपयोग झाला नाहीं. बाब अगदी क्षुल्लक. सिव्हिल सर्व्हिस परीक्षेची वयोमर्यादा २१ वरून १९ वर आणण्यांत आली. वरिष्ठ नोकऱ्यांतून हिंदी लोकांना वगळण्याचा हा बुद्धिपुरस्सर प्रयत्न आहे, असें हिंदी पुढाऱ्यांच्या मनानें घेऊन त्यांनीं चळवळीचें कोलीत हातांत घेतलें. या नियमाविरुद्ध लोकजागृति करण्याच्या उद्देशानें बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं हिंदुस्थानांतील प्रमुख शहरांतून दौरा काढून व्याख्यानें दिलीं. हिंदी पुढाऱ्याचा सर्व हिंदुस्थानभर हा पहिलाच दौरा होय. इल्बर्ट बिलाविरुद्ध युरोपियन लोकांनीं सर्व हिंदुस्थानभर आकाशपाताळ एक केलें व खुद्द व्हाइसरॉयांना पकडींत धरण्याचा प्रयत्न केला. या चळवळीपासूनही हिंदी लोकांनीं चांगलाच धडा घेतला असें दिसतें. याच सुमारास बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांचेवर कोर्टाची बेअदबी केल्याच्या आरोपावरून खटला होऊन त्यांत त्यांना शिक्षा झाली. लोकमतास चेतना देण्यास या शिक्षेचा चांगला उपयोग झाला. बंगालमध्यें अनेक कारणांमुळें प्रक्षुब्ध झालेलें हें लोकमत १८८३ सालीं एका परिषदेच्या रूपानें व्यक्त झालें.

राष्ट्रीय सभेचा झरा जोरानें वाहूं लागण्यास बंगालमधील या परिषदेचा प्रवाह बऱ्याच अंशीं कारणीभूत झालेला आहे.

काँग्रेस जन्माला येण्यापूर्वी बंगाल प्रांतांत ब्राह्मोसमाज, मुंबईला प्रार्थना समाज, व पंजाबांत आर्यसमाज यांची स्थापना होऊन जागृति करण्यास त्यांनींहि थोडाफार हात लाविलेला होता या सर्व जागृतीचें फळ म्हणजेच काँग्रेसचा जन्म होय.

## पितृपद इंग्रज अधिकाऱ्यांकडे !

काँग्रेससारख्या अखिल भारतीय संस्थेला जन्म देण्याइतकी जागृति देशांतील सर्व प्रांतांतून थोड्याबहुत प्रमाणांत झाली होती तरी या जागृतीला साक्षात् मूर्त स्वरूप देण्याचें श्रेय मि. ए. ओ. ह्यूम या इंग्रज गृहस्थांना आहे याबद्दल सर्वांचें मतैक्य आहे. त्यांच्याच जोडीला मि. वेडरबर्न या दुसऱ्या इंग्रज गृहस्थांनीं काँग्रेस नांवारूपाला आणण्याला बरेच परिश्रम केलेले आहेत. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे हे दोन्हीहि सद्गृहस्थ इंडियन सिव्हिल सर्व्हिसमध्यें बडे अधिकारी होते. पैकीं ह्यूमसाहेब हिंदुस्थान सरकारच्या सेक्रेटरीच्या जागेपर्यंत व वेडरबर्नसाहेब मुंबई सरकारच्या सेक्रेटरी-

च्या जागेपर्यंत पुढें चढले. आजच्या दृष्टीनें याहीपेक्षां आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या वेळचे हिंदुस्थानचे व्हाइसरॉय लॉर्ड डफरीन यांचा या कार्याला शुभाशिर्वाद होता. कॉंग्रेसच्या पहिल्या पहिल्या अधिवेशनामध्यें भाग घेणारांत मि. अर्ड्ले नॉर्टन, एच. मॉर्गन ब्राउन, डब्ल्यू. ए. चेंबर्स, सेमूर के, जॉन ॲडॅम्म इ. थोड्या इंग्रजांनीं कांहीं ठरावांवर हिंदी पुढाऱ्याइतक्याच आवेशानें भाषणें केलेलीं आहेत. पार्लमेंटचे सभासद चार्लस ब्रॅडलॉ १८८९ सालीं मुंबई येथील कॉंग्रेसला प्रत्यक्ष हजर होते. त्या वेळीं त्यांना एका टोलेजंग जाहीर-सभेमध्यें श्री. फेरोजशहा मेथा यांच्या अध्यक्षतेखालीं मानपत्र व नजराणा देण्यांत आला. १८९६ सालीं कॉंग्रेसला डब्ल्यु. एस. केन हे लंडनतर्फे प्रति-निधी म्हणून मुद्दाम हजर राहिले होते. पार्लमेंटचे दुसरे एक सभासद मि. आल्फ्रेड वेब हे १८९४ सालीं मद्रासच्या कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. सर विल्यम वेडरबर्न यांना तर अध्यक्षपदाचा मान दोनदां मिळाला. याशिवाय १९०४ सालीं मि. हेन्री कॉटन यांनीं मुंबईच्या कॉंग्रेसचे अध्यक्षस्थान अलंकृत केलें होतें. सांग-ण्याचें तात्पर्य असें कीं कॉंग्रेसला प्रत्यक्ष जन्म देऊन तिच्या कार्यास सक्रिय सहानुभूति दाखविणाऱ्यांमध्यें सरकारी नोकरींतील आणि ब्रिटिश पार्लमेंटांतील कांहीं उदारमतवादी सद्गृहस्थांचें मोठें साहाय्य झालें आहे. किंबहुना असेंहि म्हणण्यास हरकत नाहीं कीं ह्यूमसाहेबांनीं नेट धरला नसता तर १८८५ सालींच कॉंग्रेस जन्मास आली नसती. हिंदी लोकांचीं दुःखें संघटित आणि सनदशीर रीतीनें मांडली गेल्यास सरकारला त्यांचा बोध होऊन त्यांचे निवारण करतां येईल व अशा रीतीनें लोकमत संतुष्ट ठेऊन शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचें कार्य सुलभ जाईल एवढ्याच कॉंग्रेसला जन्म किंवा आशिर्वाद देण्यामध्यें या गृहस्थांचा हेतु होता हें उघड आहे. ५० वर्षांनीं कॉंग्रेसला आज जें स्वरूप प्राप्त झालें आहे तसें तें प्राप्त होईल अशी वरील गृहस्थांना अंधुक जरी कल्पना असती तरी ते या खटाटोपांत पडले नसते यांत शंका नाहीं.

( २ )

# काँग्रेसचें ध्येय

काँग्रेसला जन्म देतांना निरनिराळ्या लोकांच्या पुढें निरनिराळे उद्देश होते, हें पहिल्या प्रकरणावरून लक्षांत आलें असेलच. पहिल्या बैठकीच्या निमंत्रणपत्रिकेंत परस्परांचा परिचय करून घेणें व पुढील वर्षी करावयाचें राजकीय कार्य निश्चित करणें, हे उद्देश देण्यांत आले होते. ह्यूम वगैरे पुढाऱ्यांच्या मनांत हिंदी लोकांनी आपलीं दुःखें संघटित आणि सनदशीर रीतीनें सरकारपुढें मांडून त्याला एक प्रकारें मदत करण्याकरितां सर्व राष्ट्राचें एक मुख निर्माण करावें हा उद्देश होता. पहिल्या बैठकीचे अध्यक्ष बाबू उमेशचंद्र बानर्जी यांनीं आपल्या भाषणांत प्रारंभींच पुढील उद्देशांचा निर्देश केला आहे—


( १ ) देशांतील कार्यकर्त्यांमध्यें परस्परांत स्नेह आणि परिचय उत्पन्न करणें ( २ ) प्रांतिक किंवा जातीय भेद विसरून राष्ट्रीय ऐक्याची भावना उत्पन्न करणें ( ३ ) परस्परांत विचारविनियम करून देशापुढें असलेल्या महत्वाच्या सामाजिक प्रश्नांवर विचार प्रदर्शित करणें व ( ४ ) पुढील १२ महिन्यांत करावयाच्या कार्यांची पद्धति निश्चित करणें.

याहून अधिक स्पष्ट कल्पना पहिल्या काँग्रेसमध्यें पास झालेल्या ९ ठरावांवरून येईल. हिंदुस्थानांतील राज्यकारभाराची चौकशी करण्याकरितां रॉयल कमिशन नेमावें, इंडिया कौन्सिल रद्द करावें, कायदेमंडळांत लोकनियुक्त सभासद असावे, आय. सी. एस्. परीक्षेची वयोमर्यादा वाढवून हिंदुस्थानांत व

इंग्लंडांत एकाच वेळीं परीक्षा घेण्यांत यावी, लष्करी खर्च कमी करावा, या मागण्या व ब्रह्मदेशाचा उत्तर भाग ब्रिटिश राज्यांत सामील केल्याबद्दल निषेध, हा पहिल्या कॉंग्रेसमध्यें झालेल्या कार्यांचा सारांश आहे. याच धोरणानें बरींच वर्षें काम चाललें होतें. वर्षांतून चार दिवस एकत्र जमावें व आपलीं दुःखें वेशीवर टांगावीं एवढेंच काम चाललें होतें. कॉंग्रेसचें तारूं कोणत्या दिशेकडे हांकललें जात आहे, याची याहून स्पष्ट कल्पना कोणापुढें नव्हती. जसजसा अनुभव येऊं लागला आणि सरकारची दडपशाही जाणवूं लागली तसतसें हें ध्येय स्पष्ट होऊं लागलें. सातव्या वर्षीं म्हणजे १८९१ सालीं नागपूर येथें कॉंग्रेसचें अधिवेशन भरलें असतांना, कॉंग्रेसच्या बैठकी दरसाल भरवाव्या कीं नाहीं, याबद्दल बरीच चर्चा झाली. या प्रश्नाचा निकाल लावण्याकरितां एक लहानशी कमिटीही नेमली. या कमिटीच्या शिफारशीवरून त्याच वर्षीं कॉंग्रेसनें पुढील ठराव पास केला—

Resolved that the annual sessions of the Congress in India continue to be held until all necessary reforms have been secured.

**म्हणजे अवश्य तेवढ्या सुधारणा पदरांत पडेपर्यंत सालोसाल कॉंग्रेसचें अधिवेशन भरविण्यांत यावें.** पण ‘ अवश्य त्या सुधारणा ’ म्हणजे काय, याचा उल्लेख कोणींच केला नाहीं. आज ५० वर्षें कॉंग्रेसचीं अधिवेशनें नियमानें भरत आहेत. यावरून ‘ अवश्य त्या सुधारणा ’ अद्यापि पदरांत पडल्या नाहींत हें उघड आहे. त्या केव्हां पदरांत पडतील, म्हणजे कॉंग्रेसचें आयुर्मान किती वर्षांचें आहे, हें सांगणें अर्थातच फार कठीण आहे. ‘ अवश्य त्या सुधारणा ’ हा शब्दप्रयोग ज्या वर्षीं वापरण्यांत आला, त्याच वर्षींच्या कॉंग्रेसच्या ठरावांत दिग्दर्शित केलेल्या मागण्या सरकारनें ताबडतोब मान्य केल्या असत्या तरी कॉंग्रेस भरविण्याचें काम थांबलें असतें, असें मात्र वाटत नाहीं. कारण त्या मागण्या त्या वेळीं मोठ्या आणि महत्वाच्या वाटल्या, तरी त्यांत कायमचें समाधान मानण्यासारखें कांहींच नव्हतें. संपूर्ण स्वातंत्र्य मिळाल्याखेरीज राजकीय आकांक्षांची भूक कधींच शमत नाहीं ! आणि वरील मागण्यांत राजकीय स्वातंत्र्याचा शतांशच काय पण




**दे. बं. चित्तरंजनदास**

गया-१९२२




**बॅ. बद्रुद्दिन तय्यबजी**

मद्रास-१८८७



**दादाभाई नौरोजी**

लाहोर-१८९३ कलकत्ता-१९०६



**पं. मोतीलाल नेहरू**

अमृतसर-१९१९ कलकत्ता-१९२८



**सरदार वल्लभभाई पटल**

कराची–१९३१




**डॉ. ॲन बेझंट**

कलकत्ता–१९१७



**आर. बी. मुधोळकर**

बंकीपूर–१९१२



**सर विल्यम वेडर बर्न**

मुंबई–१८८९ अलाहाबाद–१९१०

सहस्रांश देखील नव्हता. निश्चित उद्देशाच्या दृष्टीनें कॉंग्रेसचें जहाज वरींच वर्षे ध्येयावांचून चाललें होतें, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. १४ वर्षें कॉंग्रेसला धड घटनाही नव्हती. १८९९ सालीं लखनौ येथें भरलेल्या १५ व्या कॉंग्रेसमध्यें राष्ट्रीय सभेची नांव घेण्यासारखी पहिली घटना निश्चित करण्यांत आली. तीमध्यें '**हिंदी जनतेचें सनदशीर मार्गानें हित साधणें**' यापलीकडे कॉंग्रेसच्या ध्येयाची मजल गेली नव्हती. हें ध्येयहि वरील ध्येयाप्रमाणेंच संदिग्ध होतें. त्या त्या वेळच्या पुढाऱ्यांच्या कुवतीस अनुसरून रबराप्रमाणें तें संकुचित किंवा विस्तार पावणारें होतें. कारण वादालाच बसलें म्हणजे 'हित' या शब्दामध्यें संपूर्ण स्वातंत्र्याचें ब्रह्मांड सांठवलें आहे, असें सिद्ध करणें फारसें कठीण नव्हतें.

इ. स. १९०७ सालची सुरत कॉंग्रेस पक्षभेदांत मोडल्यामुळें कॉंग्रेसला कांहीं तरी निश्चित क्रीड ऊर्फ ध्येय असावें, अशी तिच्या पुढाऱ्यांना जाणीव उत्पन्न झाली. म्हणून १९०८ सालच्या एप्रिल महिन्यांत अलाहाबाद येथें एक कन्व्हेन्शन भरवून कॉंग्रेसचें ध्येय अधिक स्पष्ट करण्यांत आलें. '**प्रचलित राज्यपद्धतींत सनदशीर मार्गानें आस्ते आस्ते सुधारणा घडवून आणून वसाहतींचें स्वराज्य मिळविणें**' हा त्या क्रीडचा मथितार्थ होता. १९१९ पर्यंत हेंच ध्येय कायम राहिलें. १९२० सालीं कॉंग्रेसचीं सूत्रें महात्मा गांधींच्या हातांत येऊन असहकारितेचा उदय झाला. त्या वर्षी कॉंग्रेसच्या एकंदर घटनेंत मोठी क्रांति झाली. आणि ध्येयाला अधिक विस्तृत आणि सुटसुटीत स्वरूप देण्यांत आलें. '**सर्व प्रकारच्या न्याय्य आणि शांततेच्या मार्गांनीं स्वराज्य मिळविणें हें राष्ट्रीय सभेचें ध्येय आहे,**' असें जाहीर करण्यांत आलें. सुरुवातीपासून कॉंग्रेस ज्या सुधारणांची मागणी करीत असे, त्यांपैकीं बहुतक सुधारणा पदरांत पडल्या नाहींत, वसाहतीचा दर्जा प्राप्त झाला नाहीं, किंवा नागपूरला ठरविलेलें स्वराज्यहि मिळालें नाहीं! जनतेच्या प्रत्येक मागणीला वाटाण्याच्या अक्षता देण्याचा सरकारनें जणूं निश्चयच केला होता. यामुळें लोकमत दरसाल अधिकाधिक प्रक्षुब्ध होत जाऊन जनतेच्या आकांक्षा वाढूं लागल्या, आणि त्या प्रमाणांत ध्येयही विस्तार पावूं लागलें! १९२७ सालीं मद्रास येथें भरलेल्या

राष्ट्रीय सभेमध्यें **राष्ट्रीय स्वातंत्र्य हें हिंदी लोकांचें ध्येय आहे,** असें कॉंग्रेस जाहीर करते, हा पं. जवाहरलाल नेहरू यांचा ठराव पास झाला. तथापि कॉंग्रेसच्या क्रीडमध्यें अद्यापि त्याचा अंतर्भाव झाला नव्हता. तो १९२९ सालीं लाहोर येथें पं. जवाहरलाल यांच्याच अध्यक्षतेखालीं भरलेल्या कॉंग्रेसमध्यें करण्यांत आला.

पूर्वीच्या ‘ सनदशीर ’ या शब्दाच्या जागीं नागपूर येथें मान्य करण्यांत आलेले ‘ न्याय्य आणि शांततेच्या मार्गानें ’ हे शब्द कायम ठेवण्यांत आले. अर्थात आज संपूर्ण स्वातंत्र्य हें ध्येय व न्याय्य आणि शांततेचा मार्ग हीं कॉंग्रेसचीं साध्य आणि साधनें आहेत. १९३४ सालीं मुंबई येथें भरलेल्या कॉंग्रेसमध्यें साधनांच्या बाबतींत थोडा शाब्दिक फरक करण्याचा म. गांधींचा विचार होता. न्याय्य व शांततेच्या मार्गानें याऐवजीं ‘ **सत्य व अहिंसेच्या मार्गानें** ’ हे शब्द घालण्यांत यावे, असा त्यांचा आग्रह होता. पण कॉंग्रेसमध्यें अनुकूलता न दिसल्यामुळें प्रांतिक कमिट्यांचीं मतें मागवून नंतरच हा प्रश्न निकालांत काढावा, असें ठरविण्यांत आलें. चालू वर्षी प्रांतिक कमिट्यांनीं प्रदर्शित केलेल्या मतांवरून बऱ्याच कमिट्यांना हा फेरफार मान्य नाहीं, असें दिसतें. कदाचित् लखनौ येथें भरणाऱ्या येत्या कॉंग्रेसपुढें हा प्रश्न विचारा-करितां येईल.

यापुढें कॉंग्रेसच्या ध्येयांत आणि साधनांत एकच फेरफार होणें संभव-नीय दिसतें. संपूर्ण स्वातंत्र्य ह्मणजे काय त्याचा खुलासा करून घेण्याची व तो क्रीडमध्येंच ग्रथित करण्याची सोशॅलिस्टांची धडपड चालू आहे. त्यांना कांहीं वर्षांनीं कदाचित् यश येईल. हिंदी जनतेच्या आकांक्षांविषयीं सरकारनें आजपर्यंत दाखविली तशीच बेपर्वाईची वृत्ति दाखविली, तर ‘ By all possible means ’ ह्मणजे ‘शक्य त्या उपायांनीं’ असा साधनांच्या बाबतींतही फरक होण्याचा बराच संभव आहे. पहिल्या कॉंग्रेसला हजर असलेला पुरुष कॉंग्रेसनें पुढें ठेविलेल्या आजच्या अत्युच्च ध्येयाकडे मान वर करून उंच पाहील, तर त्याला घेरी आल्यावांचून रहाणार नाहीं. कॉंग्रेस जन्माला आली त्या वेळीं कवीच्या कल्पनासृष्टींत देखील हें ध्येय नसेल !

आणखी एक गोष्ट स्पष्ट करावयाची राहिली. काँग्रेस ही सर्वस्वी राजकीय संस्था आहे, धार्मिक व सामाजिक सुधारणा करणें हें तिचें ध्येय नाहीं, ही कल्पना अगदीं प्रथमपासूनच तिच्या चालकांच्या डोळ्यासमोर होती. Conference of leading politicians म्हणजे राजकीय पुढाऱ्यांची परिषद असे शब्द पहिल्या निमंत्रण पत्रिकेंत स्पष्ट आहेत. त्याचप्रमाणें उद्देशांतही political operations म्हणजे राजकीय कार्यें असे शब्द आहेत. दुसऱ्या काँग्रेसच्या वेळीं कलकत्ता येथें भाषण करतांना अध्यक्षपदावरून श्री. दादाभाई नवरोजी यांनीं काँग्रेस ही purely political body म्हणजे 'शुद्ध राजकीय संस्था' आहे असें पुनः पुनः जोर देऊन सांगितलें. कारणांचें स्पष्टीकरण करतांना ते म्हणाले कीं सामाजिक सुधारणा होणें अवश्य आहे, असें पुष्कळांना आणि मलाही अंतःकरणापासून वाटत असलें तरी काँग्रेसचें स्वरूप राजकीयच राहील. कारण राजकीय प्रश्नांवर देशांतील सर्वांचें जसें ऐक्य होईल, तसें सामाजिक प्रश्नांवर होणार नाहीं. एका जातीच्या ज्या सामाजिक गरजा असतील, त्या दुसऱ्या जातीच्या असतीलच असें नाहीं. म्हणून ते प्रश्न काँग्रेसच्या कक्षेंतून दूर ठेवणेंच इष्ट आहे. लो. टिळकांनीं हीच दृष्टि ठेऊन आपल्या कार्याला सर्व समाजाचा पाठिंबा मिळविण्याकरितां फक्त राजकीय कार्यालाच वाहून घेतलें, हें प्रसिद्धच आहे. नागपूर काँग्रेसच्या वेळीं महात्मा गांधींनीं अस्पृश्योद्धाराचा प्रश्न सामाजिक क्षेत्रांतून काँग्रेसच्या राजकीय क्षेत्रांत आणला, तेव्हां एकदांच वरील मूळ उद्देशाकडे दुर्लक्ष करण्यांत आलें असें म्हणतां येईल. सामाजिक प्रश्नांचा विचार करण्याकरितां पुष्कळ दिवस काँग्रेसच्या मंडपांत व नंतर अन्यत्र स्वतंत्र परिषदा भरत असत.

( ३ )

# काँग्रेस व राष्ट्रीय एकीकरण

प्रांतिक, धार्मिक किंवा जातीय भेदभाव विसरून राष्ट्रीय ऐक्याची भावना उत्पन्न करणें, हा एक महत्वाचा उद्देश काँग्रेसला जन्म देतांना चालकांनीं आपल्यासमोर ठेवलेला होता. तो पन्नास वर्षांनीं किती सिद्धीस गेला, हें आतां पहावयाचें आहे. वरच्या उद्देशामध्येंच एकीकरणाचे दोन प्रकार सांगितले आहेत. एक जातीय किंवा धार्मिक आणि दुसरा प्रांतिक. पैकीं प्रांतिक एकीकरणाचा उद्देश फारच थोड्या अवधीमध्यें सिद्धीस गेला असें म्हणावयास हरकत नाहीं. हिंदुस्थान देशाचा विस्तार एका खंडाएवढा असून त्यामध्यें अनेक धर्म आणि भाषा प्रचलित आहेत. अशोकाचा प्राचीन काल सोडून दिला, तर एकछत्री अंमलाखालीं सर्व हिंदुस्थान ब्रिटिशांच्या कारकीर्दीतच प्रथम आला. ब्रिटिशांच्या कारकिर्दीपूर्वी सर्व हिंदी लोकांमध्यें राष्ट्रीय ऐक्याची भावना जागृत झालेली नव्हती, ही गोष्ट इतिहासानें सिद्ध आहे. एकराष्ट्रीयत्वाची भावना जागृत नसल्यामुळें मूठभर इंग्रजांनीं सातासमुद्रांपलीकडून येऊन एवढा मोठा देश हां हां म्हणतां जिंकण्याचें आश्चर्य करून दाखविलें, ही प्रोफेसर सीली यांची कारणमीमांसा चुकीची आहे असें म्हणतां येणार नाहीं. परकीय मुसलमानांपुढें सर्व हिंदु कधींच एक होऊं शकले नाहींत, किंवा इंग्रजांविरुद्ध सर्व हिंदूंना आणि मुसलमानांना एक जबरदस्त संघ बनवितां आला नाहीं. एका प्रांताला दुसऱ्या प्रांताविषयीं फारच थोडी सहानुभूति वाटे. पुढें दळणवळणाचीं साधनें वाढल्यामुळें

नैसर्गिक प्रांतिक बंधनेंही शिथिल होऊं लागलीं. यामुळें प्रांतांतील स्नेहभाव हळूहळू वाढीस लागला. काँग्रेसपूर्वी प्रांतिक संघटना होऊं लागलेल्या होत्या, त्या सर्व संघटनांना एका अखिल भारतीय संघटनेखालीं आणण्याचें काम प्रथम काँग्रेसनें केलें. राजकीय पारतंत्र्याचे चटके सर्वांना सारखेच बसत असल्यामुळें "तप्तेन तप्तमयसा घटनाय योग्यम्" या न्यायानें सर्व प्रांतांचा वैचारिक सांधा जुळण्यास वेळ लागला नाहीं.

काँग्रेसच्या प्रत्येक बैठकीला सर्व प्रांतांतील प्रतिनिधी आणि प्रेक्षक हजर रहातात. काँग्रेसचीं अधिवेशनेंही प्रमुख प्रांतांतून पाळीपाळीनें भरत आलीं आहेत. अधिवेशनांची प्रांतवार वर्गवारी केली तर ती पुढीलप्रमाणें होईल—मुंबई ६, कलकत्ता १०, मद्रास ७, संयुक्तप्रांत ८, पंजाब ८, मध्यप्रांत २, महाराष्ट्र १, वऱ्हाड १, गुजराथ ३, बिहार २, कर्नाटक १, आसाम १ व सिंध २. यांमध्यें काँग्रेसच्या चार जादा अधिवेशनांचाही समावेश केलेला आहे.

अध्यक्षांचें प्रांतवार वर्गीकरण पुढीलप्रमाणें करतां येईल—

बंगाल—उमेशचंद्र बानर्जी (२ वेळां), सुरेंद्रनाथ बानर्जी (२ वेळां), आनंदमोहन बोस, रमेशचंद्र दत्त, लालमोहन घोष, डॉ० राजबिहारी घोष, भूपेंद्रनाथ बसू, सत्यप्रसन्न सिंह, अंबिकाचरण मुझूमदार, चित्तरंजन दास, अबुल कलम अझाद, बेकायदेशीर काँग्रेसच्या अध्यक्ष श्रीमती नीली सेनगुप्त.

मद्रास—पी. आनंदा चार्लु, शंकरन् नायर, डॉ. ॲनी बेझंट, सी. विजयराघवाचारियर, एस. श्रीनिवास अयंगार, नबाब सय्यद महमद बहादूर.

मुंबई—दादाभाई नौरोजी (३ वेळां), बदुरुद्दीन तय्यबजी, फिरोझशहा मेहता (२ वेळां निवड झाली. पैकीं एका वेळीं ते आयत्या वेळीं आजारी पडल्यामुळें दुसऱ्याची निवड केली), एम. आर. सयानी, नारायण गणेश चंदावरकर, दिनशा एदलजी वाच्छा, सरोजिनी नायडू.

महाराष्ट्र—गोपाळ कृष्ण गोखले, (लो. टिळक यांची १९१८ सालीं निवड झाली होती, पण ते विलायतेंत असल्यामुळें पं. मालवीय यांना अध्यक्ष केलें.)

संयुक्तप्रांत—पंडित मदनमोहन मालवीय (३ वेळां), पं. बिशन

नारायण धार, पंडित मोतिलाल नेहरू (२ वेळां) पं. जवाहरलाल नेहरू.

**वऱ्हाड**—आर. एन. मुधोळकर.

**पंजाब**—लाल लजपतराय.

**दिल्ली**—हकीम अजमलखान, मौलाना महंमद अल्ली, डॉ. अन्सारी.

**गुजराथ**—म. गांधी, वल्लभभाई पटेल, (१९३२ सालीं काँग्रेस बेकायदेशीर असतांना दिल्ली येथें भरलेल्या काँग्रेसचे अध्यक्ष अहमदाबादचे रणछोडदास अमृतलाल हे होते.)

**बिहार:**—सय्यद हसन इमाम, बाबू राजेंद्रप्रसाद.

याखेरीज वेडरबर्न (२ वेळां) जॉर्ज यूल, अल्फ्रेड वेब, हेन्री कॉटन हे युरोपियन अध्यक्ष होते. डॉ. ॲनी बिझंट युरोपियन असल्या तरी त्यांनीं मद्रासलाच घर केल्यामुळें त्यांचा मद्रासमध्यें उल्लेख केलेला आहे.

सरहद्दप्रांत, सिंध, कर्नाटक, ओरिसा, आंध्र, आसाम, व ब्रह्मदेश या प्रांतांना अध्यक्षपदाचा मान अद्यापि मिळालेला नाहीं. काँग्रेस सुरू झाली त्या वेळीं ब्रह्मदेश नुकताच ब्रिटिश राज्याला जोडण्यांत आलेला होता. आज ५० वर्षांनीं तो हिंदुस्थानापासून अलग करण्यांत येत आहे. ब्रह्मदेशचा प्रतिनिधी प्रथम १९ व्या काँग्रेसला हजर राहिला.

१९३२ सालीं ओरिसा प्रांतांत पुरी येथें काँग्रेस भरण्याचें ठरलें होतें. पण सत्याग्रहाची चळवळ सुरू झाल्यामुळें तेथें ती भरूं शकली नाहीं.

काँग्रेसमध्यें सर्व देशाचीं दुःखें नेहमीं पुढें मांडण्यात येत असतात तथापि एखाद्या प्रांतांत विशेष अन्याय घडला असल्यास त्याचाहि परामर्ष घेण्यांत येत असतो. काँग्रेसच्या चळवळीमुळें देशाला खरोखरच एका विराट देहाचें स्वरूप प्राप्त झालें. शरीराच्या कोणत्याहि भागाला दुःख झालें म्हणजे सर्व शरीराला ज्याप्रमाणें वेदना होतात, त्याप्रमाणें हिंदुस्थानच्या कोणत्या भागांत अन्याय घडला तर त्याच्या विरुद्ध सर्व देश एकदम आरडाओरड करीत असतो. वंगभंगाचे वेळीं सगळा देश बंगालच्या साहाय्याला धांवून गेला आणि जालियनवाला बागेतील कत्तलीनें प्रत्येक प्रांतांतील लोकांना आपल्यावरच घाला पडल्यासारखें वाटूं लागलें. हीं दोन ठळक उदाहरणें

पुरेशीं आहेत. कॉंग्रेसनें वेळोवेळीं केलेल्या राजकीय मागण्या अद्यापि पदरांत पडल्या नाहींत तरी आपण सर्व एकाच राष्ट्राचे घटक आहोंत, एकाचें सुखदुःख तें दुसऱ्याचें सुखदुःख, ही एकराष्ट्रीयत्वाची भावना दृढ करण्यामध्यें कॉंग्रेसनें पूर्ण यश मिळविलें, हें नाकबूल करता येणार नाहीं. सर्व देशाची प्रातिनिधिक संस्था कोणती असें कोणी विचारिलें तर प्रथम कॉंग्रेसकडेच बोट दाखविणें उचित आहे.

जातीय एकीकरणाबद्दल मात्र असें विधान करतां येणार नाहीं, हें लिहिण्यास वाईट वाटतें. धार्मिक किंवा सामाजिक प्रश्नामध्यें ढवळाढवळ केली तर मतभेद वाढतील व धार्मिक कलह उत्पन्न होईल, या भीतीनें कॉंग्रेसनें प्रथमपासून फक्त राजकीय सुधारणेवरच आपलें लक्ष दिलें होतें. राजकीय दुःखें सर्वांची सारखीं असल्यामुळें त्यांचें निवारण करण्यास सर्व जातींचें ऐक्य करणें कठीण जाणार नाहीं अशी प्रथम अपेक्षा होती. पण ती फोल ठरली. कॉंग्रेसनें आपल्या कार्यपद्धतींत जातीयभेदाला केव्हांही अवसर दिला नाहीं. कॉंग्रेस सुरू झाली त्यावेळीं हिंदूंच्या बरोबरीनें मुसलमान, पारशी, ख्रिस्ती, युरोपियन व शीख यांनीं तींत भाग घेतलेला आहे. आठ मुसलमान कॉंग्रेसचे अध्यक्ष होऊन गेले आणि ४ स्वागताध्यक्ष झाले होते! पारशी जमात अगदीं थोडी म्हणजे एक लाखाच्या जवळपास आहे. पण तीन पारश्यांनीं जवळजवळ ३० वर्षें कॉंग्रेसवर आपलें जबरदस्त वजन ठेविलेलें होतें. तीनदां अध्यक्ष होण्याचा मान फक्त महर्षि दादाभाई नौरोजी यांनाच मिळाला. स्वराज्याचा पहिला जयघोष कॉंग्रेसमध्यें त्यांनीं केला. सर फिरोजशहा मेहता हे तर एके काळीं कॉंग्रेसमध्यें 'कर्तुमकर्तुम् अन्यथा कर्तुम्' सत्ता गाजवीत होते. सर दिनशा एदलजी वाच्छा यांनीं कॉंग्रेसच्या सेक्रेटरीचें काम कित्येक वर्षें केलेलें आहे. मुंबईचे श्री. नरिमन यांना कॉंग्रेसच्या कारभारी मंडळांत जागा मिळालेली आहे. कर्तबगारीनें कोणी वर येऊं लागला तर त्याला कॉंग्रेस अडथळा करूं शकत नाहीं, याला पारश्यांचें हें एक उदाहरण पुरें आहे. चार युरोपियन लोकांनाहि कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाचा मान मिळालेला आहे. सरदार दयाळसिंग हे १८९३ सालीं लाहोरच्या कॉंग्रेसचे स्वागताध्यक्ष होते. अध्यक्षपदाचा मान

शीख समाजाला अद्यापि मिळालेला नाहीं. तथापि हल्लीं काँग्रेसच्या कारभारी मंडळांत शिखांकरितां एक जागा जवळजवळ कायम राखून ठेविल्यासारखी दिसते.

मुसलमानांविषयीं पुढें एका प्रकरणांत सविस्तर लिहावयाचें आहे. वृतें येथें एवढेंच सांगावयाचें कीं, प्रारंभीं मुसलमान समाज काँग्रेसबरोबर होता. दुजेपणाची भावना त्यांच्या मनामध्यें यत्किंचित् देखील उदित झालेली नव्हती. लोकसंख्येच्या प्रमाणामध्यें त्यांचे प्रतिनिधी काँग्रेसला हजर रहात नसत याचें कारण काँग्रेसविषयीं तो समाज साशंक होता हें नसून तो समाज शिक्षणांत बराच मागासलेला होता हें होय. पहिल्या काँग्रेसला जमलेल्या ७२ प्रतिनिधींमध्यें फक्त २ च मुसलमान होते. ५ वी काँग्रेस त्याच ठिकाणीं म्हणजे मुंबईस भरली असतां १८८९ प्रतिनिधींमध्यें मुसलमानांची संख्या २५४ होती. ही वाढती संख्या अभिनंदनीय होती; पण काँग्रेसचें बल वाढूं लागतांच सरकारच्या मनांत एक प्रकारचा दरारा उत्पन्न झाला आणि ‘ फोडा आणि झोडा ’ या नीतीचा अवलंब होऊं लागला असें दिसतें. कारण काँग्रेसला येणाऱ्या मुसलमानांची संख्या हळूहळू कमी होऊं लागली. तिसऱ्या काँग्रेसचे अध्यक्ष श्री० बदरुद्दीन तय्यबजी यांनीं काँग्रेस धर्मभेदातीत आहे, असें आपल्या धर्मबांधवांना निक्षून सांगितलें. कलकत्ता येथें भरलेल्या १२ व्या काँग्रेसचे अध्यक्ष ना. महमद रहिमतुल्ला सयानी यांनीं काँग्रेस ही सर्व जातीं-करितां झगडत आहे असें पुन्हां सांगितलें. पण या उपदेशाचा मुसलमानांवर उत्तरोत्तर कमी परिणाम होऊं लागला. कारण सर सय्यद अहमद सारखे त्यांचे दुसरे पुढारी त्यांच्या मनांत जातीय कलहाचें बीजारोपण करण्यांत गुंतून गेले होते. मुसलमानांनीं काँग्रेसपासून दोन हात दूर रहाण्यामध्येंच त्यांचें कल्याण आहे, असें ते उघड उघड सांगत. काँग्रेस ही संस्था सरकारलाही नकोशी झाल्यामुळें तिच्याशीं फटकून वागणारे सरकारच्या कृपेस पात्र होत हें सांगावयास नकोच. काँग्रेसपासून दूर राहिल्यानें सरकारकडून आपला फायदा होतो हें मुसलमानांस कळून चुकल्यामुळें काँग्रेसनें कितीहि जवळ केलें तरी ते तिच्या आधीन होत नसत. पुढें तर मुसलमानांनीं ‘ **मुस्लिम लीग** ’ ही आपली स्वतंत्र संस्था निर्माण केली. सरकारच्या दडपशाहीचा एकीकडे काँग्रेसनें निषेध करावा आणि दुसरीकडे मुसलमानांनीं राजनिष्ठेचें प्रदर्शन करावें,

असले प्रकार चालले होते. १९०९ सालीं मिळालेल्या मोर्ले-मिंटो सुधारणांमध्यें मुसलमानांना सवता सुभा मिळाला. हिंदुस्थानांतील इतर लोकांपेक्षां मुसलमानांचे हितसंबंध अगदीं स्वतंत्र आहेत या वृत्तीवर सरकारी शिक्कामोर्तब झालें ! पुढील जातीय कलहाचें हें बीजारोपणच होय. १९१६ सालीं लखनौचा करार होऊन कॉंग्रेस आणि मुस्लीम लीग यांनीं एकमतानें राजकीय घटनेचा मसुदा तयार करून सरकारकडे पाठविला. हें ऐक्य ४ वर्षांनीं खिलाफत प्रकरणामुळें अधिक दृढ झालें. खिलाफतीच्या बाबतींत मुसलमानांवर झालेला अन्याय दूर करण्याकरितां कॉंग्रेसनें स्वतः कंबर बांधली. यामुळें मुसलमानांनाहि थोडा वेळ कॉंग्रेसविषयीं आपलेपणा वाटूं लागला. पण हें ऐक्य नैमित्तिकच होतें. खिलाफतीचा परस्पर निकाल लागल्यावर मुसलमानांना कॉंग्रेसच्या मदतीची आवश्यकता राहिली नाहीं. ते तिच्याशीं फटकून वागूं लागले. त्यांच्या धर्मवेडाला ऊत येऊन जागोजाग दंग्यांचे वणवे पेटूं लागले. गेल्या १५ वर्षांत मुसलमानांना जवळ करण्याचें कितीतरी प्रयत्न झाले. पण जवळ करण्याकरिता जों जों त्यांना आमिष दाखवावें तों तों त्यांची भूक वाढून ते अधिकच दूर दूर जाऊं लागले. त्यांच्या करितां कॉंग्रेसनें आपल्या निर्भेळ राष्ट्रीय धोरणाला प्रसंगानुसार मुरड घातली. पण त्या कशाचाच परिणाम त्यांच्या मनावर अद्यापि झालेला नाहीं. सरकारच्या बाजूला रहाण्यांत आपला फायदा आहे हें त्यांना पक्कें कळून चुकल्यामुळें कॉंग्रेस बरोबर ते फटकून वागतात. त्यांच्यामध्यें राष्ट्रीय वृत्तीचा अद्यापि उदय झालेला नाहीं, राष्ट्रापेक्षां ते धर्मालाच श्रेष्ठ मानतात, हें यावरून अगदीं उघड आहे.

म. गांधी यांनीं दुसऱ्या गोलमेज परिषदेमध्यें कॉंग्रेस ही सर्व देशाची प्रातिनिधिक संस्था आहे, असें सांगितलें. कॉंग्रेसएवढी दुसरी प्रातिनिधिक सस्था नाहा या अर्थानें हें म्हणणें बरोबर आहे. पण अधिक खोलांत गेल्यास तिच्या प्रातिनिधिकपणाला वैगुण्य आणणाऱ्या बऱ्याच गोष्टी दिसूं लागतात. ७ कोटी मुसलमानांना कॉंग्रेसविषयीं आपलेपणा वाटत नाहीं. ५ कोटी अस्पृश्य कॉंग्रेसपासून दूर आहेत. मद्रास आणि मुंबई प्रांतांतील ब्राह्मणेतर समाज कॉंग्रेसबरोबर अद्यापि समरस झालेला नाहीं. युरोपियन समाज तर

कॉंग्रेसला आपला शत्रूच समजतो. ख्रिस्ती लोक कॉंग्रेसला शत्रू समजत नसले तरी तिच्या कार्याविषयीं उदासीन आहेत. जातीय निर्णयापासून शिख लोक कॉंग्रेसवर बरेच नाराज झालेले आहेत. कॉंग्रेसनें अस्पृश्योद्धाराची चळवळ हातांत घेतल्यामुळें सनातनी लोकांनीं कॉंग्रेसवर बहिष्कार घातल्यासारखा झाला आहे. अशा स्थितींत कॉंग्रेसला प्रातिनिधिक कसें म्हणावें आणि तिनें ५० वर्षांत राष्ट्रीय एकीकरण काय केलें असा प्रश्न विचारावासा वाटतो. यांत अर्थातच कॉंग्रेसचा दोष नाहीं. तिनें प्रयत्नांत कोणताहि कसूर केलेली नाहीं. परंतु सरकारच्या धोरणामुळें तिच्या प्रयत्नांना यावें तितके यश येत नाहीं हें मात्र खरें.

नि. ५२८

# ( ४ )

# कॉंग्रेस व महाराष्ट्र

कॉंग्रेसच्या इतिहासांत महाराष्ट्राला बरेंच वरचें स्थान दिलें पाहिजे. १८७० पासून पुढील पन्नास वर्षांचा महाराष्ट्राचा इतिहास म्हणजे रानडे, गोखले आणि टिळक या तीन थोर पुरुषांच्या कर्तबगारीचा इतिहास होय. त्यांच्या कर्तबगारीमुळें महाराष्ट्रांत जागृति झालीच, पण शिवाय सर्व हिंदुस्थानभर कोनाकोपऱ्यांतून त्या जागृतीचे पडसाद उमटले. तिघांच्या कार्यांत फरक येवढाच कीं, रानडे हे सरकारी नोकरीनें बांधले गेले असल्यामुळें गोखले किंवा टिळक यांच्याप्रमाणें उघडपणें कोणत्याही राजकीय चळवळीच्या अग्रभागीं ते दिसले नाहींत. तथापि एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस सुरू झालेल्या प्रत्येक चळवळीचीं बीजें, मग ती चळवळ राजकीय असो, सामाजिक असो, धार्मिक असो, आर्थिक असो, वाङ्मयिक असो किंवा शैक्षणिक असो, रानड्यांनींच पेरलेलीं आहेत. गोखले स्वतःला रानड्यांचे शिष्य म्हणवीत आणि गांधी गोखल्यांना आपले गुरु समजतात. कॉंग्रेसची स्थापना झाली, त्या वेळीं बंगालमध्यें बाबू सुरेंद्रनाथ बानर्जीसारखे राजकीय चळवळींत प्रत्यक्ष भाग घेऊन लोकप्रिय झालेले पुढारी होते. मद्रासला सुब्रह्मण्यम् अय्यर किंवा आनंदा चार्लु यांच्या नांवांचा बोलबाला पुष्कळ झालेला होता. मुंबईच्या दादाभाई नौरोजींची ख्याती तर इंग्लंडपर्यंत पसरली होती. असें असतांही राजधान्यांचीं महत्वाचीं ठिकाणें सोडून कॉंग्रेसची पहिली बैठक भरविण्याचा मान सर्वानुमतें प्रथम पुणें शह-

रालाच देण्यांत आला यांतच त्या वेळचें महाराष्ट्राचें राजकारणांतील पहिलें स्थान प्रतीत होतें. मद्रास येथें ज्या सभेंत कॉंग्रेस भरविण्याची योजना निश्चित करण्यांत आली त्या सभेंत वस्तुतः पुण्याचे प्रसिद्ध पुढारी कोणीच हजर नव्हते. सी. विजयरंगा मुदलियार व पांडुरंग गोपाळ हीं दोन नांवें हजर असलेल्या मंडळींत पुण्याचीं म्हणून दिलेलीं आहेत. पण त्यांच्यावर विसंबून कॉंग्रेसची पहिली बैठक पुण्याला भरविण्याचें ठरविलें असावें हें म्हणणें कोणालाही पटणार नाहीं. सदर्हू सभेमध्यें श्री. विश्वनाथ नारायण मंडलीक व काशिनाथ त्र्यंबक तेलंग हे दोन महाराष्ट्रीय गृहस्थ मुंबईतर्फे हजर होते. त्यांचा ओढा पुण्यापेक्षां मुंबईकडेच अधिक असणार. अर्थात् पुण्याला कॉंग्रेस भराविण्याचें ठरविण्याला पुष्कळ अंशीं रानडेच कारणीभूत झाले असले पाहिजेत. दुसरें कारण पुण्याची " सार्वजनिक सभा " असावी. या सभेनें राजकीय चळवळीला बरीच मोठी चालना देऊन आपल्याकडे सर्व देशाचें लक्ष वेधून घेतलें होतें. पहिली कॉंग्रेस पार पाडण्याची सर्व प्रकारची जबाबदारी या सभेनें आपणाकडे घेतली होती, यावरून वरील तर्क दृढ होतो. आयत्या वेळीं कॉलऱ्याची सांथ उद्भवून कॉंग्रेस पुण्यांत भरूं शकली नाहीं ही गोष्ट निराळी.

मुंबईला भरलेल्या पहिल्या अधिवेशनांत नूलकर, गोपाळ गणेश आगरकर, वामन शिवराम आपटे, काशिनाथ त्र्यंबक तेलंग, सीतारामपंत चिपळूणकर इत्यादि महाराष्ट्रीय मंडळी हजर होती. रानडे आणि भांडारकर हेही हजर होते. पण सरकारी नोकर असल्यामुळें प्रतिनिधी म्हणून त्यांना सभेच्या कार्यांत उघडपणें कोणताही भाग घेतां आला नाहीं. रानड्यांच्या मृत्यूपर्यंत कॉंग्रेसचीं १६ अधिवेशनें झालीं. पण वरील शृंखलेमुळें रानडे यांना एकाही अधिवेशनामध्यें भाषण करतां आलें नाहीं ! तथापि त्यांच्याबद्दल कॉंग्रेसला कृतज्ञता वाटत होती हें त्यांच्या मृत्यूबद्दल कॉंग्रेसनें पास केलेल्या दुःखप्रदर्शक ठरावावरून व्यक्त होतें. कॉंग्रेसच्या बरोबरीनें भरणाऱ्या सामाजिक परिषदेमध्यें मात्र रानडे उघडपणें आणि प्रामुख्यानें भाग घेत असत.

पहिल्या कॉंग्रेसमध्यें काशिनाथ त्रिंबक तेलंग व सीतारामपंत चिपळूणकर यांचीं भाषणें झालीं. माधवराव नामजोशी यांनीं बऱ्याच अधिवे-

शनांमध्यें भाषणें केलेलीं आहेत. नातु, के. व्ही. जोशी, मुंबईचे समर्थ, दा. ग. पाध्ये, नारायण विष्णु गोखले, सोलापूरचे सामंत, धुळ्याचे शंकरराव देव, पुण्याचे शिवराम महादेव परांजपे, न. चिं. केळकर, प्रो॰ काळे, माधवराव बोडस, साताऱ्याचे गणपतराव फणसळकर व आगाशे यांनीं कॉंग्रेसमध्यें भाषणें केलेलीं आहेत. तथापि प्रामुख्यानें उल्लेख करावयाचा तर गोपाळराव गोखले, लोकमान्य टिळक, दादासाहेब करंदीकर, रंगनाथ नरसिंह मुधोळकर, नारायण गणेश चंदावरकर, दादासाहेब खापर्डे आणि दाजी आबाजी खरे यांचीं नांवें घ्यावीं लागतील. हीं नांवें अर्थातच कॉंग्रेसच्या पहिल्या राजवटीला उद्देशून दिलीं आहेत. पुढें केळकर, अणे, डॉ मुंजे, बॅ. अभ्यंकर, गंगाधरराव देशपांडे हीं नांवें ऐकूं येऊं लागलीं. गोपाळराव गोखले, चंदावरकर आणि मुधोळकर यांना कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाचा मान मिळालेला आहे. लो॰ टिळक यांना तो मिळूं शकला नाहीं हा केवळ योगायोग होय. १९०६ सालीं कलकत्ता येथें व १९०७ सालीं नागपूर येथें त्यांना अध्यक्ष करण्याचा बेत चालला होता. पण कॉंग्रेसच्या तत्कालीन सूत्रचालकांना यांचीं मतें पचण्यासारखीं नसल्यामुळें त्यांना तो मान मिळाला नाहीं. दिल्ली येथें भरणाऱ्या कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावर त्यांची निवडही झाली होती. पण चिरोल केसकरितां ते विलायतेला गेले असल्यामुळें तोही योग फुकट गेला. १९२० सालीं सप्टेंबर महिन्यांत कलकत्ता येथें भरणाऱ्या जादा अधिवेशनाकरितां पुन्हां त्यांचें नांव सुचविण्यांत आलें. पण अध्यक्षाच्या खुर्चीवर बसून हात बांधून घेण्यापेक्षां मोकळे राहून वादविवादांत भाग घेणेंच त्यांना अधिक पसंत असल्यामुळें त्यांनीं आपण होऊन लाला लजपतराय यांचें नाव सुचविलें होतें. टिळक अध्यक्ष नव्हते तरीही १९१६ नंतर ज्या ज्या अधिवेशनाला ते हजर राहिले, त्या त्या वेळीं अध्यक्षापेक्षांही त्यांचा मान मोठा राखण्यांत आला. विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकांत गोखले यांच्या तंत्रानें व १९१६ नंतर टिळकांच्या तंत्रानें राष्ट्रीय सभेचीं सूत्रें मुख्यतः हालत असत. रा. ब. मुधोळकर २०।२२ वर्षें नियमानें हजर राहून कॉंग्रेसच्या कार्यांत प्रामुख्यानें भाग घेत असत. गोखले व दाजी आबाजी खरे हे कांहीं वर्षें राष्ट्रीयसभेचे एक चिटणीस होते.

मोठा त्याग, अमोघ वक्तृत्व आणि जबर व्यासंग या गुणांवर गोखले

यांनीं थोड्याच वर्षांत काँग्रेसवर आपली छाप बसविली. पहिल्या प्रतीच्या पुढाऱ्यांत त्यांची गणना होऊं लागली. १९०४ सालीं विलायतेंत चळवळ करण्याकरितां काँग्रेसचा प्रतिनिधी पाठविण्याचें ठरलें तेव्हां सर्वांची नजर प्रथम गोखले याचेवर गेली. विलायतेंत त्यांनीं केलेल्या कामगिरीचें पारितोषिक म्हणून पुढील वर्षी त्यांची कॉं. च्या अध्यक्षस्थानीं निवड झाली. अध्यक्षपदावरून त्यांनीं केलेलें भाषण कॉंग्रेसच्या इतिहासांत संस्मरणीय होऊन राहील. गोखले यांचें काँग्रेसवरील वजन पाहून भारतमंत्री लॉर्ड मोर्ले यांनीं १९०९ सालीं दिलेल्या राजकीय सुधारणांचा कच्चा मसुदा त्यांना दाखविला होता.

१९०७ सालीं सुरत काँग्रेस मोडली त्या वेळीं गोखले आणि टिळक हे परस्परविरुद्ध लढतांना दिसले. देशांतील चळवळीच्या पद्धतीसंबंधानें त्यापूर्वीं तीन चार वर्षांपासून मतभेद व्यक्त होऊं लागलेच होते. त्यांचेंच पर्यवसान काँग्रेस मोडण्यांत झालें. सुरतेला अरविंद घोष यांच्या सहकार्यानें टिळकांनीं नवीन राष्ट्रीय पक्षाची मुहूर्तमेढ रोविली. नवीन पक्षाच्या जाहीरनाम्यावर डॉ. मोरेश्वर गोपाळ ऊर्फ नानासाहेब देशमुख, दादासाहेब खापर्डे यांच्याही सह्या होत्या. टिळकांवर पुढें लवकरच राजद्रोहाचा खटला झाल्यामुळें सहा वर्षांनीं तुरुंगांतून सुटून येईपर्यंत या नवीन पक्षाच्या हातून फारसें कार्य झालें नाहीं. उलटपक्षीं मोर्ले–मिंटो सुधारणांवर संतुष्ट होऊन नेमस्तांनींही फारशी हालचाल केली नाहीं. काँग्रेस कशीबशी जिवंत होती एवढेंच. नेमस्ताचें क्रीड मान्य करून १९१६ सालीं लखनौला टिळक काँग्रेसमध्यें घुसले व त्यांनीं ती काबीज केली. त्याच वर्षीं स्वराज्यसंघाची स्थापना करून त्यांनीं एका नवीन चळवळीचा पायंडा घातला होता. वंगभंगामुळें बंगालमध्यें सुरू झालेल्या स्वदेशी आणि बहिष्काराच्या चळवळीला अखिल भारतीय स्वरूप देणारांमध्यें टिळक प्रमुख होते. त्यांच्यावर झालेल्या राजद्रोहाच्या तीन खटल्यानीं देशांत मोठी जागृती करून काँग्रेसच्या चळवळीला अप्रत्यक्ष साहाय्य केलें ही गोष्ट नाकबूल करतां येणार नाहीं. चिरोल केसच्या निमित्तानें ते विलायतेस गेले तेव्हां पार्लमेंटरी कमिटीपुढें त्यांची साक्ष झाली. विलायतेंतील कॉं. कमिटी व तिच्यातर्फे चालणारें ‘ इंडिया ’ पत्र त्यांच्याच खटपटीनें काँग्रेसच्या धोरणाबरहुकूम चालूं लागलें. १९१६ सालीं लखनौ

येथें झालेल्या हिंदु-मुसलमानांच्या कराराचे जनक लो. टिळक आहेत ही गोष्ट प्रसिद्ध आहे. १९१९ सालीं अमृतसरच्या कॉंग्रेसमध्यें मॉंटेग्यु-चेम्सफर्ड सुधारणांवर मतप्रदर्शन करण्याचा प्रसंग आला त्या वेळीं टिळकांच्या वजनामुळेंच त्या सुधारणा अपुऱ्या आणि निराशाजनक ठरविण्यांत आल्या. असें होतें तरी त्या सुधारणांचा शक्य तेवढा फायदा करून घेण्यास टिळक तयार होते. म्हणूनच अमृतसरहून परत येतांच नवीन कौन्सिलच्या निवडणुकी लढविण्याकरितां त्यांनीं ' कॅांग्रेस डेमोक्रॅटिक पक्षा 'ची स्थापना केली.

महात्मा गांधींची असहकारितेची योजना टिळकांना समजली होती. तत्त्वतः त्यांना ती मान्य होती. पण तपशीलाच्या बाबतींत गांधींशीं त्यांचा मतभेद होता. असहकारितेची चळवळ सुरू होण्याच्या दिवशींच लोकमान्य टिळक वारले व कॉंग्रेसचीं सूत्रें गांधींच्या हातांत आलीं. गांधींचा असहकारितेचा कार्यक्रम महाराष्ट्राला प्रथमपासून मान्य नव्हता. ही गोष्ट महाराष्ट्रीय पुढाऱ्यांनीं केव्हांही लपवून ठेविली नाहीं हें कलकत्ता येथील जादा अधिवेशनांत त्यांनीं काढलेल्या उद्गारांवरून लक्षांत येईल. पं. मोतिलाल नेहरू यांचेखेरीज देशांतील त्या वेळचे सर्व नामांकित पुढारी महाराष्ट्राच्या बाजूला होते हें लक्षांत ठेविलें पाहिजे. पण शिस्तीकरितां आणि सरकारी दडपशाहीस एकीनें तोंड देण्याकरितां आपल्या मतभेदाचें पर्यवसान त्यांनीं कॉंग्रेसमधून फुटून निघण्यांत केलें नाहीं. महात्मा गांधींनीं एक वर्षांत स्वराज्य मिळवून देण्याची योजना मांडल्यामुळें त्यांना वर्षभर संधि द्यावी असा सर्वांनीं विचार केला. व मतभेद असतांही असहकारितेच्या कार्यक्रमांत अहमहमिकेनें सर्व लोक सामील झाले. वर्षाची मुदत संपतांच चळवळीला अनिष्ट वळण मिळत आहे असें पाहून महाराष्ट्रीय पुढाऱ्यांनीं असहकारितेच्या चळवळींतील वैगुण्यें दाखविण्यास धिटाईनें सुरवात केली. यामुळें असहयोगी लोक त्यांना बंडखोर म्हणूं लागले. पण महाराष्ट्रानें गांधींचा विश्वासघात केला असें म्हणतां येणार नाहीं. कारण त्यांच्या मतभेदाची खुद्द गांधींना प्रथमपासून पूर्ण जाणीव होती.

" The Maharashtra party is a capable and drilled body. It has adopted the programme more

from loyalty to the Congress and the rule of majority than from deep conviction. It is giving a trial to a programme in which it has not implicit faith." असे उद्गार गांधींनीं १९२१ सालीं नोव्हेंबरमध्यें 'यंग इंडिया' त काढलेले आहेत. महाराष्ट्राप्रमाणेंच इतर प्रांतांतील ज्या पुढाऱ्यांचीं मतें होतीं, त्यांनीं तीं महाराष्ट्राप्रमाणें वेळींच धिटाईनें बोलून न दाखविल्यामुळें महाराष्ट्राला त्यांचेकडून पाठिंबा मिळाला नाहीं. दुसरें असें कीं टिळकांच्या तोलाचा मोठा पुढारी महाराष्ट्रांत नसल्यामुळें महाराष्ट्राची विचारसरणी तर्कशुद्ध असूनही इतर प्रांतांवर तिची छाप त्यांना बसवितां आली नाहीं. पुढें बाबू चित्तरंजन दास व पं. मोतिलाल नेहरू यांच्या आधिपत्याखालीं गया येथें १९२२ अखेर स्वराज्यपक्षाची स्थापना झाली त्याचें बरेंचसें श्रेय श्री. केळकर यांनाच दिलें पाहिजे. कायदेभंग कमिटीपुढील केळकरांच्या साक्षीचा कमिटीच्या कांहीं सभासदांवर चांगला परिणाम झाला व त्याचेंच पर्यवसान स्वराज्यपक्षाच्या स्थापनेंत झालें. केळकर, जयकर, अणे व मुंजे हे स्वराज्यपक्षाचे आधारस्तंभ गणण्यांत येऊं लागले. इतक्यांत दिवाणगिऱ्या स्वीकारण्याच्या बाबतींत स्वराज्यपक्षांत मतभेद होऊन या चारही सभासदांना स्वराज्यपक्षाचा राजीनामा देऊन स्वतंत्र प्रतिसहकार पक्ष काढावा लागला. १९३३ सालीं या प्रतिसहकार पक्षानेंच लोकशाही स्वराज्यपक्ष हें नवें नांव धारण केलें.

वारंवार प्रदर्शित केलेल्या या मतभेदांमुळें महाराष्ट्र कॅांग्रेसमधला बंडखोर ठरला. टिळकांच्या मृत्यूनंतर महाराष्ट्राचें कॅांग्रेसमधील प्रमुख स्थान नष्ट होऊन तें इतकें खालीं गेलें कीं, महाराष्ट्र म्हणजे कॅांग्रेसमध्यें उपहासाचा विषय होऊन बसला. याची मीमांसा करूं लागल्यास बराच विस्तार करावा लागेल. गेल्या पंधरा वर्षांत कॅांग्रेसनें ज्या ज्या चळवळी केल्या त्या त्या प्रत्येकींमध्यें महाराष्ट्रानें इतर पुढारलेल्या प्रांतांच्या बरोबरीनें कामगिरी करून दाखविली आहे. पण तरीही तो उपहासाचा विषय होतो याचें कारण प्रसंग पडेल त्या वेळेला सत्य बोलण्यास तो कधींही माघार घेत नाहीं.

केळकर व अणे कांहीं वर्षें कॅा. वर्किंग कामिटींत होते. पण तेथें त्यांची भूमिका विरोधकाचीच राहिली. शेवटच्या कायदेभंगाच्या चळवळींत कांहीं



**सर फरोजशहा मेथा**

कलकत्ता–१८९०



**पं. जवाहरलाल नेहरू**

लाहोर–१९२९



**बाबु आनंदमोहन बसु**

मद्रास–१८९८



**बाबु राजेंद्रप्रसाद**

मुंबई–१९३४



सर शंकरन् नायर

अमरावती--१८९७



पं. बिशन नारायण धार

कलकत्ता--१९११



डॉ. रास बिहारी घोष

सूरत–१९०७ मद्रास–१९०८



श्री. रमेशचंद्र दत्त

लखनौ–१८९९

महिने लो० ना० अणे काँग्रेसचे सर्वाधिकारी होते. चळवळ चालू असतां १९३३ च्या जुलै महिन्यांत पुणें येथें भरलेल्या हिंदुस्थानांतील काँग्रेस कार्यकर्त्यांच्या परिषदेचे तेच अध्यक्ष होते. याच वर्षी सरकारी विरोधास न जुमानतां कलकत्ता येथें काँग्रेसचें जें अधिवेशन भरविण्यांत आलें त्याचा पुढाकार लो. अणे यांचेकडे होता. 'जातीय निर्णयावर' काँग्रेसनें स्वीकारलेली भूमिका कशी अराष्ट्रीय आहे हें प्रथम बोलून दाखविण्याचें धाडस त्यांनीं केलें. याच कारणामुळें वर्किंग कमिटीचा राजिनामा देऊन पं. मालवीयजींच्या सहकार्यानें त्यांनीं 'काँग्रेस राष्ट्रीय पक्ष' काढला. हल्लीं या पक्षाचे ते असेंब्लींतील पुढारी आहेत. काँग्रेस कौन्सिल–प्रवेशाकडे वळण्याला त्यांचे श्रम पुष्कळ अंशीं कारणीभूत झालेले आहेत. १९२६ सालीं कानपूर काँग्रेसच्या अध्यक्षपदाकरितां सौ. सरोजिनी नायडू यांचे खालोखाल केळकरांना मतें पडलीं होतीं. बुद्धि गहाण टाकण्याचा त्याग त्यांनीं केला असता तर श्रीनिवास अय्यंगार यांचे आधीं त्यांचा नंबर लागण्यास कांहींच हरकत नव्हती. आतांच्या महाराष्ट्रीय पुढाऱ्यांत पाहिल्या प्रतीची धडाडी नसेल, पण त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल शंका घेणें योग्य होणार नाहीं.

कौन्सिलप्रवेशाच्या समर्थनाकरितां चौदा वर्षें महाराष्ट्र जें बोलत होता तेंच १९३४ सालीं महात्माजी आणि काँग्रेस बोलूं लागली. कलकत्त्याच्या जादा अधिवेशनांतच कौन्सिलप्रवेशाविषयीं महाराष्ट्राचा हट्ट पुरविला गेला असता तर पुढील मतभेद एवढे विकोपास गेले नसते. उलटपक्षीं विरुद्ध पक्षाला थोडीसुद्धां संधि न देतां महाराष्ट्र प्रथमपासूनच आपल्या तत्त्वाला चिकटून राहिला असता तरीही बरें झालें असतें असें आतां वाटूं लागतें. कारण गांधींना संधि देण्याकरितां कांहीं दिवस त्यांच्या कार्यक्रमाचें जोरानें समर्थन करावयाचें व पुढें उलटून त्याच कार्यक्रमाची चेष्टा करावयाची अशा प्रकारच्या धोरणानें सामान्य समाजाचा त्या पुढाऱ्यांवरील विश्वास उडाल्यासारखा झाला. मतभेदामुळें काँग्रेसमधून फुटून निघणाऱ्या नेमस्तावर महाराष्ट्रीय पुढाऱ्यांनीं टीकेचे जे प्रहार केले तेंच पुढें अगदीं थोड्याच अवकाशात त्यांनाही लागू पडूं लागले हा दैवयोग विचित्र आहे. तर्कदृष्ट्या महाराष्ट्राची विचारसरणी कोणाला खोडून काढतां आली नाहीं. भावनेचा ओघ वाहून गेल्यावर काँग्रेसला वेळोवेळीं ती विचारसरणी पटली आहे आणि पुढेंही पटेल.

आपली विचारसरणी पटवून देण्यास महाराष्ट्राजवळ गोखले किंवा टिळक यांच्या तोलाचा पुढारी नाहीं. सर्व दुय्यम दर्जाचे पुढारी आहेत. त्यामुळें तर्कदृष्ट्या बाजू भक्कम असूनही आपला प्रभाव इतर प्रांतांवर ते पाडूं शकले नाहींत. कधीं दासबाबू तर कधीं पं. मोतिलाल यांच्या निशाणाखालीं जाऊन त्यांना आपलें तेज दाखवावें लागलें. पण तें छत्र उडालें कीं पुन्हां ते उघडे पडत. सर्वसामान्य समाज विचारापेक्षां आचाराला अधिक महत्त्व देतो विचार सदोष असूनही थक्क करणाऱ्या आपल्या कृतीनें गांधींनीं अगदीं थोड्या अवधींत बहुजनसमाजाला वश करून घेतलें. उलटपक्षीं महाराष्ट्राची सर्व शक्ति युक्तिवादांतच खर्च झाली. कौन्सिलप्रवेशाखेरीज कोणताही कार्यक्रम त्याला जनतेसमोर ठेवतां आला नाहीं. आणि एकादा ठेवला असता तरी कायदेभंगाच्या कार्यक्रमासमोर तो निस्तेज दिसला असता. आजच्या परिस्थितींत कायदेभंग हाच आत्यंतिक स्वरूपाचा कार्यक्रम आहे. अर्थात् त्याखेरीज मांडलेला कोणताही कार्यक्रम हा कमी प्रतीचा ठरणार. आजचे जहाल ते उद्यांचे मवाळ हा जगाचा नियम आहे. टिळकांच्या राष्ट्रीय पक्षाचा उदय झाल्यावर पूर्वीचा काँग्रेसपक्ष नेमस्त ठरला. गांधींची असहकारिता सुरू झाल्यावर टिळकांचा राष्ट्रीयपक्ष नेमस्तांत जमा झाला. आणि आतां सोशालिस्टांच्या उदयाबरोबर लवकरच गांधीपक्षही नेमस्त ठरल्यावाचून रहाणार नाहीं. हा केवळ कालाचा महिमा आहे. विचाराची क्रांती सारखी होत असल्यामुळें जुन्या पिढीला नवीन विचार रुचत नाहींत आणि पचत नाहींत. हा नियमच समजून जुन्या पुढाऱ्यांना दोष देऊं नये हें बरें. काँग्रेसमध्यें महाराष्ट्राला पूर्वीचें स्थान मिळण्याचा तूर्त तरी संभव दिसत नाहीं. सोशालिस्टांच्या अमदानींत कदाचित तें मिळेल. स्वतःचें इंग्रजी वर्तमानपत्र आणि इंग्रजी व हिंदी भाषेंतील वक्तृत्व या दोन उणीवा महाराष्ट्र भरून काढील तर त्याला पुढें येण्यास वेळ लागणार नाहीं. बाकीचे गुण इतर प्रांतांच्या निदान बरोबरीनें त्याच्याजवळ खास आहेत.

( ५ )

# काँग्रेस व सरकार

—————:०:—————

काँग्रेससारखी एकादी अखिल भारतीय संस्था असावी असे विचार पूर्वी पुष्कळ हिंदी पुढाऱ्यांच्या मनात आले असले तरी कॉंग्रेसला प्रत्यक्ष जन्म देण्याचें श्रेय मि. ए. ओ. ह्यूम या इंडियन सिव्हिल सर्व्हिसमधील बड्या अधिकाऱ्याकडे आहे हें मागें सांगितलेंच. १८८२ मध्यें मि. ह्यूम राजिनामा देऊन सरकारी नोकरींतून मोकळे झाले व सिमल्याला बसून आपल्या कल्पनेला मूर्त स्वरूप कसें देतां येईल याचा विचार करूं लागले. सर्व ठिकाणच्या प्रमुख हिंदी पुढाऱ्यांशीं पत्रव्यवहारानें किंवा समक्ष चर्चा करून त्यांनीं एक कच्ची योजना ठरविली. 'ब्रिटिश सरकारवर अढळ निष्ठा ठेवून अवश्य त्या वेळीं सरकारच्या अयोग्य कृत्यांना विरोध करावयाचा' या मुख्य मनोभूमिकेवर या योजनेची सर्व इमारत उभारलेली होती. ह्यूम यांनीं आपली योजना त्या वेळचे व्हाइसरॉय लॉर्ड डफरिन यांना दाखविली. तेव्हां एक महत्वाची गोष्ट घडून आली. नवीन संघटनेचा उपयोग फक्त सामाजिक सुधारणेकडेच करावा असें हयूम यांचें म्हणणें होतें. लॉर्ड डफरिन यांनीं 'सामाजिक' शब्द काढून त्या जागीं 'राजकीय' हा शब्द सुचवला. ज्या राजकीय शब्दांचें आज सरकारला एवढें वावडें झालें आहे तो शब्द खुद्द व्हाइसरॉयनेंच सुचविला हें ऐकून आज कोणीहि थक्क होईल. आजच्या सरकारी अधिकाऱ्यांना मोठी लाज वाटेल ! शब्दांत-

याचें समर्थन करतांना लॉर्ड डफरिन म्हणाले कीं, लोकांचें मनोगत समजून घेण्याला मला फारच त्रास पडतो. त्याकरितां एकादी जबाबदार संस्था अस्तित्वांत येईल तर फार चांगलें ! त्या वेळीं हिंदुस्थानांत लोकनियुक्त कायदेमंडळें नव्हतीं. म्हणून अशा संस्थेचा ब्रिटिश पार्लमेंटांतील Opposition ( विरोधी पक्ष ) सारखा उपयोग होईल असें त्यांचें म्हणणें होतें. पूर्वीच्या सामाजिक शब्दावर लॉर्ड डफरिन यांनीं असा आक्षेप घेतल्याचें सांगतात कीं, हिंदुस्थानांत अनेक जाती, धर्म आणि पंथ असल्यामुळें स्थानिक परिस्थितीप्रमाणें त्या त्या लोकांनीं आपले सामाजिक प्रश्न सोडवावे. त्याकरितां अखिल भारतीय संस्थेची जरूरी नाहीं. या नवीन संस्थेचें अध्यक्षस्थान त्या त्या प्रांतांतील गव्हर्नरला देण्यांत यावें म्हणजे जनतेचे विचार प्रत्यक्ष त्याला ऐकावयास सांपडतील, ह्या ह्यूम साहेबांच्या कल्पनेलाहि लॉर्ड डफरिन यांनीं विरोध केला. गव्हर्नर हजर राहील तर त्याचे समोर लोक मनमोकळेपणानें बोलणार नाहींत असें ते म्हणाले. व्हाईसरॉयसाहेबांचा हा सल्ला ह्यूमसाहेबांना तावडतोब पटला. मग देशांतील पुढाऱ्यांनाहि तो पटला हें सांगण्याचें कारण नाहीं. ‘ काँग्रेसच्या बाबतींत मी सल्ला दिला ही गोष्ट मी व्हाइसरॉयच्या गादीवर असेपर्यंत षट्कर्णी होतां कामा नये ’ असें लॉर्ड डफरिन यांनीं ह्यूमसाहेबांना बजावून सांगितलें होतें असें म्हणतात !

आपली योजना दाखविण्याकरितां ह्यूमसाहेब धांवत धांवत इंग्लंडांतहि जाऊन आले. तेथें त्यांनीं माजी व्हाइसरॉय लॉर्ड रिपन यांची भेट घेतली. पार्लमेंटच्या सुमारें दीडशें सभासदांबरोबर चर्चा केली. लिबरल पक्षाच्या पत्रांतून हिंदुस्थानांतील चळवळींना प्रसिद्धी मिळेल अशी व्यवस्था केली. हीं कामें करून नोव्हेंबर महिन्यांत ते परत आले. पुढील डिसेंबरच्या अखेरीस काँग्रेसची पहिली बैठक झाली. सरकारच्या सहकार्यानें काँग्रेसचें काम चालणार आहे हें दाखविण्याकरितां पहिल्या बैठकीचें अध्यक्षस्थान गव्हर्नर लॉर्ड रे यांना देण्यांत यावें अशी एक सूचना पुढें आली होती. पण लॉर्ड डफरिन यांचा सल्ला विरुद्ध पडल्यामुळें ती सूचना मागें पडली !

मुंबई येथें भरलेल्या पहिल्या अधिवेशनाला प्रेक्षक म्हणून बरेच सरकारी अधिकारी हजर होते. रानडे यांनीं तर भाषण देखील केलें. अधिवेशन आटोपलें त्या वेळीं राणीसरकारांचा सर्वांनीं मोठा जयजयकार केला.

दुसरें अधिवेशन कलकत्त्याला म्हणजे लॉर्ड डफरीन यांच्या राजधानींत भरलें. तेव्हां व्हाइसरॉयांनीं प्रमुख प्रतिनिधींना एक मोठी गार्डन पार्टी दिली. खुद्द अधिवेशनांतही सरकारी अधिकारी प्रतिनिधींमध्यें मोकळेपणानें वावरले. मद्रासला भरलेल्या तिसऱ्या काँग्रेसला आपण स्वतः हजर रहावें अशी तेथील गव्हर्नर लॉर्ड कॉनेमरा यांची फार इच्छा होती. पण 'तुम्हीं स्वतः काँग्रेसमध्यें जाण्यापेक्षां काँग्रेसच्या लोकांनाच तुमच्या बंगल्यावर बोलवा' असा लॉर्ड डफरिन यांनीं सल्ला दिल्यावरून त्यांनीं तसें केलें ! गव्हर्नमेंट हाऊसवर सरकारी बँडच्या निनादांत काँग्रेसच्या प्रतिनिधींना भरभक्कम मेजवानी दिली. मद्रासचे शेरीफ सर शिवालय रामस्वामी मुदलियार व हायकोर्टातील इंग्रज बॅरिस्टर मि. अर्डले नॉर्टन यांनींही काँग्रेसच्या प्रतिनिधींना अल्पाहार दिला.

पण सरकारी कृपेची पाखर तीन वर्षांतच खलास झाली. चौथी बैठक अलाहाबादला भरली तेव्हां सरकारी विरोधामुळें काँग्रेस भरविण्याला जागा मिळण्यापासून अडचणी उत्पन्न झाल्या. जी जी जागा शोधावी ती ती सरकारनें प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष वजन पाडून मिळूं देऊं नये. शेवटीं दरभंग्याच्या महाराजांनीं आपली नुकतीच विकत घेतलेली जागा स्वागत कमिटीच्या स्वाधीन केली आणि तेथें चवथें अधिवेशन पार पडलें. संयुक्तप्रांताचे ले. गव्हर्नर सर ऑक्लंड कॉल्व्हिन हे या विरोधाच्या मुळाशीं होते. सरकारी विरोधाला साथ देण्याचे काम 'पायोनियर' सारखीं ॲंग्लो इंडियन पत्रें मोठ्या निष्ठेनें करीत होतीं ! स्वतः लॉर्ड डफरिन यांच्या मनांतही काँग्रेसबद्दल किंतु उत्पन्न झाला होता असें ३० नोव्हेंबर १८८८ रोजीं कलकत्ता येथें त्यांना केलेल्या एका भाषणावरून दिसून आलें. पण त्याबद्दल विलायतेंत मि. ब्रॅडलॉ या हिंदहितैषी सद्गृहस्थांनीं त्याचा खरपूस समाचार घेतल्यावर 'काँग्रेसबद्दल मला पूर्ण सहानुभूति आहे; ती राजद्रोही आहे असें सूचित करण्याचा माझा उद्देश नव्हता.' असा त्यांना पत्रद्वारें खुलासा करावा लागला !

इ. स. १८९० मध्यें कलकत्ता येथें भरलेल्या काँग्रेसमध्यें सरकारी विरोधाची ठिणगी पुनः उडाली. प्रत्येक अधिवेशनाचे वेळीं बड्या सरकारी अधिकाऱ्यांना स्वागत कमिटीकडून प्रेक्षकाचीं तिकिटें पाठविण्यांत येत असत. या वर्षी बंगाल सरकारनें एक सर्क्युलर काढून सरकारी अधिकाऱ्यांना काँग्रेसच्या सभेंत हजर राहण्याची आणि तींत भाग घेण्याची मनाई केली. बंगा-

लच्या ले. गव्हर्नरला व त्यांच्या कुटुंबियांना गेलेलीं सात तिकिटें सेक्रेटरी-मार्फत परत करण्यांत आलीं. बंगाल सरकारच्या या प्रवृत्तीविरुद्ध व्हाइसरॉयांचेकडे तक्रार केली असतां जें उत्तर मिळालें तें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. यावेळीं लॉर्ड डफरिन जाऊन त्यांचे जागीं लॉर्ड लॅन्सडाऊन आले होते. कॉंग्रेस विरुद्ध त्यांचे मन फारसें कलुषित झालें नव्हतें असें दिसतें. बंगाल सरकारनें हिंदुस्थान सरकारच्या हुकुमाचा विपर्यास केला आहे असें वरील उत्तरांत म्हटलें होतें. सरकारी अधिकाऱ्यांना कॉंग्रेसच्या अधिवेशनांत हजर राहण्याची बंदी नसून त्यांत प्रत्यक्ष भाग घेण्याची ( Participation ) बंदी होती. आणि ही बंदी देखील प्रत्यक्ष सरकारी नोकरींत असणारापुरतीच मर्यादित होती. पेन्शरांना ही बंदी नव्हती. एवढा खुलासा करूनच लॉर्ड लॅन्सडाऊन थांबले नाहींत. कॉंग्रेस ही पूर्ण कायदेशीर ( Perfectly legitimate ) संस्था आहे, असें त्यांनीं स्वतःचें मत सांगितलें. युरोपांत कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाच्या जोडीला पुढारलेल्या विचाराचा लिबरल पक्ष असतो त्याप्रमाणें हिंदुस्थानांतील कॉंग्रेस आहे, सरकार आपलें धोरण पक्षातीत आणि तटस्थ ठेवील, असेंहि वरील उत्तरांत म्हटलें होतें. यावरून ॲंग्लो–इंडियन पत्रकारांचा कॉंग्रेस विरुद्ध प्रथमपासून जळफळाट चालला होता आणि खालचे अधिकारी संधी सांपडेल त्या वेळीं काटे पसरण्याचे काम करीत होते, तरी सर्वांत उत्युच्च हिंदुस्थान सरकार कॉंग्रेसकडे पुष्कळ वर्षेपर्यंत निर्मळ दृष्टीनेंच पहात होतें असें म्हटलें पाहिजे.

लॉर्ड कर्झन आल्यावर सर्वत्र अरेरावी कारभार सुरू झाला. त्यात सरकारची कॉंग्रेसबद्दलची वृत्तीही पालटली. १९०४ सालीं मुंबईस भरलेल्या कॉंग्रेसचे अध्यक्ष सर हेन्री कॉटन (हेही सेवानिवृत्त सरकारी अधिकारी होते) कॉंग्रेसनें पास केलेले ठराव व्हाइसरॉयांना समक्ष सादर करण्याकरितां गेले असतां कर्झन साहेबांनीं त्यांची भेट घेण्याचें साफ नाकारलें ! कर्झन साहेबांच्या दडपशाहीचा जोर जसजसा वाढला तसतसा सरकारच्या निषेधाचा कॉंग्रेसचा सूरही वाढला. पण तरीही कॉंग्रेस विरुद्ध फारशी तक्रार करण्याला सरकारला जागा नव्हती. कांग्रेस सर, रावबहादूर, सी. आय. ई. इत्यादि सरकारी किताबवाल्यांच्या हातांतच होती. जुन्या–नव्या पक्षांत भांडणें होऊन सुरत कॉंग्रेस मोडली हें पाहून सरकारला मनांतून आनंदच झाला असावा. दडप-

शाहीचें सुदर्शन चक्र सर्व देशभर फिरत होतें. आणि क्रांतिकारक तरुण अत्याचार करून आपल्या परीनें त्याला तोंड देत होते. पण या अत्याचारांचा संबंध सरकारला कॉंग्रेसपर्यंत नेऊन भिडवतां न आल्यामुळें कॉंग्रेसवर सरकारची खप्पा मर्जी होण्याचें कांहीं कारण नव्हतें. मोर्ले-मिंटो सुधारणांचा तुकडा तोंडावर फेंकून देऊन सरकारनें नेमस्त पुढाऱ्यांना आणि पर्यायानें त्यांच्या हातांतील कॉंग्रेसला वश करून घेतलें. सुरतेनंतर मद्रास येथें भरलेल्या कॉंग्रेसमध्यें राजनिष्ठेच्या ठरावाला अग्रस्थान मिळून तो स्वतः अध्यक्षांनीं पुढें मांडला. १९११ सालीं बादशहांनीं स्वतः इकडे येऊन वंगभंग रद्द केल्यामुळें त्या वर्षीच्या कॉंग्रेसमध्यें जिकडे तिकडे बादशहांचा जयजयकार ऐकू आला यांत नवल नाहीं.

कॉंग्रेस भरलेली प्रत्यक्ष डोळयांनीं पहाण्याची मद्रासचे गव्हर्नर लॉर्ड कॉनमॅरा यांची १८८७ सालीं अतृप्त राहिलेली इच्छा १९१४ सालीं लॉर्ड पेंटलंड यांनी पूर्ण करून घेतली ! त्या वर्षी मद्रास येथें भरलेल्या कॉंग्रेसला कांहीं वेळ ते स्वतः हजर राहिले. त्यांना सर्वांनीं उत्थापन दिलें. ते येतांच दुसऱ्या ठरावावर चाललेलें भाषण अर्धेंच बंद करून राजनिष्ठेचा व महायुद्धांत सरकारला सर्वतोपरी साहाय्य करण्याचा ठराव हातांत घेण्यात आला. या ठरावावर भाषणें करण्याची प्रतिनिधींमध्यें अहमहमिका लागली. ठराव पास झाल्यावर अध्यक्षांनीं मानलेल्या आभारांचा स्वीकार करून टाळयांच्या कडकडाटांत गव्हर्नरसाहेब निघून गेले. राजेसाहेबांचा प्रतिनिधि कॉंग्रेसच्या अधिवेशनाला हजर रहाण्याचा हा पहिला ( आणि शेवटचा ! ) प्रसंग होय ! लॉर्ड कॉनमॅरा व लॉर्ड पेंटलंड यांचा कॉंग्रेसला हजर रहाण्याचा उद्देश मात्र वेगवेगळा होता हें स्पष्ट करून सांगण्याची जरूरी नाहीं. पुढें अडीच वर्षांनीं पेंटलंडसाहेबांनीं आपलीं नखें बाहेर काढून हिंदी लोकांना चांगलें ओरखडलें. साम्राज्यसरकारला महायुद्धांत साहाय्य केल्याबद्दल आपल्याला भरपूर बक्षिस मिळेल अशी हिंदी लोकांना आशा होती. पण लॉर्ड पेंटलंड यांनीं त्यांना आधींच सांगून टाकलें कीं, खोटी आशा बाळगून आपली फसवणूक आणि निराशा करून घेऊं नका. तुमच्या होमरूलच्या चळवळीविरुद्ध आम्ही योग्य ते उपाय योजल्याखेरीज रहाणार नाहीं ! पेंटलंडसाहेबांनीं लवकरच ' योग्य उपाय ' योजून बेझंटबाईंना त्यांच्या दोन सहकाऱ्यांसह होमरूलची चळवळ करण्याबद्दल बिनचौकशीनें अटकेंत ठेवलें ! !

इ. स. १९१६ मध्यें टिळकांनीं लखनौला कॉंग्रेस काबीज केल्यावर सरकार कॉंग्रेसकडे पुन्हां साशंक दृष्टीनें पाहूं लागलें. विद्यार्थ्यांनीं किंवा सरकारी अधिकाऱ्यांनीं कॉंग्रेसशीं कोणत्याहि प्रकारें संबंध ठेवूं नये असे गुप्त हुकूम सुटले. याच वेळीं बेझंट आणि टिळक यांनीं होमरूल लीगची चळवळहि सुरू केली होती. सरकारचा ज्यांचेवर विश्वास त्या नेमस्त पुढाऱ्यांनीं कॉंग्रेसमधून हळूहळू पाय काढल्यामुळें कॉंग्रेस सरकारच्या मनांतून अजिबाद उतरली. १९१७ च्या ऑगस्ट महिन्यांत हिंदुस्थानला जबाबदार राज्यपद्धति देणें इंग्लंडचें ध्येय आहे, असें भारतमंत्री मांटेग्यू साहेबांनीं जाहीर केल्यामुळें जिकडे तिकडे समाधान दिसूं लागलें. पण याच वेळीं रौलट–ॲक्ट करण्याची दुर्बुद्धि सरकारला सुचल्यामुळें सर्वत्र संतापाचा धूर निघूं लागला. वरील कायद्याविरुद्ध जनतेनें केलेल्या चळवळींतून पंजाब प्रकरण उद्भवलें व धुरांतून ज्वाळा निघूं लागल्या मॉंटेग्यु–चेल्म्सफर्ड सुधारणांनीं या ज्वाळा विझल्या नाहींत. १९१९ सालीं अमृतसर येथें भरलेल्या कॉंग्रेसनें व्हाइसरॉय लॉर्ड चेम्सफर्ड यांना ब्रिटिश सरकारनें परत बोलवावें असा ठराव केला.

पुढील वर्षी पंजाब प्रकरण आणि खिलाफत या बाबतींत झालेल्या अन्यायाचें निराकरण करून घेण्याकरितां महात्मा गांधींनीं असहकारितेची चळवळ पुकारली. या वेळेपासून कॉंग्रेस आणि सरकार यांचेमध्यें अगदीं उघड उघड लढाई सुरू झाली असें म्हटलें पाहिजे. ही चळवळ जोंपर्यंत पूर्णपणें अनत्याचारी स्वरूपाची राहील तोंपर्यंत सरकार तिच्याकडे दुर्लक्ष करील, असें नोव्हेंबर १९२० मध्यें सरकारनें जाहीर केलें. पण कॉंग्रेसचें बळ दिवसानुदिवस वाढत चालल्यामुळें सरकारला कांहींतरी हालचाल करणें प्राप्त झालें. पिकेटिंग, कॉंग्रेसचीं न्यायकोर्टें, परदेशी मालावरील बहिष्कार, या बाबतींत करडी नजर ठेवून खटले भरण्याचा धुमधडाका सुरू झाला. कॉंग्रेस कमिट्यांना प्रतिस्पर्धी म्हणून सरकारच्या प्रोत्साहनानें ठिकठिकाणीं अमान सभा स्थापन झाल्या. १९२१ सालीं मे महिन्यांत पं. मालवीयजींच्या मध्यस्थीनें महात्मा गांधी आणि लॉर्ड रीडिंग यांच्या बऱ्याच मुलाखती झाल्या. पण अली बंधूंच्या माफीखेरीज त्यांतून कांहीं निष्पन्न झालें नाहीं. असहकारितेच्या चळवळीचा जोर वाढतच राहिला. शेवटीं गांधींनीं

कायदेभंगाचें हत्यार हातांत घेण्याचें ठरविलें. तेव्हां सरकारनें ' सिडीशस मीटिंग्ज ॲक्ट ' व १९०८ चा समितीचा कायदा जारी केला. असहकारितावादी आणि सरकार याचे मध्यें तडजोड घडवून आणण्याकरितां एखादी गोलमेज परिषद बोलवावी, अशी मध्यस्थांनीं सूचना केली. पण दडपशाहीचे कायदे मार्गे घेऊन कैद्यांना मुक्त केल्यावाचून परिषदेत भाग घेण्यास गांधी कबूल होईनात व उलट गांधींनीं चळवळ मार्गे घेतल्यावाचून व्हाइसरॉय परिषद बोलाविण्यास कबूल होईनात. अशा रीतीनें ही कॉंग्रेस आणि सरकार यांचेमधील तडजोड फिसकटली. पुढें सरकारनें गांधींना कैदेंत टाकलें. नंतर हळू हळू असहकारितेचा जोर ओसरत गेला. १९२२ अखेर स्वराज्य पक्षाची स्थापना होऊन सरकारशीं कायदेमंडळांतून टक्कर देण्याचें दास—नेहरूप्रभृतींनीं ठरविलें. या कार्याला प्रथम कॉंग्रेसची संमति मिळाली नाहीं तरी पुढें कॉंग्रेसला ती द्यावी लागली. पुढील पांच वर्षे सरकार आणि कॉंग्रेस यांचे मध्यें कायदेमंडळांतूनच मुख्यत: लढाई चालू राहिली.

तथापि देशांत पसरलेला असंतोष यत्किंचित् कमी झाला नाहीं. सायमन कमिशननें त्यांच्यांत आणखी भर घातली. १९२९ च्या आक्टोबर महिन्यांत लॉर्ड आयर्विन यांनीं गोलमेज परिषदेची योजना जाहीर केली. पण कॉंग्रेसचें समाधान करण्याइतकी ती पुरेशी नव्हती. त्याच वर्षाच्या अखेरीस कॉंग्रेसनें संपूर्ण स्वातंत्र्याचें ध्येय जाहीर केलें. पुढील २६ जानेवारीला सर्व देशभर ' स्वातंत्र्य दिन ' साजरा करण्यांत आला. पुढें मार्च महिन्याच्या प्रारंभीं गांधींनीं व्हाइसरॉयांना एक निर्वाणीचा खलिता पाठवून आपलीं गाऱ्हाणीं दूर न झाल्यास कायदेभंग सुरू करण्यांत येईल अशी नोटीस दिली. त्याप्रमाणें पुढें लवकरच मिठाचा सत्याग्रह सुरू झाला. हळूहळू सर्व देश कायदेभंगाच्या चळवळींत सामील होऊन सरकार आणि कॉंग्रेस यांचें युद्ध हातघाईवर आलें. व्हाइसरॉयांनीं वटहुकुमाचीं अस्त्रें एकामागून एक कॉंग्रेसवर फेंकलीं तरी युद्धाचा जोर कमी होईना. शेवटीं १९३१ सालीं मार्च महिन्याच्या प्रारंभीं लॉर्ड आयर्विन आणि म. गांधी यांचा दिल्ली येथें तह होऊन लढाई तहकूब ठेवण्यांत आली.

या तहान्वयें कॉंग्रेसचे प्रतिनिधी म्हणून म. गांधी पुढे गोलमेज परिषदेला गेले. पण तिकडून ते परत येण्यापूर्वीच बंगाल, संयुक्तप्रांत व सरहद्द प्रांत या भागांत दडपशाहीचे गिरमीट जोरानें फिरूं लागलें होतें. त्यासंबंधीं

बोलण्याकरितां म. गांधींनीं काँग्रेसच्या वर्किंग कमिटीच्या संमतीनें २९ डिसेंबर १९३१ सालीं व्हाइसरॉयांची मुलाखत मागितली. परंतु वटहुकमांसंबंधीं चर्चा सोडून बाकी बोलण्यास मी तयार आहे असें व्हाइसरॉयांचें उत्तर आल्यामुळें सर्वच फिसकटलें. कांग्रेसने कायदेभंगाचें हत्यार पुन्हां हातांत घेतलें. तत्पूर्वी ता. २ जानेवारी रोजीं गांधींनीं पाठविलेल्या दुसऱ्या तारेला व्हाइसरायांचें जें उत्तर आलें त्यांत शेवटला भाग पुढीलप्रमाणें होता.

" कायदेभंगाची धमकी दिल्यानें सरकार तुम्हांस मुलाखतीस बोलावील व अशा मुलाखतीपासून कांहीं निष्पन्न होईल या गोष्टीवर सरकारचा विश्वास नाहीं. अशा स्थितींत काँग्रेसनें योजिलेल्या योजनेचे जे परिणाम होतील त्याबद्दल सरकार तुम्हांला व तुमच्या काँग्रेसला जबाबदार धरील आणि ही चळवळ हाणून पाडण्यासाठीं अवश्य ते उपाय योजील. "

दोन वर्षांपूर्वी सुरू झालेल्या कायदेभंगाच्या चळवळीकडे सरकारनें प्रथम दुर्लक्ष केलें होतें. पण या वेळीं सरकारनें एक क्षण देखील फुकट घालविला नाहीं. सरकारनें ताबडतोब सर्वव्यापी वटहुकूम काढून काँग्रेसला दडपून टाकण्याकरितां भगीरथ प्रयत्न केले. सर्व काँग्रेस संस्था बेकायदशीर ठरविल्या. दोन वर्षें काँग्रेसचें आणि सरकारचें घनचक्कर युद्ध चालू होतें. या अवधींत दिल्लीला आणि कलकत्त्याला दोन अधिवेशनें भरविण्याचा काँग्रेसनें प्रयत्न केला. पण सरकारनें तो उधळून लाविला. सरकारच्या प्रचंड बलापुढें काँग्रेसला टिकांव धरणें अशक्य झालें. म्हणून १९३४ च्या एप्रिल महिन्यांत काँग्रेसला कायदेभंगाची चळवळ बंद करावी लागली. अर्थात हें युद्धही थांबलें. आतां तूर्त कायदेमंडळांतूनच सरकारशीं झुंज खेळण्याचें काँग्रेसनें ठरविलें आहे. १५ वर्षांत सरकार आणि काँग्रेस यांचीं तीन युद्धें झालीं व त्या प्रत्येकामध्यें काँग्रेसला हार खावी लागली. तथापि ती हार खात खात काँग्रेसचे बळ वाढत चालले आहे, हें विसरून चालणार नाहीं. काँग्रेस ही देशांतील सर्वांत मोठी आणि जास्तींत जास्त प्रातिनिधिक संस्था आहे ही गोष्ट कबूल करणें सरकारला भाग आहे. देशांत शांतता आणि संतोष नांदावयाचा असेल तर सरकारला आज नाहीं उद्यां काँग्रेसबरोबर तडजोड करणें भाग आहे त्यांत शंका नाहीं.

आज लॉर्ड डफरिन जिवंत असते तर त्यांना काँग्रेस भस्मासुरासारखी दिसली असती !!

नि. ५८९

( ६ )

# काँग्रेसची घटना

आज कोणतीही नवीन संस्था काढावयाची म्हणजे प्रथम तिची घटना तयार करण्यांत येते. पण काँग्रेस स्थापन करतांना घटनेचा विचार प्रथम कोणाच्याही लक्षांत आला नाहीं असें दिसतें. एकादी जाहीर सभा भरते त्याप्रमाणेंच काँग्रेसचीं अधिवेशनें भरत असत. सभा झाली म्हणजे लोक घरोघर निघून जातात त्याप्रमाणें चार दिवस काँग्रेसचें अधिवेशन झालें कीं पुढारी घरोघर निघून जात व पुनः पुढल्या वर्षी जमत. काँग्रेसची कल्पना ज्यांनीं काढली त्यांनीं निमंत्रण दिलेले लोक पहिल्या अधिवेशनाला हजर होते. अर्थात् त्यांना 'प्रतिनिधि' म्हणतां येणार नाहीं. दुसऱ्या अधिवेशनां-तील प्रतिनिधि जाहीर सभांतून किंवा सार्वजनिक संस्थांतून निवडलेले होते. त्यांना कोणी आणि कसे निवडावे याबद्दल निश्चित नियम कांहींच नव्हता. 'या अधिवेशनांत पास झालेले ठराव प्रत्येक प्रांतां-तील राजकीय संस्थांकडे पाठविण्यांत यावेत आणि त्यांनीं दुसऱ्या अशाच संस्थांच्या मदतीनें ठरावांचा परामर्ष घ्यावा,' असा एक ठराव पहिल्या अधिवेशनांत पास झाला होता. प्रत्येक अधिवेशनाच्या शेवटीं पुढील अधिवेशन कोठें भरावें हें ठरत असे. अर्थात् त्या अधिवेशनाची व्यवस्था त्या ठिकाणच्या स्वागतमंडळानें करावी अशी अपेक्षा होती. देशांतील मह-त्वाच्या केंद्रस्थानीं स्टँडिंग काँग्रेस कमिट्या स्थापन कराव्या, असा ठराव

दुसऱ्या अधिवेशनांत पास झाला. तिसऱ्या काँग्रेसमध्यें बद्रुद्दिन तय्यबजी यांनीं काँग्रेस प्रातिनिधिक आहे, असें निक्षून सांगितलें. पण याचा अर्थ त्या वेळीं इतकाच समजला जात असे कीं, देशांत नांव घेण्यासारखे बहुतेक पुढारी अधिवेशनाला हजर राहून मतें देत असत. पण एवढयावरून आक्षेपकांचें समाधान होणें शक्य नव्हतें. काँग्रेस प्रातिनिधिक नाहीं, तिचें मत हें देशाचें मत नव्हे, व म्हणून तिच्या ठरावांकडे लक्ष देण्याचें कारण नाहीं, हा आक्षेप आजच्या प्रमाणें त्या वेळींही घेतला जात असे. अशा आक्षेपकांचीं तोंडें बंद करण्याकरतां काँग्रेसला प्रातिनिधिक स्वरूप येईल अशा रीतीनें प्रतिनिधींच्या निवडणुकींसाठीं कांहींतरी नियम करण्यांत यावे असें तिसऱ्या अधिवेशनांत डॉ. त्रैलोक्यनाथ मित्र यांनीं सुचविलें. पण त्या वेळीं एकंदर पुढाऱ्यांचें मत असें दिसलें कीं, घटनेच्या शृंखलांनीं काँग्रेसला बालपणींच जखडून टाकलें तर तिची वाढ होणार नाहीं. म्हणून घटना निश्चित करण्याच्या भानगडींत न पडतां थोडे कामचलाऊ नियम करावे म्हणजे झालें. यामुळें घटनेचा प्रश्न प्रत्येक वर्षी कोणी तरी उपस्थित करी व प्रत्येक वेळीं तिचा विचार पुढें ढकलण्यांत येई. ज्यांना हजर रहातां येईल ते लोक 'प्रतिनिधी' म्हणून हजर रहात व सुचेल त्या पद्धतीनें अधिवेशन पार पाडीत. ह्यूमसाहेबांना काँग्रेसचे सेक्रेटरी निवडल्याचा पहिला उल्लेख १८८८ सालीं सांपडतो. १९१२ मध्यें अंत होईपर्यंत दरसाल ह्यूमसाहेबांचीच काँग्रेसच्या सेक्रेटरीच्या जागेवर निवड होत गेली. १८९१ सालापासून तर ते विलायतेंतच होते. म्हणून हिंदुस्थानांत काम करण्याकरतां दुसऱ्या कोणत्या तरी सेक्रेटरीची निवड होई. १८८९ सालीं १८८९ प्रतिनिधी हजर राहिले. ही संख्या वर्षानुवर्षे अशीच वाढत राहिल्यास कांग्रेसचें काम फार घोंटाळयाचें होईल असें वाटून दहा लाख लोकसंख्येमागें पांच प्रतिनिधी निवडण्यांत यावेत, असा एक महत्वाचा नियम या वर्षी करण्यांत आला. पण या नियमाचीही कसून अंमलबजावणी केव्हांच झाली नाहीं.

१८९४ सालीं म्हणजे दहाव्या अधिवेशनांत, 'काँग्रेसची घटना निश्चित करण्याची वेळ आतां आली आहे म्हणून त्यासंबंधीं पुढील वर्षापर्यंत कच्ची योजना तयार ठेवण्यांत यावी,' असा ठराव झाला. तथापि हें घोंगडें

१८९९ पर्यंत तसेंच भिजत पडल. त्या वर्षी मात्र लखनौ येथें बाबू रमेशचंद्र दत्त यांनीं स्वतःच अध्यक्षपदावरून घटनेचा ठराव मांडला आणि तो पास करून घेतला. हिंदी लोकाचें सनदशीर मार्गांनीं हित साधणें हें काँग्रेसचें ' क्रीड ' ठरविण्यांत आलें. राजकीय अथवा अन्य संस्थांनीं किंवा जाहीर सभांनीं प्रतिनिधींची निवड करावी, काँग्रेसनें प्रांतवार निवडलेल्या पंचेचाळीस सभासदांची इंडियन काँग्रेस कमिटी बनवून तिनें काँग्रेसचा सर्व व्यवहार करावा, या कमिटीच्या वर्षांतून तीन सभा व्हाव्या, कमिटीला एक ऑनररी आणि एक पगारी सेक्रेटरी असावा, जनतेला राजकीय शिक्षण दण्याकरतां प्रांताच्या मुख्य ठिकाणीं प्रांतिक काँग्रेस कमिटया स्थापन कराव्या, अध्यक्षांची निवड व ठरावांचे मसुदे इंडियन काँग्रेस कामिटीनें तयार करावे, हें त्या घटनेचें थोडक्यांत स्वरूप होते. ही घटनाही किती ढिली आहे हें वरवर पहाणाराच्याही सहज लक्षांत येईल. या घटनेंत वेळोवेळीं किरकोळ फेरफार करण्यांत आले. काँग्रेसचें काम वर्षभर चालू ठेवण्याची कांहीं तरी व्यवस्था व्हावी, अशी ओरड तिसऱ्या चौथ्या अधिवेशनापासून चालू होती. पण तिकडे फारसें कोणी लक्ष दिल नाहीं. चार दिवस जमावें, ठराव करावे, आणि ते सरकारकडे पाठवून द्यावे, या पलीकडे आणखी कांहीं कर्तव्य आहे, अशी फारच थोड्यांना जाणीव दिसली. १९०४ सालीं घटनेच्या बाबतींत फिरोजशहा मेहता आणि लाला लजपतराय यांची चांगलीच खडाजंगी उडाली. काँग्रेसची चांगली घटना करावी असें लालाजींचें म्हणणें आणि जी सध्यां आहे ती ठीक आहे असें मेहताजींचें म्हणणें. जगांतील पुष्कळ संस्थांच्या आणि राज्यांच्या घटना अलिखित आहेत, असा मुद्दा फिरोजशहा पक्षाकडून पुढें करण्यांत येई. काँग्रेसचा व्यवहार एकहाती चालला होता तोंपर्यंत हें सर्व ठीक होतें. पण ध्येयाच्या आणि साधनाच्या बाबतींत मतभेद होऊन अंतस्थ पक्ष उत्पन्न झाले तेव्हां घटना निश्चित करणें भागच पडलें. काँग्रेसचें काम वर्षभर चालू ठेवण्यासाठीं पंधरा सभासदांची एक स्टँडिंग कमिटी स्थापन करण्याचा ठराव १९०५ सालीं बनारसच्या काँग्रेसमध्यें झाला. हल्लींच्या वर्किंग कमिटी-प्रमाणेंच ही योजना होती. पण या वरच्या मजल्याच्या खालचे भाग

अत्यंत डळमळीत होते. १९०६ सालीं कलकत्त्याला वर्षापुरती एक घटना मान्य करण्यांत आली. १९०७ सालीं सुरतेला कॉंग्रेस मोडली आणि तिच्या चालकांना भरभक्कम घटनेची जरूरी भासूं लागली. आता चांगलेच डोळे उघडल्यामुळें फिरोजशहांसारख्यांना तावडतोब घटना बनवण्यावांचून गत्यंतर नव्हतें. तेथल्या तेथें सुरतेलाच एक कन्व्हेन्शन भरवून घटना तयार करण्याकरितां कमिटी नेमण्यांत आली. या कमिटीनें एप्रिल १९०८ मध्यें अलाहाबाद येथें जमून आपलें काम पार पाडलें. पुढें दरसाल या घटनेमध्यें कांहींना कांहीं फेरफार होत गेले. तरी तिचें मुख्य स्वरूप १९१९ पर्यंत कायम राहिलें. १९२० सालीं कॉंग्रेसची नवीन घटना तयार करण्याकरितां म. गांधी, विठ्ठलभाई पटेल, न. चिं. केळकर व ए. रंगास्वामी अयंगार या चौघांची कमिटी नेमली. या कमिटीनें सुचविलेली घटना नागपूरच्या कॉंग्रेसनें मान्य केली. गेल्या वर्षी मुंबई येथें तिच्यांत महत्वाचे फेरफार होईपर्यंत तीच रूढ होती. या घटनेमध्यें दिसून येणारी सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे कॉंग्रेसनें आपल्या ‘ क्रीड ’मध्यें केलेला बदल होय. सनदशीर मार्गानें राज्यकारभारांत हळूहळू सुधारणा घडवून आणून वसाहतीचा दर्जा प्राप्त करून घेणें हें १९०८ सालीं कन्व्हेन्शन कमिटीनें ठरविलेलें ध्येय बदलून त्या ठिकाणीं शांततेच्या आणि कायदेशीर मार्गानें स्वराज्य मिळवणें हें ध्येय करण्यांत आलें. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे कॉंग्रेसनें आपल्या कारभाराकरतां केलेली भाषावार प्रांतरचना होय. भाषावार प्रांतरचनेकरतां हिंदी लोक पुष्कळ दिवस ओरड करीत आहेत. कॉंग्रेसनें ही रचना करून सरकारला एक प्रकारें धडाच घालून दिलेला आहे. कॉंग्रेसची प्रांतरचना खालीलप्रमाणें आहे—

( १ ) मद्रास—तामीळ. ( २ ) आंध्र—तेलगू. ( ३ ) कर्नाटक—कानडी. ( ४ ) केरळ—मल्याळी. ( ५ ) मुंबई शहर—मराठी व गुजराथी ( ६ ) महाराष्ट्र—मराठी ( ७ ) गुजराथ—गुजराथी. ( ८ ) सिंध—सिंधी ( ९ ) संयुक्तप्रांत—हिंदी. ( १० ) पंजाब—पंजाबी. ( ११ ) वायव्य सरहद्दप्रांत—उर्दू. (१२) दिल्ली—हिंदी. (१३) महाकोसल उर्फ हिंदी मध्यप्रांत—हिंदी (१४) मराठी मध्यप्रांत—मराठी. (१५) वऱ्हाड—मराठी. ( १६ ) बिहार—बिहारी. ( १७ ) उत्कल—उरिया ( १८ ) बंगाल—बंगाली ( १९ ) आसाम—आसामी. ( २० ) अजमीर—हिंदी. ( २१ ) ब्रह्मदेश—ब्रम्ही.

जवळच्या देशी संस्थानांचा त्या त्या प्रांतांतच समावेश होतो. 'क्रीड' मान्य करून वर्षाला चार आणे देईल तो मतदार, गांवकमिट्या, तालुका-कमिट्या, ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी, वर्किंग कमिटी अशी चढती संघटना तयार करण्यांत येऊन, परस्परांचे संबंध निश्चित करण्यांत आले. बारीकसारीक नियमांनीं कामाची पद्धति व सेक्रेटरी, हिशेबतपासनीस, अध्यक्ष इत्यादिकांचे अधिकार मुक्रर करण्यांत आले. १९२३ सालीं मतदाराची वयोमर्यादा २१ वरून १८ वर आणण्यांत आली. १९२४ सालीं बेळगांवच्या कॉंग्रेसमध्यें दरसाल २४ हजार वार स्वतः काढलेलें सूत वर्गणी म्हणून भरणारासच कॉंग्रेसचा सभासद रहाण्याचा व मतदानाचा हक्क मिळाला. या मताधिकाराला जोराचा विरोध झाला. पण गांधीजींच्या वजनामुळें तो कांहीं काल घटनेंत राहिलाच. पण पुढें विरोधकांचा युक्तिवाद पटून सुताची अट ऐच्छिक करण्यांत आली. १९२९ सालीं 'क्रीड'मध्यें 'संपूर्ण स्वातंत्र्य' हे शब्द घालण्यांत आले. गेल्या वर्षी मुंबई येथें भरलेल्या कॉंग्रेसमध्यें गांधीजींच्या सूचनेवरून घटनेमध्यें पुनः क्रांतिकारक फरक करण्यांत आला. आज ही घटनाच चालू असल्यामुळें तिचें थोडक्यांत स्वरूप खालीं दिलें आहे—

( १ ) संपूर्ण स्वातंत्र्याचें 'क्रीड' मान्य करून चार आणे देणारा १८ वर्षांपुढील स्त्री–पुरुष कॉंग्रेसचा सभासद समजावा.

( २ ) सभासद होऊन सहा महिने झाल्याखेरीज निवडणुकीचे वेळीं सभासदाला आपला मताधिकार चालवितां येणार नाहीं.

( ३ ) असा सभासद असूनही तो नेहमीं हातसुताची आणि हातविणीची खादी वापरीत नसेल, किंवा त्यानें सहा महिनेपर्यंत ठराविक अंगमेहनतीचें काम केलें नसेल, तर त्याला कोणत्याही कॉंग्रेस कमिटीच्या अधिकारीपदावर निवडून येतां येणार नाहीं.

( ४ ) कॉंग्रेस कमिटीचा निवडून आलेला कोणताही सभासद कॉंग्रेसच्या हेतूंशीं विरुद्ध राजकीय कार्य करणाऱ्या जातीय संस्थेचा सभासद असतां कामा नये.

( ५ ) निवडणुकीकरतां शहरांचा भाग आणि खेड्यांचा भाग असे दोन विभाग करण्यांत येतील. दहा हजारांवर वस्ती असलेल्या अशा प्रत्येक

विभागाला पांचशें काँग्रेस सभासदांमागें एक प्रतिनिधि निवडण्याचा अधिकार राहील.

( ६ ) शहरविभागांतून ५११ व खेडेगांव विभागांतून १४८९ याप्रमाणें दोन हजारांहून अधिक प्रतिनिधींची संख्या केव्हांही नसावी.

( ७ ) हे सर्व प्रतिनिधि ठरलेल्या दिवशीं एकत्र जमून काँग्रेसच्या अध्यक्षांची व ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची निवड करतील. ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या सभासदांची संख्या १६६ राहील. ही कमिटीच अधिवेशनाचे वेळीं विषयानियामक कमिटीचें काम करील.

( ८ ) याच कमिटींतून अध्यक्ष आपल्या इच्छेप्रमाणें चौदा सभासदांची निवड करून वर्किंग कमिटी बनवील.

( ९ ) काँग्रेसचें कामकाज मुख्यतः हिंदुस्थानी भाषेंतच चालेल.

( १० ) प्रांतवार ऑल इंडिया काँग्रेस कमिटीमध्यें पुढीलप्रमाणें सभासद पाठविण्याचा अधिकार राहील,—

अजमीर ( ३ ), आंध्र ( ११ ), आसाम ( २ ), बिहार ( १६ ) बंगाल ( २३ ), वऱ्हाड ( ३ ), मुंबई ( ३ ) ब्रह्मदेश ( ६ ), मराठी मध्यप्रांत( ३ ), दिल्ली ( ३ ), गुजराथ ( ६ ), कर्नाटक ( ७ ), केरळ ( ४ ), महाकोसल ( ६ ), महाराष्ट्र ( ८ ), वायव्य सरहद्दप्रांत, ( २ ), पंजाब ( १६ ) सिंध ( ४ ), तामिळ नाडू ( १२ ), संयुक्तप्रांत ( २२ ), उत्कल ( ६ ).

ही घटना काँग्रेसमध्यें प्रचंड बहुमतानें पास झाली असली तरी तिच्यांतील अंगभूत दोषांमुळें तिच्यांत लवकरच बदल झाल्यावांचून रहाणार नाहीं. सोशॅलिस्टांसारख्या विशिष्ट लोकांना काँग्रेसचा दरवाजा बंद करण्याच्या हेतूनें ही नवीन घटना बनविण्यांत आली असा आक्षेप घेण्यांत येत आहे. ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या सभासदांची संख्या ३५० वरून १६६ करण्यांत आली. ही कमिटी म्हणजे बिनसरकारी पार्लमेंट आहे अशी कल्पना केली तर ही संख्या फारच थोडी दिसते. इंग्लंडची लोकसंख्या सहा कोटी असूनही तेथील पार्लमेंटांत सहाशेंच्या वर सभासद आहेत. हिंदुस्थानची लोकसंख्या इंग्लंडच्या सहापट आहे. अर्थात नवी मर्यादा काँग्रेसच्या प्रातिनिधिकत्वाला बाध आणणारी आहे. प्रतिनिधींच्या संख्येला घातलेल्या मर्यादेविषयीं असेंच म्हणता येईल. सामान्य जनतेच्या मनावर संख्याबलाचा परिणाम फार होतो आणि काँग्रेसलाही त्यामुळें टोलेजंग आणि भपकेदार स्वरूप येतें हें विसरतां कामा नये.

सुताच्या अटीला पर्याय म्हणून हस्तव्यवसायाची अट ठेवण्यांत आली आहे. पण सुताची अट ज्या कारणांकरितां ढिली किंवा ऐच्छिक करावी लागली त्याच कारणाकरितां हस्तव्यवसायाची अट देखील ऐच्छिक करण्याचा लवकरच प्रसंग येईल. चार आणे हा देखील अंगमेहनत करून मिळविलेल्या पैशाचा भागच आहे. मग त्याची किंमत गौण कां समजण्यांत यावी ?

काँग्रेसच्या निवडणुकींत पूर्वी लबाडया फार होत असत. अधिकारपदाची लालसा असणाऱ्या उमेदवारानें वर्गणीचे पैसे स्वतः भरून सभासद करावे व त्यांची मतें मिळवून अधिकारावर आरूढ व्हावें, एकाचीं मतें दुसऱ्यानें द्यावीं, मतदानापुरता खादीचा पोषाक अंगावर चढवावा, इत्यादि प्रकार सर्रास होत. त्यांना नवीन नियमामुळें बराच आळा बसेल यांत शंका नाहीं. खादीच्या पोषाकाविरुद्ध तक्रार करण्याचें कारण दिसत नाहीं. गणवेषाची कल्पना पाश्चात्य किंवा पौर्वात्य देशांत मोठमोठया संघटनेमध्यें सर्वत्र रूढ आहे. शिस्तीपैकींच तो एक नियम समजावा म्हणजे झालें. पण या नियमाची अमलबजावणी फक्त सभा–परिषदांसारख्या विशेष प्रसंगींच व्हावी. तसेंच शिस्तीची मर्यादा या पलीकडे सूत काढण्यापर्यंत किंवा हस्तव्यवसायापर्यंत नेऊन पोंचवूं नये. कारण देशसेवा करण्याचे दुसरे मार्ग आहेत. नियम फार वाढविल्यानें संघटनेला संकुचितपणा येऊन ती कमजोर होते.

[library stamp]

# ( ७ )

# काँग्रेस व मुसलमान

इंग्रजांनीं हिंदु व मुसलमान या दोघांपासून हिंदुस्थानचें राज्य घेतलें. म्हणजे पारतंत्र्याच्या दृष्टीनें हिंदु आणि मुसलमान दोघेही समदु:खी आहेत. म्हणून गेलेलें स्वराज्य परत मिळविण्याकरितां दोघांनींही एकोप्यानें वागण्यास हरकत नाहीं. प्रथम ही वृत्ति दोघांमध्यें होती. पण पुढें पुढें मुसलमानांतून ती नष्ट होऊं लागली. इंग्रज गेले तर आपणांवर हिंदूंचें वर्चस्व प्रस्थापित होईल आणि आपण परतंत्र राहूं ते राहूंच, या काल्पनिक भितीनें ग्रासल्यामुळें त्यांच्या वृत्तींत हा पालट झाला. याच्या उलट हिंदूंनाही मुसलमानांच्या वर्चस्वाची भीति वाटूं लागल्यामुळें त्यांना जादा हक्क देण्यास ते विरोध करूं लागले. काँग्रेसच्या पन्नास वर्षांच्या इतिहासामध्यें हें संशयाचें वातावरण वर्षानुवर्षें वाढत आलें आहे; आणि तें लवकरच दूर होण्याचें वृत्त तरी चिन्ह दिसत नाहीं, हें पाहून फार वाईट वाटतें.

जातीय आणि धार्मिक वैमनस्य दूर करावें हा एक उद्देश काँग्रेसनें आपल्यासमोर ठेविलेला होता. आणि म्हणूनच सामाजिक किंवा धार्मिक बाबतींत ढवळाढवळ न करतां, सर्वांस सामान्य अशा राजकीय सुधारणेलाच तिनें हात घालण्याचें ठरविलें. या कामीं प्रारंभीं मुसलमानांचें तिला चांगलें सहकार्य मिळालें. तो समाज मागसलेला

असल्यामुळें संख्येच्या प्रमाणांत त्याचे पुढारी कॉंग्रेसच्या अधिवेशनांना हजर रहात नसत. तथापि जे थोडे रहात असत ते आपला धर्म विसरून निर्मळ राष्ट्रीय वृत्तीनेंच कॉंग्रेसच्या कार्याला हातभार लावीत. मुंबईचे बद्रु-द्दीन तय्यबजी व महंमद रहिमतुल्ला सयानी यांनीं कॉंग्रेससारख्या संस्थेचें समर्थन करून मुसलमानांना तिला येऊन मिळण्याचा प्रारंभीं उपदेश केला आहे. १८८८ सालीं अलाहाबाद येथील कॉंग्रेसमध्यें भाषण करतांना शेख रेझा हसन खान लखनौहून सुनीपंथाचे पुढारी समसूलउलेमा यांजकडून कॉंग्रेसला मदत करण्याचा फतवा घेऊन आले होते. आपल्या भाषणांत ते म्हणाले, " It is not the Mahomedans but their official masters who are opposed to the Congress. " मुंबईच्या अंजुमान-इ-इस्लाम या संस्थेनेंहि कॉंग्रेसचे उद्देश आपणास मान्य असल्याचा ठराव केला होता. हिंदु आणि मुसलमान यांची परस्परांवरील आक्रमणाची शंका दूर होण्याकरितां याच वर्षी अलाहाबादेस एक महत्त्वाचा ठराव पास करण्यांत आला. हिंदूंनीं किंवा मुसलमानांनीं एखाद्या ठरावाला जवळ जवळ एकमतानें हरकत घेतल्यास तो अध्यक्षानीं कॉंग्रेसपुढें मांडण्यास परवानगी देऊं नये. हा त्या ठरावाचा आशय होता. हा ठराव दोघांनाही लागू असला, तरी मुसलमानांची संख्या अल्प असल्यामुळें हिंदूंच्या बहुमतानें मुसलमानांविरुद्ध एखादा ठराव पास करण्यांत येऊं नये आणि मुसलमानांच्या मनांतहि कॉंग्रेसबद्दल दुजा भाव उत्पन्न होऊं नये, हाच त्यांतील मुख्य उद्देश होता हें उघड आहे. **जातीय बाबतींत कॉंग्रसेनें केलेला हा पहिला ठराव होय.** पुढल्याच वर्षी कॉंग्रेसनें दुसरा ठराव केला. त्याचा आशय असा कीं, हिंदु, पारशी, ख्रिस्ती आणि मुसलमान हे जेथें अल्पसंख्य असतील, तेथें त्यांनीं निवडावयाचे प्रतिनिधी, त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षां कमी असूं नयेत. १८९० सालीं मि० ब्रॅडलॉ यांनीं पार्लमेंटांत आणलेल्या इंडिया बिलाला कॉंग्रेसनें पाठिंबा दिला. त्यावर भाषण करतांना पंडित बिशन नारायण धार म्हणाले कीं, सरकारनें राजकीय बाबतींत अकबराप्रमाणें धर्मातीत धोरण ठेवावें. स्वतंत्र मतदारसंघ रूढ करण्याचा प्रयत्न करूं नये. या भाषणावरून

स्वतंत्र मतदारसंघाचा प्रश्न त्याच वेळीं कोणी तरी उपस्थित केला होता, असें दिसतें. सुदैवानें सरकारनें आणखी १९ वर्षें त्या तत्वाचा अंमल केला नाहीं.

इ. स. १८९९ पर्यंत मुसलमानांचे प्रतिनिधी कमी अधिक प्रमाणांत काँग्रेसला हजर रहात असत. पण पुढें ती संख्या हळुहळू घटत चालली. याचें कारण सर सय्यद अहमद यांच्यासारख्या पुढाऱ्याचा त्यांना उपदेश होय. सरकारकडूनही काँग्रेसला दिवसेंदिवस अधिकाधिक विरोध होऊं लागल्यामुळें काँग्रेसपासून दूर रहाण्यांतच आपला फायदा आहे, असें मुसलमानांना वाटलें. हिंदुस्थानांत हिंदु आणि मुसलमान हे दोन समबल पक्ष असून त्या दोघांमध्यें ऐक्य न होण्यावर हिंदुस्थानांतील आपलें अस्तित्व अवलंबून आहे, ही गोष्ट राज्यकर्त्यांनीं केव्हांच ओळखली होती. " The truth plainly is that the existence side by side of these hostile creeds is one of the strong points in our political position in India. " हे सर जॉन स्ट्रॅची यांनीं किती तरी मागें काढलेले उद्गार लक्षांत ठेवण्यासारखे आहेत.

स्वयंप्रेरणेनें असो अगर परप्रेरणेनें असो, मुसलमानांची पृथक्‌पणाची वृत्ति हळुहळूं वाढूं लागली. पुढें तर १९०६ त त्यांनीं मुसलमानांचें हित-संरक्षण करण्याकरितां काँग्रेसला प्रतिस्पर्धी म्हणून स्वतःची मुस्लिम लीग काढली. मुसल्मानांना जवळ करण्याचे सरकारचे प्रयत्न चालूच होते. वंगभंग हा त्यांतीलच एक डाव होता. हिंदु ही आवडती आणि मुसलमान ही नावडती बायको, ही उपमा एका इंग्रज अधिकाऱ्यानेंच उपयोगांत आणलेली आहे. नामदार आगाखान यांच्या आधिपत्याखालीं मुसलमानांचें शिष्टमंडळ लॉर्ड मिंटो यांच्या भेटीस गेलें असतां मुसलमानांनीं आपल्याकरितां स्वतंत्र हक्कांची मागणी केली, आणि लॉर्ड मिंटो यांनीं तिला उत्तेजन दिलें ही गोष्ट अगदीं प्रसिद्ध आहे. मुसलमानांच्या जातीय चळवळीला खरी सुरुवात येथूनच झाली, असें म्हणावयास हरकत नाहीं. स्वतंत्र मतदार संघाचा त्यांचा हक्क १९०९ मध्यें मोर्ले–मिंटो सुधारणांमध्यें मान्य करण्यांत आला. मुसलमानांना स्वतंत्र मतदार संघांत मतें देऊन शिवाय संयुक्त मतदार संघांत मतें

देण्याचीही मुभा देण्यांत आली होती. या तत्त्वाचा काँग्रेसनें १९१० सालीं तीव्र निषेध केला. मताधिकार आणि उमेदवाराची लायकी या बाबतींतही करण्यांत आलेल्या पंक्तिप्रपंचाचा काँग्रेसनें निषेध केला. जातीय मतदार संघाचें हें तत्त्व म्युनिसिपालिट्या आणि लोकल बोर्डें या स्थानिक स्वराज्य संस्थांना लागू करण्यांत येऊं नये, असा ठराव काँग्रेसनें लागोपाठ पास केलेला आहे. १९१३ सालीं मुंबईचे इब्राहिम रहिमतुल्ला यांच्या प्रयत्नानें मुस्लिम लीग आणि काँग्रेस यांचें ध्येय एकच असल्याचें जाहीर करण्यांत आलें. तेव्हांपासून सात आठ वर्षें हिंदु-मुसलमानांचा सलोखा होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं. भारतमंत्री मॉंटेग्यूसाहेब यांचा जाहीरनामा प्रसिद्ध होण्यापूर्वी १९१६ च्या आक्टोबर महिन्यांत वरिष्ठ कायदेमंडळाच्या १९ लोकनियुक्त सभासदांनीं व्हाइसरॉयांना एक खलिता पाठवून युद्धानंतर आपले राजकीय हक्क वाढविण्याविषयीं याचना केली होती. या याचनेमध्यें हिंदूंच्या जोडीला मझरूल हक, इब्राहीम रहिमतुल्ला, महमदअल्ली जिना इत्यादि मुसलमान पुढारी होते. जातीय बाबतींत अल्पसंख्यांकांना त्यांचें संख्याबल लक्षांत घेऊन योग्य आणि पुरेसें प्रतिनिधित्व देण्यांत यावें, एवढेंच त्या वेळीं उभयपक्षीं ठरलें होतें.

त्याच वर्षीच्या डिसेंबर महिन्यांत हिंदु आणि मुसलमान यांचे दरम्यान लखनौचा प्रसिद्ध करारनामा झाला. त्यामध्यें मुसलमानांच्या सवत्या सुभ्याला मान्यता दिली होती, पण त्याबरोबरच संयुक्त मतदारसंघांत त्यांना मताधिकार देण्याचें नाकारण्यांत आलें होतें. ज्या प्रांतांत मुसलमान अल्पसंख्य होते, तेथें त्यांना लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षां अधिक मताधिकार देण्यांत आला. यामुळें खूष होऊन मुसलमानांनीं काँग्रेसनें तयार केलेल्या जबाबदार राज्यपद्धतीच्या योजनेला आपली संमति दिली. हिंदु मुसलमानांच्या या एकजुटीमुळें सरकारला त्यांच्या मागण्यांचा विचार करणें भागच पडलें. मॉंटेग्यु–चेम्सफर्ड सुधारणा जाहीर झाल्यावर त्यांच्या युक्तायुक्ततेबद्दल हिंदु–मुसलमानांत मतभेद दिसला नाहीं. ही एकजूट आणखी दृढ होण्यास दोन कारणें झालीं. एक पंजाब प्रकरण आणि दुसरें खिलाफत प्रकरण. पंजाबांत हिंदूंबरोबर मुसलमानही रगडले गेले. अर्थात् दोघांच्याहि मनांत सरकारच्या दडपशाहीबद्दल चीड उत्पन्न

झाली. खिलाफतीच्या बाबतींत साम्राज्य सरकारनें केलेला अन्याय दूर करून घेण्याकरितां मुसलमानांना सर्वतोपरी साहाय्य करण्याचें कॉंग्रेसनें कबूल केलें. असहकारितेच्या काळांत दोन्ही जातींची ही जूट चांगली टिकली व तिचा सरकारवर इष्ट परिणाम झाला. पण त्यानंतर दोघांचें जें बिनसलें, तें अद्यापपर्यंत कायम आहे. खिलाफतीचा प्रश्न परस्पर निकालांत निघाल्यामुळें मुसलमानांना काँग्रेसच्या किंवा हिंदूंच्या मदतीची गरज उरली नाहीं. वाढत्या राजकीय हक्कांमुळें आपणांस स्वतंत्र आणि महत्वाचें स्थान असावें, अशीही हांव त्यांच्या मनांत उत्पन्न झाली. या पुढच्या १४ वर्षांचा इतिहास म्हणजे हिंदु मुसलमानांच्या लढयाचाच इतिहास होय. या लढयामुळेंच परकीय सत्तेशीं झालेल्या लढयांत कॉंग्रेसला यश मिळूं शकलें नाहीं. असहकारितेनंतर मुसलमानांतील फार मोठा भाग राष्ट्रीय चळवळीपासून जवळजवळ अलिप्त राहिला. सरकारला हेंच पाहिजे होतें. याबद्दल सरकारनें मुसलमानांना भरपूर बक्षिसही दिलें. क्षुल्लक कारणांवरून देशांत जिकडे तिकडे मुसलमानांचे दंगे झाले आणि हिंदुमुसलमानांचीं मनें परस्परांबद्दल अधिकाधिक कलुषित होऊं लागलीं.


हें वाढत चाललेलें वितुष्ट नाहींसें करण्याकरितां कॉंग्रेसनें कंबर बांधिली. वर्किंग कमिटीनें या दिशेनें कांहीं खटपट करावी, असा ठराव १९२६ सालीं गोहत्ती येथें भरलेल्या कॉंग्रेसनें केला. १९२७ च्या मार्च महिन्यांत दिल्ली येथें मुसलमान पुढाऱ्यांनीं जमून आपल्या मागण्या तयार केल्या. सिंधप्रांत निराळा करावा, वायव्य प्रांत व बलुचिस्थान यांचा दर्जा इतर प्रांता एवढा वाढवावा, पंजाब व बंगाल या प्रांतांत मुसलमानांना लोकसंख्येच्या प्रमाणांत प्रतिनिधित्व मिळावें आणि मध्यवर्ति कायदेमंडळांत एकंदर सभासदांच्या एकतृतीयांश सभासद मुसलमान असावे, या मागण्या मान्य केल्या तर संयुक्त मतदार संघाला आमची मान्यता आहे, असें मुसलमानांचें म्हणणें होतें. त्याच वर्षी मद्रास येथें झालेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनांत या मागण्यांचा विचार होऊन त्या निश्चित करण्याकरितां सर्वपक्षीय परिषद भरविण्यांत यावी असें ठरलें. १९२८ सालीं १२ ते २२ फेब्रुवारीपर्यंत दिल्ली येथें सर्वपक्षीय परिषद भरली. मार्च महिन्यांत पुन्हां तिची बैठक झाली. पण इतक्यांत मुस्लीम लीगच्या कौन्सिलनें सर्वपक्षीय परिषदेचे

ठराव आपल्यास मान्य नसल्याचें जाहीर केलें. येथपासून मुसलमानांच्या अडवणुकीला सुरुवात झाली. सर्वपक्षीय परिषदेनें नेमलेल्या कमिट्यांतून भाग घेण्याचें त्यांनीं नाकारलें. पुढें मे महिन्यांत मुंबईला पुन्हां सर्वपक्षीय परिषद भरून स्वराज्याची योजना तयार करण्याकरितां नेहरू कमिटीची नेमणूक झाली. या कमिटींत सर अली इमाम व कुरेशी हे दोन मुसलमान सभासद होते.

कलकत्ता येथें भरलेल्या सर्वपक्षीय परिषदेनें हा रिपोर्ट मान्य केला खरा, पण मुसलमानांचा विरोध कमी झाला नाहीं. मध्यवर्ति कायदेमंडळांत एक तृतीयांश जागा राखून ठेवण्याचा हक्क व जेथें मुसलमान बहुसंख्य आहेत तेथेंही त्यांच्याकरितां लोकसंख्येच्या प्रमाणांत जागा राखून ठेवण्याचा हक्क या मागण्या लोकशाहीच्या तत्त्वाशीं विसंगत असल्यामुळें मान्य होणें शक्य नव्हतें. मुस्लिम कॉन्फरन्समध्यें बॅ. जिना यांनीं केलेल्या १४ च्या १४ मागण्या मान्य झाल्याच पाहिजेत, असा त्यांनीं दुराग्रह धरला. या मागण्या मान्य झाल्यास हिंदूंचें नुकसान होईल व देशांत जातीय कलहाचें बीज कायमचें रुजलें जाईल म्हणून हिंदु महासभेनें या मागण्यांना सारखा विरोध चालविला. काँग्रेसलाही राष्ट्रीयत्वाचें तत्त्व कायम ठेवून या मागण्या जशाच्या तशा मान्य करणें शक्य नव्हतें. अशा स्थितींतच विलायतेंत गोलमेज परिषदा भरूं लागल्या. आमच्या मागण्यांचा आधीं निकाल लावा तरच आम्हीं परिषदेमध्यें भाग घेऊं, असें अडवणुकीचें धोरण मुसलमानांनीं चालविलें. त्यांमध्यें अभिनंदनीय गोष्ट एवढीच होती कीं, ते सर्व एकजुटीनें आणि एकमुखानें आपली मागणी करीत. हिंदूंची गोष्ट याच्या अगदीं उलट होती. त्यांच्यांत व्यक्ती तेवढीं मतें होतीं. एकत्र जमून एकविचारानें मागणी करावी, हें कोणाच्याहि लक्षांत आलें नाहीं. याचा सरकारला चांगलाच फायदा मिळाला. ‘ तुम्ही एकमतानें कराल ती योजना आम्ही मान्य करूं’ असें सरकारनें सांगितलें खरें, पण हें एकमत होणें शक्य नाहीं, हें सरकारनें ओळखलें होतें हेंही तितकेंच खरें. शेवटीं हिंदु-मुसलमानांचें आपसांत एकमत होत नाहीं, हें पाहून पडत्या फळाची आज्ञा समजून मुख्य प्रधानांनीं जातीय निर्णय दिला आणि हा प्रश्न आपल्या दृष्टीनें


निकालांत काढला. हा निर्णय मुसलमानांना अनुकूल आहे, हें सांगावयास नकोच. सरकारनें नवीन दिलेल्या सुधारणा जनतेच्या आकांक्षा पूर्ण करणाऱ्या नाहींत व म्हणून जनतेचा त्यांना कसून विरोध होईल हें सरकार जाणून आहे. हिंदूंच्या राष्ट्रीय वृत्तीची सरकारला ओळख आहे. अशा स्थितींत आपली नवीन घटना उचलून धरून आपणांस साह्य करायला कोणी तरी सरकारला पाहिजेच होतें. जातीय निर्णयाच्या द्वारा सरकारनें मुसलमानांचें हें सहाय्य मिळविलें आहे. हा जातीय निर्णय मुसलमानांना फायद्याचा असला, तरी त्यामुळें हिंदी राष्ट्राचें चिरकालिक नुकसान होणार आहे, हें कोणाही तटस्थ माणसाला कबूल करावें लागेल.

झाल्या गोष्टीबद्दल कोणाला किती दोष द्यावा, हा प्रश्न आहे. कॉंग्रेसनें राष्ट्रीय वृत्तीस अनुसरून आणि तिला थोडी मुरड घालून मुसलमानांना संतुष्ट करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. हिंदु सभेनें मुसलमानांच्या मागण्यांना विरोध केला, तो स्वतःच्या फायद्याकरितां नव्हे, तर राष्ट्राच्या हिताकडे दृष्टी देऊन. ' आम्ही हिंदू म्हणून आम्हांला हे विशेष हक्क पाहिजेत ' अशी मागणी ज्या प्रांतांत हिंदू अल्पसंख्य आहेत त्या प्रांतांतील हिंदूंनीं देखील कधीं केली नाहीं. मुसलमान जें तत्व स्वतःला लावूं पहातात तेंच ते हिंदूंना लावण्याला तयार नाहींत हें मोठें आश्चर्य आहे. पंजाब आणि बंगाल प्रांतांत मुसलमान बहुसंख्य असूनही त्यांना लोकसंख्येच्या प्रमाणांत राखीव जागा पाहिजेत. मग ज्या प्रांतांत हिंदू बहुसंख्य आहेत तेथेंही त्यांना तोच अधिकार कां असूं नये ? ज्या प्रांतात मुसलमान अल्पसंख्य आहेत तेथें त्यांना ज्या सवलती आहेत, त्याच सवलती ज्या प्रांतांत हिंदु अल्पसंख्य आहेत तेथें त्यांना कां मिळूं नयेत ? जातीय तत्त्वावर सिंध प्रांत निराळा करण्याची मागणी करणें हेंही बुद्धीला पटण्यासारखें नाहीं. अल्पसंख्याक लोक फक्त हिंदुस्थानांतच आहेत आणि जगाच्या पाठीवर इतरत्र कोठेंही नाहींत असें नाहीं. राष्ट्रसंघापुढें हा प्रश्न होता आणि आपल्या दृष्टीनें त्यानें तो सोडवूनही टाकला. पण हिंदुस्थान राष्ट्रसंघाचा सभासद असूनही त्या योजनेचा फायदा त्याला मिळत नाहीं हें आश्चर्य नव्हे काय ? एका बाजूला हिंदू महासभेची भूमिका आणि दुसऱ्या बाजूला मुसलमानांची भूमिका डोळ्यांपुढें ठेवून त्यापैकीं राष्ट्रीयत्वाच्या कसोटीस उतर-



श्री. सी. विजयराघवाचारिअर

नागपूर-१९२१




मि० आल्फ्रेड वेब

मद्रास-१८९४



मि० जॉर्ज यूल

अलाहाबाद-१८८८



बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी

पुणें–१८९५ अहमदाबाद १९०२




श्री. लालमोहन घोष

मद्रास–१९०३



ना. गो. कृ. गोखले

बनारस–१९०५



मौ. महमद अली

कोकोनाडा–१९२३

णारी भूमिका कोणती, हें कोणत्याही तिऱ्हाइतानें खुशाल ठरवावें. हिंदूंनीं पड खाऊन ऐक्याची जी जी योजना ठरवावी, ती ती मुसलमानांनीं अमान्य करावी, ही सर्व ऐक्यपरिषदांची फलश्रुति आहे. ‘ हिंदू आम्हांस एवढें देत आहेत, तुम्ही त्याहून अधिक काय देतां तें बोला ’ असें एकीकडे सरकारास बोलावें, आणि दुसरीकडे सरकार देईल तें हिंदूंच्या पुढें करून ‘ यापेक्षां तुम्हीं काय देतां तें बोला ’ असें त्यांना म्हणावें. असा मुसलमानांनीं आपल्या सहकार्याचा उघड उघड लिलांव चालविला. सरकार सत्ताधारी असल्यामुळें मुसलमानांना देण्यास त्याच्याजवळ अर्थातच पुष्कळ आहे. म्हणून मुसलमानांनीं सरकारास विकून घेतलें. ऐक्य परिषदा अयशस्वी होण्याचें मुख्य कारण हेंच. सरकारकडून स्वराज्य घेण्या-मध्यें मुसलमानांनी हिंदूंस पूर्ण सहाय्य करावें व मग आपल्या वाटेल त्या मागण्या पूर्ण करून घ्याव्यात, या गोष्टीला हिंदु तयार आहेत. पण आपल्या मागण्या पदरात पडल्याखेरीज मुसलमान स्वरा ज्याची गोष्ट बोलण्यास तयार नाहींत. आणि मुसलमानांच्या मागण्या आज मान्य करावयाच्या म्हणजे स्वराज्याचा प्रश्न आपल्या हातानें दूर लोटण्या-सारखें आहे. सरकारशीं लढावें तर मुसलमान आडवे येतात आणि मुसल-मानाशीं लढावें तर सरकारचा तिसरा पक्ष असल्यामुळें यश येत नाहीं असें हें त्रांगडें आहे. यांतून सुटावयाचें तर मुसलमानांचेकरितां शक्य तेवढी पड खाऊन त्यांच्या साहाय्यानें प्रथम सरकारवर मात करावी असें काँग्रेसचें धोरण आहे. पण त्यामुळें तरी निभाव लागेल कीं नाहीं हा प्रश्नच आहे. कारण मुसलमानांत राष्ट्रीय भावनेचा उदय न झाल्यामुळें गोष्टी या थराला आल्या आहेत. त्यांच्या मागण्या मान्य होताक्षणींच त्यांचेमध्यें राष्ट्रीय भावनेचा उदय होईल ही आशा व्यर्थ आहे. अर्थात् तूर्त तरी कालावर विसम्बून राहण्याशिवाय दुसरें गत्यंतर नाहीं.

एका तोंडानें ‘ जातीय निर्णय ’ अराष्ट्रीय ठरवावयाचा व दुसऱ्या तोंडानें तो ‘ ना मान्य ना अमान्य ’ असें म्हणावयाचें ही काँग्रेसनें आज स्वीकारलेली भूमिका मात्र तर्कदृष्ट्या विसंगत व म्हणून असमर्थनीय ठरते. निर्णयाला मान्यता देणाऱ्या बॅ० जिना यांच्या असेंब्लींतील ठरावाला पाठिंबा देऊन नांवाला घेतलेली ही तटस्थपणाची भूमिकाही काँग्रेसनें सोडून दिली.

'नवीन घटना अमान्य म्हणून त्यांतील निर्णयही अमान्य' असें म्हटलें असतें तर बिघडलें असतें असें वाटत नाहीं. त्यामुळें कॉंग्रेसच्या तटस्थपणाला बाध आला नसताच, पण तिच्या राष्ट्रीय वृत्तीलाही कमीपणा आला नसता.

अनुभवावरून आज असें म्हणावें लागतें कीं सुरुवातीलाच मुसलमानांच्या मागण्या चटदिशीं मान्य करून टाकल्या असत्या तर प्रकरण चिडीला गेले नसतें आणि ऐक्याच्या जोरावर सरकारकडून अधिक हक्क मिळवितां आले असते. लोकमान्यांनीं लखनौला हीच दूरदृष्टि ठेवली होती. आज मुसलमानांना जें मिळालें आहे त्या मानानें त्यांच्या पहिल्या मागण्या कितीतरी सौम्य होत्या. त्या वेळीं निदान संयुक्त मतदार संघ तरी पदरांत पडला असता. आज संयुक्त मतदारसंघ गेला, बाकीच्या अराष्ट्रीय मागण्या मान्य झाल्या, पण राजकीय हक्क विशेष मिळाले नाहींत आणि हिंदु–मुसलमानांची परस्परांविषयीं साशंक वृत्ति कायम राहिली! तिसऱ्या पक्षाला दाणे टाकून कोंबडी झुंजविण्याला फार वेळ मिळाला. एक एक वर्ष जों जों लोटलें तों तों समेट दुरावत चालला. आज तो किती तरी दूर गेलेला आहे. या लढ्याला धार्मिक स्वरूप न देतां वर्गकलहाचें आर्थिक स्वरूप देऊन तो निकालांत काढण्याची सोशॅलिस्टांची महत्वाकांक्षा आहे. पण धार्मिक युद्धाची जागा वर्गयुद्ध घेईल एवढाच फरक होईल. तृतीय पक्षाला दोहोंपासून सारखाच लाभ घेतां येईल!

---

५२५६

( ८ )

# कॉँग्रेस व औद्योगिक सुधारणा

राज्यकारभारांत सुधारणा करण्याच्या उद्देशानें कॉँग्रेसचा जन्म झाला असल्यामुळें तिचें लक्ष प्रथम तिकडेच होतें. कौन्सिलें लोकनियुक्त करावीं, भारतमंत्र्यांचें कौन्सिल रद्द करावें, सिव्हिल सर्व्हिस परीक्षा इंग्लंडांत व हिंदुस्थानांत एकाच वेळीं घ्याव्या, ज्यूरीची पद्धत सुरू करावी, लष्करांत हिंदी लोकांना घ्यावें इत्यादि स्वरूपाचे ठराव प्रारंभीं तिनें पास केले आहेत. राज्यकारभाराशीं संबद्ध असलेल्या करांकडे हळुहळू तिचें लक्ष गेलें. विशिष्ट रकमेखालीं इन्कमटॅक्स आकारण्यांत येऊं नये, मिठावरील कर कमी करावा, जेथें कायम जमीनधाऱ्याची पद्धति नाहीं तेथें ती सुरू करावी, या स्वरूपाचे ठराव करण्याचें तिनें सुरू केलें. चलनावरचा ठराव प्रथम १८९२ सालीं पास करण्यांत आला. याच वर्षी देशांतील वाढत्या दारिद्र्याचा व उपासमारीचा उल्लेख करून तीं दूर करण्याकरितां सरकारनें शेतीची सुधारणा करावी असा ठराव केला. उद्योगधंद्याच्या प्रश्नाला कॉँग्रेसनें साक्षात् हात १८९४ सालीं घातला असें म्हटलें पाहिजे. परदेशी कापडावर १८९४ सालीं पांच टक्क्यांची जकात बसविण्यांत आली. याचा फायदा हिंदी गिरण्यांना मिळूं नये म्हणून हिंदी गिरण्यांतील मालावरही तेवढीच अंतर्गत

जकात सरकारनें लादली. असें करण्यांत हिंदी उद्योगधंद्यांचें हित पहाण्यापेक्षां विलायती उद्योगधंद्यांचेंच हित सरकारनें पाहिलें याबद्दल कॉंग्रेसनें निषेध केला. १८९६ सालीं देशांत मोठा दुष्काळ पडला व हजारों लोक मेले. अशा दुष्काळांची पुनरावृत्ती होऊं द्यावयाची नसेल तर सरकारनें देशी उद्योगधंद्यांना व कलाकुसरींना उत्तेजन देऊन त्यांची वाढ केली पाहिजे, हा ठराव त्या वर्षीच्या कॉंग्रेसनें पास केला. १९०० सालीं कॉंग्रेसनें प्रमुख प्रांतांतील पुढाऱ्यांची एक औद्योगिक कमिटी नेमून पंजाबचे लाला हरिकिसन लाल यांना तिचे सेक्रेटरी नेमलें. औद्योगिक बाबतींत या कमिटीनें सूचना कराव्या अशी कॉंग्रेसची अपेक्षा होती. हिंदुस्थानांतील उत्पादनाचीं आणि विभागणीचीं साधनें नवीन पद्धतीचीं नसल्यामुळें हिंदी उद्योगधंद्यांना मंदीचे दिवस आलेले आहेत, त्याचप्रमाणें आमच्या उद्योगधंद्यांमध्यें व्हावी तशी अद्यापि संघटणा झाली नाहीं, असें वाटत असल्यामुळें या प्रश्नाचा साधकबाधक रीतीनें विचार करण्याकरितां कॉंग्रेसनें एक कमिटी नेमली. त्या कमिटीमध्यें लो. टिळक, पं. मालवीय, भूपेंद्रनाथ बसू, न्या. रानडे, गंगाप्रसाद वर्मा, हरिकिसन लाल, उमरबक्ष, चौधरी आणि पाठक हे सभासद होते.

कॉंग्रेसच्या बरोबरीनें औद्योगिक परिषदा आणि औद्योगिक प्रदर्शनें भरविण्याची प्रथा १९०१ सालापासूनच सुरू झाली. यामध्यें विशेष पुढाकार मुधोळकर यांनीं घेतला होता. १९०२ सालीं अहमदाबाद येथें भरलेल्या औद्योगिक परिषदेचा अनावरण समारंभ बडोद्याचे महाराज श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांचे हस्तें झाला. याच वर्षी कॉंग्रेसनें औद्योगिक बाबतींत महत्त्वाचे ठराव केले. देशी उद्योगधंद्यांच्या पुनरुज्जीवनाला आणि संवर्धनाला सरकारनें मदत करून त्याकरितां देशामध्यें धंदेशिक्षणाच्या शाळा आणि कॉलेजें उघडण्याची सरकारला विनंति करण्यांत आली. परदेशी मालापेक्षां सरकारनें देशीं मालाकडे विशेष आपुलकीच्या भावनेनें पहावें, असा विनंतिवजा ठराव या वर्षी विषयनियामक कमिटींत आला होता. पण त्याबाबतींत बराच मतभेद दिसून आल्यामुळें उघड अधिवेशनांत तो येऊं शकला नाहीं. या एकाच गोष्टीवरून कॉंग्रेसचे पुढारी त्या वेळीं किती नेमस्त वृत्तीचे होते, याचा अंदाज करतां येईल.

१९०६ मध्यें वंगभंगानें कॅाँग्रेसमध्यें मोठीच विचारक्रांति घडवून आणिली. आतांपर्यंत सरकारला भीत भीत विनंति करण्यापलीकडे कॅाँग्रेसचें पाऊल गेलें नव्हतें. पण वर्षानुवर्षें विनवण्या करूनही सरकारचा दृष्टिकोन यत्किंचित्‌ही बदलत नाहीं; एवढेंच नव्हे, तर लोकमतास धाब्यावर बसविण्याचें प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, हें पाहून कॅाँग्रेसनें आपला रोख जनतेकडे वळविला. बनिया सरकारला ताळ्यावर आणावयाचें असेल, तर त्याच्या व्यापारावर घाव घातला पाहिजे, ही गोष्ट प्रथम बंगाली लोकांनीं ओळखली. त्यांनीं स्वदेशी व बहिष्काराचें दुधारी हत्यार हातांत घेऊन तें त्वेषानें सरकारवर चालविण्याचा सपाटा चालविला. जनतेनें विदेशी मालावर बहिष्कार घालून स्वदेशी माल वापरावा, मग तसें करतांना थोडासा त्याग करावा लागला तरी चालेल, असा बंगाली लोकांनीं उपदेश चालविला. बहिष्काराचें हत्यार बेजबाबदार राज्यपद्धतीविरुद्ध निषेध प्रदर्शित करण्याकरितां म्हणून उचलण्यांत आलें होतें. हें हत्यार न्याय्य असल्याबद्दल कॅाँग्रेसनें १९०६ सालीं ठराव केला. बंगाली लोकांनीं हातांत घेतलेल्या या हत्याराचा प्रसार सर्व देशभर करावा, असें बिपिनचंद्र पाल प्रभृतींचें म्हणणें होतें. पण कॅाँग्रेसच्या त्या वेळच्या चालकांना ती गोष्ट पसंत नव्हती. म्हणून पुढें जवळ जवळ २० वर्षें बहिष्काराचा ठराव कॅाँग्रेसमध्यें येऊं शकला नाहीं. स्वदेशीचा ठराव मात्र बहुतेक दरसाल पास करण्यांत येत असे. स्वदेशी चळवळीनें जनतेमध्यें उद्योगधंद्यांची आवड उत्पन्न होऊन पुष्कळ नवीन धंदे उदयाला आले. या चळवळीला महाराष्ट्रांतील पैसाफंडानें बराच मोठा हातभार लाविला आहे.

स्वदेशीचे ठराव दहा पंधरा वर्षें दरसाल पास करण्यांत येत होते, तरी या चळवळीला खरी चालना असहकारितेच्या युगांत मिळाली. नेमस्त लोकांप्रमाणेंच प्रथम महात्माजीही स्वदेशीच्या दुसऱ्या अंगाला म्हणजे बहिष्काराला विरुद्ध होते. स्वदेशी वापरा असें सांगण्यामध्यें परदेशी वापरूं नका, हा अर्थ अंतर्भूत होत असल्यामुळें बहिष्काराचा निराळा उपदेश करण्याचें कारण नाहीं, बहिष्कारामध्यें द्वेषाची भावना व्यक्त होते, आणि असहकारितेमध्यें तर कायिक, वाचिक, मानसिक द्वेषाला थोडा देखील वाव नाहीं, हें

महात्माजींच्या विचारसरणीचें थोडक्यांत सार होतें. पण थोडक्याच वर्षांत महात्माजींना आपल्या विचारांतील दोष कळून आले असें दिसतें. कारण ते नुसत्या परदेशी मालावरच नव्हे, तर ब्रिटिश मालावर देखील बहिष्कार घालण्यास तयार झाले ! कायदेभंगाच्या दोन्ही युद्धांत या हत्याराला काँग्रेसनें महत्वाचें स्थान दिलें होतें. परदेशी मालाच्या दुकानावर काँग्रेसच्या स्वयंसेवकाकडून शांततेचें पिकेटिंग चालू होतें.

महात्माजींच्या कारकीर्दींत स्वदेशीच्या व्याख्येला मात्र फारच मर्यादित स्वरूप प्राप्त झालें. हातानीं केलेल्या मालाला पहिलें स्थान मिळून यंत्रावरील मालाला दुय्यम स्थान मिळालें. काँग्रेसच्या व्यवहारांत फक्त हातसुताच्या आणि हातविणीच्या खादीलाच प्रवेश मिळतो. स्वदेशीविषयीं काँग्रेसची विचारसरणी आज काय आहे, हें कराची काँग्रेसमध्यें पास झालेल्या पुढील ठरावावरून चांगलें लक्षांत येईल. खादीकार्याचा दहा वर्षे अनुभव घेऊन हा ठराव करण्यांत आला आहे, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. ठरावाचा आशय असा:—

"गेल्या दहा वर्षांमध्यें शेंकडों गांवांत काम करून असा अनुभव आला आहे कीं, फुरसतीच्या वेळीं जोडधंदा न मिळाल्यामुळें देशांतील बेकारी आणि दारिद्र्य वाढत आहे. अशा वेळीं चरखा हाच लोकांचा त्राता होय. देशी किंवा परदेशी गिरणीचा माल वापरल्यानें परदेशांत पैसा जातो आणि आपल्या श्रमाचा पूर्ण मोबदला लोकांना मिळत नाहीं. खादी अपुरी असेल तेव्हांच हिंदी गिरण्यांतील माल वापरावा. जनतेनें आणि दुकानदारांनी परदेशी मालावर पूर्ण बहिष्कार घालावा. संस्थानिकांनीं आपल्या हद्दींत परदेशी कापड येऊं देऊं नये. देशी गिरणीवाल्यांनीं हातसुताचें कापड वापरून घरगुती धंद्यांना आपला नैतिक पाठिंबा द्यावा. खादीशीं स्पर्धा करील असें कापड गिरण्यांतून त्यांनीं काढूं नये. आपल्या मालाची किंमत त्यांनीं शक्य तेवढी कमी ठेवावी. परदेशी कापसाचें किंवा रेशमाचें सूत त्यांनी वापरूं नये. दुकानदारांजवळ आज जो परदेशी माल असेल, त्याच्याबद्दल त्यांना देशी कापड देऊन त्यांच्याजवळचें परदेशी कापड पुन्हां निर्यात करण्यास मदत करावी. गिरणीमध्यें आपलें

हिताहित गुंतलेलें आहे, अशी भावना मजुरांच्या मनांत उत्पन्न होईल, अशा रीतीनें त्यांनीं त्यांच्याशीं वागावें."

दरसाल चोवीस हजार वार स्वतः काढलेलें सूत देईल, त्यालाच काँग्रेसचा मताधिकार व खादी वापरील त्यालाच काँग्रेसचें अधिकारपद देऊन गांधीजींनीं काँग्रेसच्या क्षेत्रांत तरी कापडापुरती सर्वांवर आपल्या शुद्ध स्वदेशीची सक्ती केली आहे. खादीच्या चळवळीनें खेडेगावांतील शेंकडों लोकांच्या पोटाला दोन घांस अधिक दिले आहेत यांत शंका नाहीं. काँग्रेसच्या लोकांना खेडेगांवांपर्यंत पोंचायला तें एक चांगलें साधन मिळालें आहे. तथापि स्वदेशीचा प्रश्न या योगानें कितीसा सुटेल, याबद्दल शंकाच आहे. खादीच्या जोडीला गेल्या वर्षापासून आणखी घरगुती धंद्याची जोड देण्यांत आली आहे. मेलेल्या किंवा मरूं घातलेल्या खेडेगांवांतील उद्योगधंद्यांचें पुनरुज्जीवन करून त्याबरोबर खेड्यांतील लोकांची नैतिक आणि शारीरिक सुधारणा करणें, हें गेल्या वर्षीं स्थापन झालेल्या अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाचें ध्येय आहे. खादीकरतां दहा वर्षांपूर्वी काढलेला चरखासंघ आणि हा संघ हीं दोन्ही काँग्रेसचींच अपत्यें असलीं, तरी त्यांची संघटणा आणि व्यवस्था अगदीं स्वतंत्र असून खास गांधीजींची त्यांच्यावर देखरेख आहे.

गांधीजींची आणि पर्यायानें काँग्रेसची स्वदेशीची व्याख्या पुष्कळांना संकुचित वाटली तरी गांधींनी स्वदेशीच्या प्रश्नाला विलक्षण चालना देऊन देशांत स्वदेशीचें सार्वत्रिक वातावरण उत्पन्न केलें व जनतेला स्वदेशीची गोडी लावली, याबद्दल देश त्यांचा सदैव ऋणी राहील. स्वदेशीच्या वातावरणामुळें देशांत नवीन नवीन उद्योगधंदे उदयाला येत असून जनतेकडून त्यांना वाढता आश्रय मिळत आहे. अपेक्षेप्रमाणें यश मिळत नसलें, तरी प्रत्येक चळवळींत स्वदेशीचें पाऊल पुढें पडत आहे. या कार्याला एकीकडून देशांतील धनिक व व्यापारीवर्गाकडून आणि दुसरीकडून सरकारकडून पाठिंबा मिळाल्याखेरीज अपेक्षित यश पदरांत पडणार नाहीं. सरकार परकीय असल्यामुळें हिंदी लोकांच्या हितसंबंधांपेक्षां इंग्रज लोकांच्या हितसंबंधांकडेच त्याचें नेहमीं अधिक लक्ष असतें आणि आर्थिक बाबतींतील बहुतेक कायदे याच दृष्टीनें करण्यांत येतात ही गोष्ट अनेक वर्षांच्या अनुभवानें सिद्ध आहे.

ज्या नवीन घटनेचा सरकारकडून एवढा उदो उदो करण्यांत येत आहे, त्या घटनेमध्यें हिंदी लोकांना आर्थिक स्वातंत्र्य जवळ जवळ मुळींच नसल्यामुळें नव्या अमदानींत हिंदी उद्योगधंद्यांना ऊर्जितावस्था येण्याचा फारच थोडा संभव आहे. राहतां राहिले आमचे कारखानदार आणि व्यापारी. स्वदेशी चळवळीनेंच आपला तरणोपाय आहे, असें समजून कारखानदारांनीं आपल्या मालांच्या किंमती शक्य तेवढया कमी ठेवल्या पाहिजेत. हिंदी कारखानदार आणि व्यापारी गिऱ्हाइकांच्या स्वदेशी भावनेचा गैरफायदा घेतात आणि पुढें त्यांच्या अविश्वासास कारणीभूत होतात आणि मग चळवळीचें पाऊल मागें पडत जातें, असा प्रत्येक वेळीं अनुभव आलेला आहे. कॉंग्रेसच्या पहिल्या अमदानींत दादाभाई नवरोजी, रमेशचंद्र दत्त, दिनशा वाच्छा, मुधोळकर इत्यादि पुढाऱ्यानीं हिंदी लोकांच्या दारिद्र्याचें भयाण चित्र रेखाटून त्याची जबाबदारी सरकारच्या पदरांत टाकली. पण तेवढयानें निभाव न लागल्यामुळें कॉंग्रेसनें जनतेकडे वळून तिला स्वदेशीचा मंत्र सांगितला. स्वदेशी हीच स्वराज्याची गुरुकिल्ली आहे. तिच्याकडे राष्ट्राचें लक्ष वेधण्याची बहुमोल कामगिरी कॉंग्रेसनेंच केली आहे.

( १ )

# काँग्रेस व शेतकरी–कामकरी

'काँग्रेस आणि बहुजनसमाज' असेंच या प्रकरणाला नांव द्यावयाचें होतें, पण शेतकरी–कामकरी हा शब्द हल्लीं रूढ होऊं लागल्यामुळें तोच वापरला आहे. या वर्गाकरितां काँग्रेस काय करीत आहे, हा प्रश्न सध्यां विचारण्यांत येत असतो.

काँग्रेस ज्या वेळीं जन्माला आली, त्या वेळीं समाजाकडे वर्गदृष्टीनें पहाण्याची कल्पना रूढ नव्हती. पाश्चात्य देशांत तिचा नुकताच उदय होऊं लागला होता. तेथें ती बद्धमुल होऊन हिंदुस्थानला तिचा संसर्ग होईपर्यंत इतकीं वर्षें लागलीं व म्हणूनच वरील प्रश्न विचारण्याची बुद्धि होऊं लागली.

देशाची राजकीय उन्नति करणें हें ध्येय काँग्रेसनें पुढें ठेवलें होतें. देश या शब्दामध्यें अर्थातच लहानथोर, गरिबश्रीमंत, जमिनदारशेतकरी, भांडवलवाला व मजूर या सर्वांचा अंतर्भाव होतो. अमूकच वर्गाची उन्नति करावयाची हें ध्येय काँग्रेसनें आपल्यापुढें कधींही ठेवलें नाहीं. काँग्रेसनें पास केलेल्या ठरावांकडे पाहिलें तर बहुजनसमाजाला येत चाललेलें दारिद्र्य कसें नाहींसें होईल, या एका प्रश्नाकडेच तिची दृष्टि लागलेली दिसते. शेतसारा कमी करावा, मिठावरील कर कमी करावा, जंगलच्या कायद्यांत सुधारणा व्हावी, प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करावा, मद्यपानबंदी करावी इत्यादि प्रकारचे ठराव बहुजनसमाजाच्या हिताकडे दृष्टि देऊनच काँग्रेसनें वारंवार पास केलेले आहेत.

दारिद्र्याचें किंवा सर्व प्रकारच्या ऐहिक दुःखांचें मूळ राजकीय पारतंत्र्य हें असल्यामुळें तें नष्ट करून हिंदी लोकांच्या हातांत राजकीय अधिकार कसे येत जातील, याचाच विचार प्रत्येक वर्षी कांग्रेस करीत आली आहे.

पण समाजवादाच्या तत्वांचा प्रसार पाश्चात्यांच्या संसर्गानें हिंदुस्थानांत झपाट्यानें होऊं लागल्यानें मिळावयाच्या राजकीय हक्कांकडे पहाण्याची दृष्टिही बदलूं लागली. 'आज जे देश राजकीयदृष्ट्या स्वतंत्र समजण्यांत येतात ते वस्तुतः स्वतंत्र नाहींत. परतंत्र देशांतील बहुजनसमाजाचीं जीं दुःखें आहेत तींच दुःखें त्या देशांतील बहुजनसमाजांचीं देखील आहेत. जमिनदार, कारखानदार आणि भांडवलवाला वर्ग बहुजनसमाजाला पिळून काढून त्यावर आपली सत्ता चालवीत असतो. श्रमजीवी वर्गानें मरेपर्यंत काम करून संपत्ति कमवावी व भांडवलदार वर्गानें त्या संपत्तीचा फायदा घ्यावा, अशी समाजव्यवस्था औद्योगिक युगानें प्रस्थापित केली आहे. त्यामुळें जगांतील सुख आणि शांति नष्ट होत चाललीं आहेत. श्रमजीवी लोकांच्या हातांत सत्ता देणें, हा एकच ही परिस्थिति नष्ट करण्याचा उपाय आहे. म्हणून स्वराज्याचा विचार करतांना ' स्व ' या शब्दाची व्याप्ती कोठपर्यंत आहे, त्यामध्यें देशांतील फक्त पैसेवाला वर्गच मोडतो कीं श्रमजीवी लोकांचाही अंतर्भाव होतो', अशी शंका घेण्यांत येऊं लागली. १९३० सालानंतरच कॉंग्रेसला हा प्रश्न विचारण्यांत येऊं लागला. १९१७ सालीं रशियांत क्रांति होऊन शेतकऱ्यांचें आणि कामकऱ्यांचें राज्य स्थापन झालें. त्यामुळें समाजसत्तावादाच्या विचारांची लाट जगभर पसरली. हिंदुस्थानाला तिचें पाणी लागलें हें कानपूरच्या आणि नंतर मीरतच्या कटावरून समजून आलें. गेल्या आठदहा वर्षांत हिंदुस्थानांत समाजसत्तावादाचें वाङ्मय पुष्कळ आलें आणि तें तरुणांच्या हातांत खेळूं लागलें. १९३० आणि १९३२ या दोन्ही सालीं झालेल्या कायदेभंगाच्या प्रचंड युद्धामध्यें हजारों तरुणांना तुरुंगांत एकत्र रहाण्याचा प्रसंग आला. अशा वेळीं विचारविनिमय झाल्यावांचून कसा राहील ? तुरुंगांतून समाजसत्तावादाचा झपाट्यानें प्रसार झाला. बाहेर पडतांच पुष्कळांनीं ह्या प्रसाराच्या कार्यालाच वाहून घेतलें. कॉंग्रेसकडे पहाण्याची नवीन पिढीची दृष्टि बदलण्याचें कारण हेंच होय.

१९३१ सालीं तुरुंगांतून सुटून बाहेर आल्याबरोबर तरुणांच्या या विचारांचा काँग्रेसवर पगडा बसला. त्या वर्षी कराची येथें भरलेल्या अधिवेशनांत जो स्वराज्याचा ठराव पास झाला, त्यावरून ही गोष्ट स्पष्ट दिसून येते. बहुजनसमाजाची पिळवणूक थांबविण्याकरितां उपासमार होणाऱ्या लाखों लोकांना ज्यामध्यें खरें आर्थिक स्वातंत्र्य मिळेल, असेंच स्वराज्य पाहिजे असें त्या ठरावाच्या प्रारंभींच म्हटलें आहे. बहुजनसमाजाला काँग्रेसच्या या भावी स्वराज्याची स्पष्ट कल्पना यावी, म्हणून या ठरावांतच जनतेच्या मूलभूत हक्कांची घोषणा करण्यांत आली. कामकऱ्यांना पोटभर मजूरी, कामाचे मर्यादित तास, कारखान्याची व रहाण्याची आरोग्यदायक जागा, म्हातारपणाची योग्य तरतूद, आजारीपणामध्यें किंवा बेकारींत अवश्य ती मदत, जमीनदारांच्या गुलामगिरींतून शेतकऱ्यांची सुटका, स्त्री व बाल कामगारांना योग्य तें संरक्षण, मजूर-संघ स्थापण्याचें स्वातंत्र्य, जमिनीवरील कर किंवा खंड यांच्यामध्यें बरीचशी घट, शेतकीच्या उत्पन्नावर विशिष्ट मर्यादेपलीकडे वाढत्या स्वरूपाचा कर, वारसावर कर, मोफत प्राथमिक शिक्षण, सार्वत्रिक मताधिकार, सावकारीवर नियंत्रण, पूर्ण मद्यपानबंदी, मुख्य उद्योगधंद्यावर सरकारचें नियंत्रण इत्यादि बाबींचा या मूलभूत हक्कांमध्यें समावेश करण्यांत आला होता. मास्कोच्या प्रवासानें पं. जवाहिरलाल नेहरू यांच्या मनावर समाजसत्तावादाचा पगडा बसला, आणि त्यांच्याच आग्रहानें वरील ठराव पास करण्यांत आला. तथापि काँग्रेसच्या आजच्या सूत्रचालकांना तो मनापासून मान्य असेल, असें त्यांनीं इतरत्र काढलेल्या उद्गारांवरून दिसत नाहीं. त्यानंतर मुंबई येथें झालेल्या काँग्रेसमध्यें वरील ठरावाचा किंवा तशाच प्रकारें दुसऱ्या ठरावाचा पुनरुच्चार करण्यांत आला नाहीं. तथापि नवीन पिढीचीं मतें समाजसत्तावादाकडे पूर्णपणें झुकलेलीं असून, आज नाहीं उद्यां काँग्रेस त्यांच्या ताब्यांत जाणार आणि आजच्या पुढाऱ्यांना नेमस्त म्हणून या लोकांच्या शिव्या खाव्या लागणार, असें चिन्ह आज स्पष्ट दिसत आहे. गेल्या वर्षी मे महिन्यांत काँग्रेस-सोशॅलिस्ट पक्षाची स्थापना झाली. पाटणा येथें आचार्य नरेंद्रदेव यांच्या अध्यक्षतेखालीं लागलीच त्याची पहिली परिषदही झाली. त्यानंतर यापक्षानें आपली दुसरी परिषद काँग्रेसच्या अधिवेशनाचे वेळीं आक्टोबर महिन्यांत मुंबई येथें भरविली. या पक्षानें प्रांतानिहाय आपल्या शाखा काढल्या

असून आपल्या तत्त्वांचा तरुण पिढींतून जोरानें प्रसार चालविला आहे. काँग्रेस कमिट्या किंवा स्थानिक स्वराज्यसंस्था काबीज करण्याकडे त्याचा कल आहे. हा पक्ष स्वतःला काँग्रेसमधला पक्ष ह्मणवून घेत आहे. तथापि काँग्रेस-बरोबर त्याचें किती दिवस जुळेल हा प्रश्नच आहे ! केवळ सोय म्हणून किंवा काँग्रेसच्या नांवाचा स्वतःला फायदा मिळावा म्हणून तो काँग्रेसमध्यें आहे एवढेंच. पं. जवाहिरलाल नेहरू हे आपलें पुढारीपण स्वीकारतील अशी त्याला मोठी आशा वाटत आहे.

आजच्या काँग्रेस पुढाऱ्यांची विचारसरणी अशी कीं काँग्रेस अमुकच वर्गाकरितां झगडत नाहीं, तिच्या झगड्याला यश आलें तर आर्थिक फायदा बहुजनसमाजाचाच होणार. महात्मा गांधींनीं स्वराज्याचें सार म्हणून ज्या अकरा मागण्या केल्या होत्या, त्यामध्यें पैसेवाल्या वर्गापेक्षां श्रमजीवी गरीब वर्गाच्या हिताकडेच विशेष नजर देण्यांत आली होती. हुंडणावळीच्या भावानें हिंदी शेतकऱ्यांचें नुकसान होतें म्हणून रुपयाची किंमत सोळा पेन्स कायम करावी, जमीन महसुलाचें प्रमाण निम्मे करावें, मिठावरील कर माफ करावा, लष्करी खर्च निम्मा आणावा, सरकारी अधिकाऱ्यांचे पगार कमी करावे, देशी कापडांच्या संरक्षणार्थ परदेशी कापडावर जकात बसवावी, हिंदुस्थानचा किनारा हिंदी जहाजांकरितांच राखून ठेवावा, या मागण्या महात्माजींनीं केल्या होत्या. या मागण्या मान्य झाल्या तरीही बहुजन-समाजाचें कल्याण होणार नाहीं, असें समाजसत्तावाद्यांचें म्हणणें आहे. यांत्रिक सुधारणेनें घडवून आणलेली समाजव्यवस्था आमूलाग्र बदलणें आणि संपत्तीच्या उत्पादनाचीं आणि विभागणीचीं साधनें सामान्य जनस-मुदायाच्या हातांत देणें हाच त्याच्या दृष्टीनें सामाजिक कल्याणाचा राजमार्ग आहे. सोशॅलिस्ट पक्ष हाच एक काँग्रेसमधला आज उदयोन्मुख पक्ष असून वरील दिशेनें काँग्रेसच्या धोरणाला वळण देण्याचा येत्या पांच दहा वर्षांत तो परा-काष्ठेचा प्रयत्न केल्यावांचून रहाणार नाहीं. या विचारसरणीचा देशांत प्रसार होत गेल्यास सध्यां चालू असलेले हिंदू आणि मुसलमान हे धार्मिक स्वरूपाचे तंटे मागे पडून एका बाजूला जमिनदार–कारखानदार–भांडवलदार आणि दुसऱ्या बाजूला श्रमजीवी कामगार आणि शेतकरी असले आर्थिक तंटे देशामध्यें सुरू होतील, असें वाटतें.

भविष्यकाळीं कांहीं का होईना भूतकाळीं काँग्रेसनें बहुजनसमाजाकरितां पुष्कळ प्रयत्न केले आहेत, ही गोष्ट नाकारतां येणार नाहीं. बहुजन समाजामध्यें आपल्या हक्कांविषयीं आज जी थोडी फार जागृती झाली आहे, तें देखील काँग्रेसच्या चळवळीचेंच फळ आहे. गेल्या पन्नास वर्षांत हिंदुस्थानची जी थोडीशी राजकीय प्रगति झाली, त्यामुळें बहुजनसमाजाचा झाला तर फायदाच झाला आहे. मिठाचा सत्याग्रह, जंगलाचा सत्याग्रह, परदेशी मालावर बहिष्कार, खादीचा प्रसार, खेड्यांतील धंद्यांचें पुनरुज्जीवन, दारूच्या दुकानांवर पिकेटिंग, या चळवळी बहुजनसमाजाच्या हिताकरितांच होत्या हें नाकबूल करून कसें चालेल?

ट्रेड युनियन काँग्रेस म्हणून मजुरांची निराळी संघटना आज दहा पंधरा वर्षें आहे. काँग्रेसपासून ही संघटना स्वतंत्र आहे. तथापि लाला लजपतराय, सुभाषचंद्र बोस, पं. जवाहरलाल नेहरू या काँग्रेसच्या पुढाऱ्यांनीं ट्रेड युनियन काँग्रेसचें अध्यक्षपद देखील मंडित केलेलें आहे. ट्रेड युनियन काँग्रेस आणि ही काँग्रेस यांचें एकीकरण करण्याचे प्रयत्न सध्यां चालू आहेत. त्यांना यश येण्याचा तूर्त संभव नसला, तरी काँग्रेसमध्यें सोशालिस्टांचें वर्चस्व वाढूं लागल्यास या दोन्ही संस्था अगदीं जवळ जवळ येतील. नेमस्तांच्या राजवटींत काँग्रेसचा संदेश सुशिक्षित वर्गाच्या पलीकडे जाऊं शकला नाहीं. तो खेडोपाडीं नेऊन पोहोंचविण्याची कामगिरी महात्माजींनीं केली आहे. काँग्रेसकरितां गेल्या चार पांच वर्षांत बहुजनसमाजानें मोठा त्याग केला आहे, यावरून काँग्रेसवरील त्यांची निष्ठा चांगलीच व्यक्त होत आहे.

( १० )

# कॉँग्रेस व कौन्सिलें

राजकीय सत्ता कायदेमंडळें आणि कार्यकारी मंडळें यांच्या वतीनें चालविण्यांत येत असल्यामुळें त्या दोहोंमध्यें आपला हात असावा, अशी कॉँग्रेसची अगदीं प्रथमपासूनची मागणी आहे. या मागणीचा कमी-अधिकपणा त्या त्या वेळच्या परिस्थितीवर अवलंबून राही एवढेंच. कॉँग्रेस जन्माला आली, त्या वेळीं कायदेमंडळें अस्तित्वांत होतीं, पण त्यांमध्यें फक्त सरकारनियुक्त सभासदच बसत. त्यांचा आकारहि अगदीं मर्यादित होता. तीं कौन्सिलेंहि सर्व प्रांतांना होतीं असें नाहीं. पहिल्याच अधिवेशनांत कॉँग्रेसनें कौन्सिलांसंबंधीं पुढीलप्रमाणें ठराव केला होता—

" विद्यमान प्रांतिक व वरिष्ठ कौन्सिलांमधून लोकनियुक्त सभासदांचें प्रमाण वाढवून त्यांची सुधारणा करावी. वायव्यप्रांत, अयोध्या आणि पंजाब या प्रांतांना कौन्सिलें द्यावीं. वार्षिक अंदाजपत्रक कौन्सिलापुढें विचाराकरितां ठेवावें. राज्यकारभारांतील सर्व खात्यांसंबंधीं प्रश्न विचारण्याची कायदेमंडळां-तील सभासदांना अधिकार असावा. कार्यकारी मंडळाविरुद्ध कायदेमंडळाच्या बहुमताची कांहीं तक्रार असेल, तर तिचा विचार करण्याकरितां हाऊस ऑफ कॉमन्सची एक स्टँडिंग कमिटी असावी. "

दुसऱ्या वर्षी याच ठरावाचा थोडा विस्तार करण्यांत आला. कायदे-मंडळांतील एकंदर सभासदांपैकीं निदान निम्मे तरी लोकनियुक्त असावे. एक-

चतुर्थांश सरकारी सभासद असावे व एक चतुर्थांश सरकारनियुक्त पण बिनसरकारी सभासद असावे. आपल्या मतांचा ज्यांना शहाणपणानें उपयोग करतां येईल, अशाच लोकांना प्रांतिक कौन्सिलांच्या मतदानाचा अधिकार असावा. मुंबई आणि बंगाल प्रांतात म्युनिसिपालिटया, डिस्ट्रिक्ट बोर्डें, चेंबर्स ऑफ कॉमर्स, आणि युनिव्हर्सिटी यांच्या सभासदांना किंवा अशाच शैक्षणिक किंवा आर्थिक दर्जा असणाऱ्या लोकांना मताधिकार असावा. मद्रास इलाख्यांत वरील संस्थांकडून किंवा त्या संस्थांनीं निवडलेल्या आणि सरकारनें नेमलेल्या अशा संमिश्र इलेक्टोरल कॉलेजेस यांना असावा. बाकीच्या प्रांताबद्दल असेंच पर्याय सुचविले होते. वरिष्ठ कौन्सिलांतील सभासदांची निवड प्रांतिक कौन्सिलांतील लोकनियुक्त सभासदांनीं करावी. सभासदांना पगार असूं नये, फक्त प्रवासाचा भत्ता असावा. कायदेमंडळांतील बहुमतानें केलेल्या एखाद्या निर्णयानें सार्वजनिक हितास बाध येत आहे, असें आढळून येत असेल तर कार्यकारी मंडळानें त्या निर्णयाप्रमाणें चालू नये. पण असें करतांना त्याबद्दलचीं कारणें एक महिन्याच्या आंत प्रसिद्ध करावीं. देशांतील वाढत्या दारिद्र्याला आळा घालून जनतेची सुधारणा करावयाची असेल, तर प्रातिनिधिक संस्थांची स्थापना हा त्याला एकच उपाय आहे असें या ठरावाच्या प्रस्तावनेंत म्हटलें होतें.

पुढें दोन वर्षे याच ठरावांचा पुनरुच्चार करण्यापलीकडे कॉंग्रेसचें पाऊल गेलें नाहीं. १८८९ मध्यें आणखी एक पाऊल पुढें टाकण्यांत आलें. कॉंग्रेसनें कौन्सिलांविषयीं एक योजना तयार करून त्या वेळीं हजर असलेले पार्लमेंटचे सभासद व हिंदी लोकांचे हितैषी मि. चार्लस ब्रॅडलॉ यांनीं ती योजना बिलाच्या रूपानें पार्लमेंटांत मांडावी, अशी विनंति केली होती. या योजनेमध्यें नवीन भाग पुढीलप्रमाणें होता—(१) जिल्हा हाच मतदारसंघ समजण्यांत यावा. (२) विशिष्ट लायकी असलेल्या २१ वर्षांवरील प्रत्येक पुरुष ब्रिटिश प्रजाजनाला मताधिकार असावा. (३) मतें बॅलेट पद्धतीनें द्यावीं. (४) मतदारांनीं १० लाख लोकसंख्येला १२ या प्रमाणांत प्रतिनिधी निवडावे आणि या प्रतिनिधींनीं ५० लक्षाला एक याप्रमाणें मध्यवर्ती कायदेमंडळांत व १० लक्षाला एक याप्रमाणें प्रांतिक कौन्सिलांत सभासद निवडून

द्यावेत. (५) निवडणूक करतांना पार्शी, ख्रिस्ती, हिन्दु किंवा मुसलमान हे जेथें अल्पसंख्य असतील, तेथें एकंदर लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षां त्यांचें प्रतिनिधित्व कमी असणार नाहीं, अशी काळजी घ्यावी.

कॉंग्रेसच्या या सूचनेप्रमाणें पुढील वर्षी मि० ब्रॅडला यांनीं १८६१ च्या इंडियन कौंसिल्स ॲक्टमध्यें सुधारणा करणारें बिल पार्लमेंटांत मांडलें. त्यां बिलाबद्दल १८९० मध्यें भरलेल्या कॉंग्रेसनें आपलें पूर्ण समाधान व्यक्त केलें.

पण कायदा प्रत्यक्ष पास झाल्यावर हें समाधान नाहींसें झालें. कारण १८९२ मध्यें पास झालेला कौन्सिल्स ॲक्ट हा अपेक्षेच्या मानानें किती तरी अपुरा होता. १९३५ सालीं होर साहेबांनीं गोड गोड शब्दांची साखर पेरून शेवटीं हिंदी लोकांना अंगठा दाखवला, त्याप्रमाणें १८९२ सालीं हिंदी लोकांना ' Real living representation ' देण्यांत येत आहे, असें सांगून जनतेला आपले प्रतिनिधि निवडण्याचा साधा हक्क देखील सरकारनें दिला नाहीं, याबद्दल कॉंग्रेसनें खेद व्यक्त केला. हे खेद प्रदर्शित करण्याचें काम वर्षानुवर्षे चाललेलें होतें. कॉंग्रेसनें वेळोवेळीं केलेल्या मागण्या पदरांत पडल्या नाहींत, तरी मागण्यांमध्यें वाढ करण्याचें काम कॉंग्रेसकडून चाललेलेंच होतें. १९०४ सालीं कायदेमंडळांतील लोकानियुक्त सभासदांनीं विलायतेंतील इंडिया कौन्सिलामध्यें व हिंदुस्थानांतील प्रांतिक आणि मध्यवर्ति कौन्सिलांमध्यें कांहीं हिंदी सभासद निवडून देण्याचा अधिकार असावा, अशी आणखी एक मागणी तिनें केली. १९०६ मध्यें कलकत्त्याला स्वराज्यापर्यंत कॉंग्रेसनें उडी मारली. पण अद्यापि कशालाच कांहीं ठिकाणा नव्हता. शेवटीं १९०९ मध्यें ब्रिटिश सरकारनें मोर्ले-मिंटो सुधारणा दिल्या व कायदेमंडळांत लोकनियुक्त सभासदांचा शिरकाव झाला. या सुधारणांबद्दल कॉंग्रेसनें भारतमंत्री लॉर्ड मोर्ले व व्हाइसरॉय लॉर्ड मिंटो यांचेबद्दल अंतःकरणपूर्वक कृतज्ञता व्यक्त करून सरकारच्या मुत्सद्देगिरीची मनमुराद तारीफ केली. सुधारणा पाहून देशामध्यें सार्वत्रिक समाधान ( deep and general satisfatcion ) वाटत आहे, असें कॉंग्रेसनें आपलें मत व्यक्त केलें. या सुधारणांनीं दिलेल्या अधिकारांना त्यांच्या

अंमलबजावणी करण्याच्या नियमानीं सरकारनें बराच कमीपणा आणला आहे, असे दुःखोद्गार काढण्याची पाळी कॉंग्रेसला लागलीच आली. मोर्ले–मिंटो सुधारणांनीं हुरळून गेलेल्या कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांचे डोळे लवकरच उघडले आणि आपल्या हातीं फक्त चोथा देण्यांत आलेला आहे, भरींव अधिकाराच्या रसाचा थेंब देखील त्यामध्यें नाहीं, असें त्यांना लवकरच आढळून आलें.

१९१६ सालीं लखनौच्या कॉंग्रेसमध्यें कॉंग्रेसच्या मागण्यांनीं आणखी एक टप्पा गांठला. त्या वर्षीं मुस्लीम लीगच्या सहकार्यानें कॉंग्रेसनें जबाबदारीच्या स्वराज्याची एक योजना सरकारपुढें ठेवली. त्यांत प्रारंभींच हिंदी लोकांना लवकर स्वराज्य देण्याचा ब्रि. सरकारचा हेतु आहे, असें बादशहांनीं जाहीर करावें, अशी विनंति करून नंतर तपशीलवार योजना मांडली होती. त्यामध्यें महत्वाचा भाग पुढीलप्रमाणें होता,—

( १ ) मोठ्या प्रांतांत निदान १२५ सभासदांचें व लहान प्रांतांत ५० ते ७५ सभासदांचें कायदेमंडळ असावें.

( २ ) यांपैकीं चार पंचमांश सभासद लोकनियुक्त व बाकीचे सरकार नियुक्त असावे.

( ३ ) मोर्ले–मिंटो सुधारणातील अप्रत्यक्ष मतदान-पद्धति रद्द करून त्याऐवजीं विस्तृत मताधिकारावर आधारलेली प्रत्यक्ष मतदान पद्धति सुरू करावी.

( ४ ) मुसलमानांना स्वतंत्र मतदारसंघ द्यावा. पण पूर्वीप्रमाणें पुनः संयुक्त मतदार–संघांत मतें देण्याचा त्यांना अधिकार नसावा.

( ५ ) कौन्सिलचें अध्यक्षस्थान गव्हर्नरला न देतां सभासदांनीं निवडलेल्या अध्यक्षांना द्यावें.

( ६ ) जकात, पोस्ट व तारखातें, मीठ, अफू, रेल्वे, लष्कर व आरमार आणि संस्थानिकांची खंडणी यांखेरीज जमेच्या सर्व बाजू प्रांतांच्या ताब्यांत असाव्या.

( ७ ) अंतस्थ कारभाराच्या बाबतींत प्रांतांना पूर्ण स्वातंत्र्य असावें.

( ८ ) कायदेमंडळानें पास केलेला ठराव कार्यकारी मंडळास बंधनकारक असावा.

( ९ ) गव्हर्नरला ' व्हेटो 'चा अधिकार असवा. पण तोच ठराव ः वर्षानंतर कायदेमंडळानें पास केला, तर त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे.

( १० ) कायदेमंडळाची मुदत पांच वर्षांची असावी.

( ११ ) कार्यकारी मंडळांतील निदान निम्मे सभासद कायदेमंडळानें निवडलेले असावे.

( १२ ) वरिष्ठ कायदेमंडळांत १५० सभासद असावे व त्यांपैकीं चार पंचमांश लोकनियुक्त असावे.

( १३ ) या कायदेमण्डळाचा अध्यक्षही लोकनियुक्त असावा.

( १५ ) वार्षिक अंदाजपत्रक पास करण्याचा अधिकार या मंडळाकडे असावा.

( १५ ) व्हाइसरॉयांच्या कार्यकारी मंडळांतील निम्मे सभासद कायदेमण्डळानें निवडावे.

( १६ ) मध्यवर्ति कायदेमंडळाचा ठराव कार्यकारी मंडळावर बंधनकारक असावा.

( १७ ) इंडिया कौन्सिल रद्द करावें. इ०—

१९१७ सालीं ऑगस्ट महिन्यांत हिंदुस्थानला जबाबदार राज्यपद्धति देणें हें ब्रि. सरकारचें ध्येय आहे, असें भारतमंत्री मॉंटेग्यू यांनीं पार्लमेंटांत जाहीर केलें. त्याबद्दल कॉंग्रेसला फार आनंद झाला. पण पूर्वीच्या अनुभवाप्रमाणें १९१९ सालीं मॉंटेग्यू—चेल्म्सफोर्ड सुधारणा साकार आणि सगुण स्वरूपांत प्रत्यक्ष दिसल्यावर या आनंदावर विरजण पडलें. अमृतसरच्या कॉंग्रेसनें या सुधारणा अपुऱ्या, असमाधानकारक आणि निराशाजनक आहेत असा आपला अभिप्राय व्यक्त केला. तथापि त्या सुधारणांचा नवीन कौन्सिलांत जाऊन कॉंग्रेसनें शक्य तेवढा फायदा घ्यावा व अधिक हक्कांकरतां झगडत रहावें, याविषयीं सर्वांचें मतैक्य दिसलें.

पण एका वर्षाच्या आतच सर्व मनु पालटला. जे गांधीजी या नवीन सुधारणांना अपुऱ्या, असमाधानकारक आणि निराशाजनक म्हणण्याला देखील तयार नव्हते, त्यांनीं अवघ्या आठच महिन्यांत कौन्सिलांवर बहिष्कार घालावा, असें सांगण्यास सुरवात केली. कौन्सिलें लढविण्याकरतां लोकमान्यांनीं कॉंग्रेस डेमोक्रॅटिक पक्ष काढला होता. पण इतक्यांत स्वतः लोकमान्यच स्वर्गवासी झाल्यामुळें कॉंग्रेसचीं सूत्रें असहकारी गांधीजींच्या हातांत गेलीं. देशांतील बहुतेक सर्व मोठमोठया पुढाऱ्यांच्या विरोधास न जुमानतां १९२० सालीं सप्टेंबर महिन्यांत कलकत्ता येथें कॉंग्रेसनें कौन्सिलांवर बहिष्कार घातला. असहकारितेचा ओघ ओसरूं लागल्यावर हा बहिष्कार अमान्य असलेल्या बाबू चित्तरंजन दास, पं० मोतिलाल नेहरू, सत्यमूर्ति, विठ्ठलभाई पटेल, केळकर, जयकर, अणे, डॉ. मुंजे प्रभृतींनीं १९२२ अखेर कॉंग्रेसमध्येंच निराळा स्वराज्यपक्ष काढला. या स्वराज्यपक्षाला देशांत मोठा पाठिंबा मिळत चाललेला पाहून १९२४ सालीं कॉंग्रेसनें त्याला आशीर्वाद दिला. पण निवडणुकी स्वतः लढवण्याचें कार्य, मनांतील असहकारी वृत्तीमुळें, कॉंग्रेसनें त्या वेळीं आपल्या अंगावर घेतलें नाहीं. स्वराज्यपक्ष कौन्सिलांत गेला खरा, पण असेंब्लीच्या अध्यक्षांची जागा सोडून बाकी अधिकाराच्या जागा घेण्याचें त्यानें नाकारलें. यामुळें स्वराज्यपक्षांतूनच प्रतिसहकार नांवाचा आणखी एक पोटपक्ष निघाला. मात्र या पक्षाची मर्यादा महाराष्ट्र, वऱ्हाड आणि मध्यप्रांत यांपलीकडे गेली नाहीं.

१९२९ सालीं कॉंग्रेसनें संपूर्ण स्वातंत्र्याचें ध्येय जाहीर करून तें मिळवण्याकरतां कायदेभंगाचें हत्यार उपसण्याचें ठरवलें. कौन्सिलप्रवेश आणि संपूर्ण स्वातंत्र्य किंवा कायदेभंग यामध्यें विरोध दिसल्यामुळें कॉंग्रेसनें कौन्सिलप्रवेशाला अर्धवट दिलेली मान्यताही काढून घेतली आणि पुनः सर्व कौन्सिलांवर कडकडीत बहिष्कार घातला.

हें बहिष्कारव्रत १९३४ सालापर्यंत चालू होतें. त्या वर्षी कायदेभंगाची चळवळ गांधीजींनीं मागें घेतली. कौन्सिलप्रवेशाची आवश्यकता भासणारा मोठा वर्ग कॉंग्रेसमध्यें उत्पन्न झाला. कायदेभंग बंद ठेवावयाचा तर कौन्सिलप्रवेशाशिवाय अन्य मार्ग नाहीं, असें कित्येक कॉंग्रेसभक्त बोलूं लागले. समान विचाराच्या या पुढाऱ्यांनीं ३१ मार्च १९३३ रोजीं डॉ० अन्सारी यांचे अध्यक्षते-

खालीं दिल्ली येथें जमून पूर्वीच्या स्वराज्यपक्षाचें पुनरुज्जीवन करण्याचें ठरविलें, एवढेंच नव्हे तर (१) दडपशाहीचे सर्व कायदे रद्द करून घेणें व (२) व्हाइट-पेपरमधील योजना रद्द करून म० गांधींनीं गोलमेज परिषदेमध्यें मांडलेल्या योजनेप्रमाणें राज्यघटनेची मागणी करणें, या दोन हेतूंनीं असेंब्लीच्या निवडणुकी लढविण्याचाही निश्चय केला. हे ठराव घेऊन डॉ० अन्सारी श्री. भुलाभाई देसाई व डॉ० बिधनचंद्र रॉय यांचें शिष्टमंडळ महात्माजींना भेटावयास गेलें. महात्माजींनीं ५ एप्रिल १९३३ रोजीं स्वराज्यपक्षाच्या पुनरुज्जीवनाला व असेंब्लीच्या निवडणुकी लढवण्याला मान्यता दिली. पण ती देताना कौन्सिलांच्या अनुपयुक्ततेबद्दल १९२० सालीं आपलीं जीं मतें होतीं, तीं अद्यापि कायम आहेत असें त्यांनीं सांगितलें. कांहीं ना कांहीं कारणाकरतां कायदेभंगाच्या चळवळींत ज्याला भाग घेतां येत नसेल, आणि देशहिताकरतां कौन्सिलांत जाणेंच अवश्य आहे असा ज्यांचा विश्वास असेल, त्यांनीं खुशाल कौन्सिलांत जावें असें ते म्हणाले. त्यानंतर मे महिन्याच्या २ व ३ तारखांना कौन्सिल-प्रवेशवादी पुढाऱ्यांची रांची येथें परिषद भरून डॉ० अन्सारी यांच्या आधिपत्याखालीं स्वराज्यपक्षाचें रीतसर पुनरुज्जीवन झालें. या पक्षानें कॉंग्रेसच्या नांवानें काम न करतां स्वतंत्रपणें करावें असें त्या वेळीं ठरलें. या पक्षाला ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची मान्यता पाहिजे, असें वाटल्यावरून त्याच महिन्याच्या १८ व १९ तारखांना पाटणा येथें ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीपुढें हा प्रश्न ठेवला. स्वराज्यपक्षानें असेंब्लीच्या निवडणुकी स्वतंत्रपणें न लढवतां कॉंग्रेसच्या नांवानें लढवाव्या व त्याकरतां ऑल इं. कांग्रेस कमिटीच्या नियंत्रणाखालीं काम करणारा कॉं. पार्लमेंटरी बोर्ड स्थापन करावा असें पाटण्याला ठरलें. या ठरावाला ऑक्टोबर महिन्यांत मुंबई येथें भरलेल्या कांग्रेसनें आपली संमति दिली. म्हणजे सप्टेंबर १९२० मध्यें कौन्सिलांवर घातलेला बहिष्कार १४ वर्षांनीं कॉंग्रेसनें पूर्णपणें उठवला! गेल्या वर्षी झालेल्या असेंब्लीच्या निवडणुकी कॉंग्रेसनें यशस्वी रीतीनें लढवल्या. आज असेंब्लीमध्यें कॉंग्रेसपक्ष हाच विरोधीपक्ष म्हणून समजण्यांत येतो.

गेल्या तीन वर्षांत महात्माजींनीं कौन्सिलप्रवेशाबद्दल वेळोवेळीं काढलेले उद्गार आज मनोरंजक वाटतील यांत शंका नाहीं—

( 1 ) My head reels at the very thought of entering the Councils. ( जुलै, १९३३. )

( 2 ) Parliamentary mentality has come to stay. ( मे १९३४. )

( 3 ) Council-entry is a religion at this stage ...those who take an oath, it is not good on their part to do anything which will embarrass the Government. ( ऑगस्ट, १९३५. )

कौन्सिलप्रवेश आपल्याला व्यक्तिशः मान्य नसल्याचें महात्माजी अद्यापिही सांगत आहेत. आणि कदाचित् पुनः त्यांच्या मनांत आलें तर आपलें हें मत पुनः कॉंग्रेसवर लादण्यासही ते कमी करणार नाहींत. कायदे-भंगाची चळवळ आणि कौन्सिलावरील बहिष्कार चालू असतांना मध्यंतरीं एकदां मंदिरप्रवेश बिलाकरतां गांधीजींना कौन्सिलांच्या मदतीची आवश्यकता भासली होती. तें बिल त्यांनीं स्वतः तयार करून दिलें आणि जे सभासद कॉंग्रेसची आज्ञा न जुमानतां कौन्सिलांत गेले, त्यांनीं या बिलाला पाठिंबा द्यावा म्हणून त्यांची मनधरणी करण्याकरतां आपले पट्टशिष्य श्री. राज-गोपाळाचार्य यांना गांधीजींनीं दिल्लीला पाठवून दिलें. इतकें करूनही गांधी-जींना कौन्सिलांची उपयुक्तता, मग ती अत्यंत मर्यादित कां असेना, पटत नाहीं, हें मोठें आश्चर्य आहे. पार्लमेंटरी बोर्डाला आशीर्वाद देतांना कौन्सिल प्रवेशासंबंधानें १४ वर्षें महाराष्ट्रीय पुढारी कॉंग्रेसच्या शिव्या खात खात जें सांगत होते तेंच—अगदीं अक्षरशः तेंच—महात्माजींनीही सांगितलें, हें तर त्याहून मोठें आश्चर्य होय !

महात्माजींचीं वैयक्तिक मतें आज कांहींही असलीं, तरी कॉंग्रेसनें कौन्सिलांचा उपयोग करण्याचें नक्की ठरवलें आहे. आतां वाद चालला आहे तो फक्त अधिकाराच्या जागा स्वीकाराव्या किंवा नाहीं याबद्दल ! कौन्सिल-प्रवेशाची उपयुक्तता कळावयास १४ वर्षें लागलीं. अधिकारग्रहणाची उपयु-क्तता पटण्यास किती वर्षें लागतात, तें आतां पहावें.

# काँग्रेसच्या इतिहासातील मौजा

---

काँग्रेसची पहिली बैठक मुंबई येथील गोकुळदास तेजपाळ संस्कृत पाठशाळेच्या हॉलमध्यें आणि दुसरी कलकत्ता येथील टाऊन हॉलमध्यें भरली होती. तिसऱ्या अधिवेशनापासून प्रतिनिधींची आणि प्रेक्षकांची गर्दी फार होऊं लागल्यामुळें 'पेंडाल' किंवा मंडप घालावा लागूं लागला. पेंडाल हा शब्द तामिळ असून मद्रासच्या या काँग्रेसपासूनच सर्व प्रांतांत तो रूढ झाला!

\+ + + +

१९३१ सालीं कराचीच्या काँग्रेसपासून उघडे मंडप करण्याची पद्धति सुरू झाली. फक्त चारी बाजूंनीं बंद करून वर आकाशाचें छत्र ठेवण्यांत येऊं लागलें. यामुळें खर्च वांचला आणि उकाडाही होईनासा झाला. सूर्यास्ताचे समयीं अधिवेशनाला सुरवात करून रात्रीं बारा दोन वाजेपर्यंत तें चालू राहातें. उन्हाचा त्रास होण्याचा संभव मुळींच नाहीं.

\+ + + +

१९२९ सालापर्यंत काँग्रेसची अधिवेशनें नाताळांत भरत असत. पण कांहीं प्रांतांत या वेळीं थंडीचा कडाका फार असतो. पुष्कळ प्रतिनिधींना

आणि प्रेक्षकांना तो बाधतो. अंथरूणापांघरूणाचें ओझें बरोबर वागवावें लागतें. स्वागत कमिटीला अधिक व्यवस्था करावी लागते. हा त्रास आणि खर्च वांचविण्याकरितां गांधीजींच्या सूचनेवरून १९२९ नंतर फेब्रुवारी किंवा मार्च महिन्यांत काँग्रेसची वार्षिक अधिवेशनें भरण्याचें ठरलें. या वेळीं कडक उन्हाळा नसतो किंवा कडक थंडी नसते. पण नाताळांत रेल्वेचे सवलतीचे दर असतात तसे या वेळी नसतात. त्यामुळें प्रवासाचा खर्च थोडा वाढतोच. शिवाय पुष्कळांना सुटी नसते. यामुळें काँग्रेसच्या निमित्तानें दुसरा प्रवास करावयास सांपडत नाहीं. बाकी 'स्वराज्याच्या शिपायांना' या अडचणींचा विचार करण्याचें कारण नाहीं.

\+ + + +

१९२० सालीं नागपूरच्या काँग्रेसपर्यंत प्रतिनिधींना आणि प्रेक्षकांना मंडपांत बसण्याला खुर्च्या किंवा बाकें असत. पुढें गांधीजींच्या राज्यांत त्यांच्या ऐवजीं बैठकी आल्या. पादत्राणाची गैरसोय होऊं नये म्हणून त्यांच्याकरितां खादीच्या पिशव्या निघाल्या. या सर्व शोधांचें श्रेय गांधीजींना आहे.

\+ + + +

पहिल्या काँग्रेसला जमलेल्या एकंदर ७२ प्रतिनिधींची वर्गवारी पुढीलप्रमाणें होती–कलकत्ता ३, मुंबई १८, मद्रास ८, कराची २, विरमगांव १, सुरत ६, पुणें ८, आग्रा २, काशी १, सिमला १, लखनौ ३, बऱ्हामपूर (मद्रास) १, मच्छलीपट्टण १, चिंगलपुट १, तंजावर २, कुंभकोणम् १, मदुरा १, तिनिवेल्ली १, कोइमतूर १, सालेम १, कडाप्पा १, अनंतपूर १, बल्लारी १, अलाहाबाद १, लाहोर १, अंबाला १, आणि अहमदाबाद ३.

\+ + + +

ही बैठक मुंबईलाच भरल्यामुळें पहिला नंबर मुंबई इलाख्याला मिळाला तर त्यांत आश्चर्य नाहीं. आश्चर्य मद्रास इलाख्याचें. त्या प्रांतांतील १३ शहरांतून प्रतिनिधी आले होते. बंगाल प्रांतांत सर्वांत जास्ती जागृति असल्यामुळें तिकडून अधिक प्रतिनिधी यावयास पाहिजे होते. पण त्याच वेळीं

तिकडे दुसरी राष्ट्रीय परिषद असल्यामुळें बंगाली पुढाऱ्यांना ती संपवून इकडे येतां आलें नाहीं.

+ + + +

पहिलें अधिवेशन सोडलें तर प्रतिनिधींची अगदीं कमी संख्या (२०७) १९१२ सालीं बांकीपूरला होती. जास्तीत जास्ती संख्या १९२० सालीं नागपूरला १४५८२ होती. १८८९ सालीं प्रतिनिधींची संख्या त्या वर्षाच्या आंकड्याइतकी म्हणजे १८८९ च होती ! अवघ्या पांच वर्षांत इतकी वाढ झाल्यामुळें सर्वांची व्यवस्था करणें सोपे जावें म्हणून या वर्षी प्रतिनिधींची संख्या एक हजारापेक्षां अधिक असूं नये असा नियम करण्यांत आला. नेमस्तांच्या अमदानींतील पुढील २६ वर्षांत हा नियम मोडण्याचे प्रसंग ६ वेळां आले. १९१६ सालापासून टिळकांचा अमल सुरू झाल्यावर ही संख्या २ हजारांपासून ७ हजारांपर्यंत राहिली. नागपूरला शीग गांठली. पुढें ही संख्या १६०० ते ६ हजारांपर्यंत राहिली. गांधीजी तुरुंगांत असल्यामुळें फक्त १९२२ सालीं गया येथें ही संख्या ५२६ पर्यंत रोडावली होती.

+ + + +

कॉंग्रेसचे तीनदां अध्यक्ष होण्याचा मान दोघांना मिळाला. एक महर्षि दादाभाई नवरोजी व दुसरे पंडित मदन मोहन मालवीय. दादाभाईंना दुसऱ्यानदा मान मिळाला ते पार्लमेंटचे सभासद निवडून आले म्हणून. आणि तिसऱ्यान्दा मिळाला टिळकांची ब्याद टाळण्याकरितां ! १९०६ सालीं कलकत्ता येथें टिळकांना अध्यक्ष करावें असा बंगाली तरुणांचा विचार होता. पण दादाभाई ही व्यक्ति त्या वेळीं इतकी पूज्य समजली जात होती कीं त्यांचें नांव सुचविलें गेलें म्हणजे दुसऱ्या कोणाचें नांव सुचविलें जाणार नाहीं या हेतूनें नेमस्तांनीं दादाभाईंना पुढें केलें !

+ + + +

पण टिळकांनीं जें काम केलें असतें तें अनपेक्षितपणें दादाभाईंनीं केल्यामुळें नेमस्तांचा डाव हुकला ! स्वराज्य, राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी आणि बहिष्कार, या चतुःसूत्रीची घोषणा दादाभाईंनीं याच वेळीं केली !

+ + + +



**सौ. सरोजनी नायडू**

कानपूर–१९२५



**महात्मा गांधी**

बेळगांव–१९२४



पं. मदनमोहन मालवीय

दिल्ली ( खास )–१९१८ लाहोर–१९०९



डॉ. अन्सारी

मद्रास–१९२७

पं. मालवीय तीन्ही वेळां अडचणीमध्यें अध्यक्ष झाले ! १९०९ सालीं लाहोरला सर फिरोझशहा मेहता यांची निवड झाली होती. पण ते आजारी पडल्यामुळें आयत्या वेळीं फक्त ६ दिवस आधीं मालवीयांना अध्यक्ष निवडण्यांत आलें. १९१८ सालीं दिल्ली येथे लोकमान्य टिळकांची निवड झाली होती. पण त्या वेळीं ते विलायतेंत असल्यामुळें पंडितजींना अध्यक्षपदाकरितां बोलावण्यांत आलें. तिसरी वेळ म्हणजे १९३३ सालीं कायदेभंगाचें युद्ध चालू असतांना. सर्व कॉंग्रेस कमिट्या बेकायदेशीर ठरलेल्या होत्या आणि कलकत्ता येथील कॉंग्रेसचें अधिवेशनही बेकायदेशीर ठरविलें जाण्याचा संभव होता. बाकी सर्व पुढारी तुरुंगांत होते. पंडितजींना या अधिवेशनाचे अध्यक्ष निवडण्यांत आलें खरें, पण कलकत्त्याला पोहोंचण्यापूर्वींच त्यांना अटक करण्यांत आली !

\+ + + +

कॉंग्रेसचे जनक मि. ह्यूम तिच्या जन्मानंतर २७ वर्षें हयात असूनहि त्यांना अध्यक्षपदाचा मान मिळाला नाहीं. त्याचप्रमाणें कॉंग्रेसला नावारूपाला आणणारे लो. टिळक हे अध्यक्षपद लाभल्यावांचूनच वारले ! याला योगायोगावांचून दुसरें कारण नाहीं.

\+ + + +

पहिल्या कॉंग्रेसमध्यें हजर राहून भाषण करणारांपैकीं आज ५० वर्षांनीं फक्त ( सर ) दिनशा एदलजी वाच्छा हयात आहेत. १८९६ पासून १८ वर्षें ते कॉंग्रेसचे एक सेक्रेटरी होते व १९०१ सालीं १७ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. आर्थिक विषयावर माहितीपूर्ण भाषणें करण्यांत त्यांचा हातखंडा असे.

\+ + + +

पंडित मदन मोहन मालवीय १८८६ सालीं दुसऱ्या कॉंग्रेसला हजर राहिले व तींत त्यांनीं पहिलें भाषण केलें. त्याची जमलेल्या लोकांवर एवढी छाप बसली कीं 'हा पुढें मोठा पुढारी झाल्यावांचून राहणार नाहीं,' असे सर्वांनीं उद्गार काढले.

\+ + + +

काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा मान दोन स्त्रियांना मिळाला आहे. एक डॉ. बेझंट (इ. स. १९१७) व दुसऱ्या सौ. सरोजनी नायडू (इ.स.१९२५). १९१९ सालीं अमृतसर येथें भरलेल्या काँग्रेसचे स्वागताध्यक्ष एक संन्यासी होते. त्यांचें नांव स्वामी श्रद्धानंद.

+ + + +

काँग्रेसची पहिली तीस वर्षे एकनिष्ठपणें सेवा करणारांमध्यें बंगालचे 'अनभिषिक्त राजे' बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी हे एक प्रमुख होते. बडे सरकारी नोकर असूनही नोकरींतून त्यांना निघावें लागल्यामुळें त्यांच्या सेवेचा लाभ काँग्रेसला मिळाला. नाहींतर न्यायमूर्ती रानड्यांप्रमाणें त्यांना तोंड बांधून रहावें लागलें असतें. प्रथम काँग्रेसची सेवा करून नंतर सरकारच्या नोकरींत शिरलेल्या पुष्कळ पुढाऱ्यांचीं नांवें काँग्रेसच्या इतिहासांत राहिलीं. पण काँग्रेस जन्माला आली त्याच वेळीं सरकारी नोकरींत असल्यामुळें इतर पुढाऱ्यांपेक्षां मोठे असूनही रानड्यांचें नांव मात्र कोठें नाहीं !

+ + + +

काँग्रेसच्या पहिल्या पुढाऱ्यांपैकीं पुढें कोणी सरकारी नोकरींत शिरले, तर कोणी सर, रावबहादुर, सी. आय. इ. इत्यादि सरकारी कृपेंतील पदव्यांनीं विभूषित झाले. याला दादाभाई, मालवीय, टिळक, असे फारच थोडे अपवाद आहेत. टिळक-गांधी काँग्रेसचीं सूत्रें हालवूं लागल्यापासून सर्वच अपवाद होऊं लागले. नोकरी किंवा पदवी याऐवजीं काँग्रेसच्या पुढाऱ्यांना तुरुंगांत ' सरकारचा पाहुणचार ' मिळूं लागला ! काँग्रेसचीं दोन स्थित्यंतरें समजण्यास एवढी गोष्ट पुरेशी आहे !

+ + + +

पूर्वीचे पुढारी सरकारला ' नम्रतापूर्वक विनंति ' करीत असत. नंतरचे पुढारी सरकारचा ' तीव्र निषेध ' करूं लागले किंवा ' धमकी ' देऊं लागले ! पूर्वीचे पुढारी ' सरकारनें काय करावें ' हेंच मुख्यतः सांगत असत. पण सरकारनें तिकडे दुर्लक्ष केल्यामुळें ' लोकांनीं काय करावें ' हें नंतरचे पुढारी मुख्यतः सांगूं लागले !

+ + + +

काँग्रेसची अर्धशतकाची दीर्घ हयात पहाण्याचें भाग्य ज्यांना लाभलें असेल त्यांना 'तें चित्र आणि हें चित्र' यांमध्यें केवढी तरी तफावत दिसत असेल. काँग्रेसला येणाऱ्या लोकांची संख्या पूर्वी शेंकड्यांनीं मोजावी लागत असे. आतां ती हजारांनीं, लाखांनीं, मोजावी लागते. स्त्रिया हातांच्या बोटांवर मोजतां येत असत. आतां काँग्रेसमधला चौथा हिस्सा भाग तरी त्याच भरून काढतात.

\+ + + +

पोषाकांतील तफावत पाहून तर फारच मौज वाटेल. प्रथम पुढारी आपल्या प्रांतिक किंवा जातीय पोषाकांत येत. पुढें इंग्रजी पोषाकांत—बूट, पॅंट, नेकटाय—मध्यें ते तळपूं लागले. असहकारितेच्या युगांत पूर्वीच्या सर्व रंगांचें पांढऱ्या रंगांत एकीकरण झालें. गांधींनीं सर्वांना एकजात पांढरी टोपी आणि कुडता दिला! असहकारितेच्या उत्तरार्धांत या टोपी-कुडत्यालाही 'चाट' मिळून कटिवस्त्राचें आणि उपवस्त्राचें राज्य सुरू होऊं पहात आहे. हें राज्य लंगोटीपर्यंत पसरण्याची पुष्कळांना भीति वाटत असली तरी ती अनाठायीं आहे.

\+ + + +

पूर्वीच्या पुढाऱ्यांच्या तोंडांत चिरूट किंवा सिगारेट दिसत असे. आतां हातांत 'टकळी' दिसते. तोंडावरून हातापर्यंत आल्याची याहून निराळी साक्ष दुसरी कोणती पाहिजे? ग्रामोद्योग संघाचा उत्कर्ष झाल्यास भर व्यासपीठावर दळण, कांडण आणि 'घाणा' सुरू होईल ही भीति मात्र अनाठायीं आहे. भोजनांत असडिक तांदूळ व सोयाबीनची उसळ येण्याचा मात्र बराच संभव दिसत आहे!

\+ + + +

इ. स. १९०७ सालीं डॉ. राशबिहारी घोष यांचे अध्यक्षतेखालीं भरलेली काँग्रेस त्यांचें भाषण होण्यापूर्वीच मोडली. पण त्यांचें भाषण दुसरे दिवशीं कलकत्ता येथील कांहीं पत्रांनीं प्रसिद्ध करून टाकलें. वाचकांच्या हातांत सर्वांच्या आधीं जाऊन पडण्याची चपळाई अंगावर आली!

\+ + +

याच सुरतेच्या काँग्रेसमध्यें पुणेरी जोडा प्रसिद्धीला आला! प्रतिनिधींच्या दंगलींतून उडालेला हा तांबडा जोडा फिरोझशहा मेथा आणि सुरेंद्रनाथ

बानर्जी यांना ' चाटून ' अध्यक्षापुढील टेबलावर जाऊन पडला. हा जोडा सुरतेचा ' प्रसाद ' म्हणून सुरेंद्र बाबूंनीं पुष्कळ दिवस आपल्याजवळ जपून ठेवला होता असें म्हणतात ! या जोड्याचा जोडीदार सांपडला असता तर फिरोजशहा त्यालाहि आपल्याजवळ ठेवणार होते !

\+ \+ \+

या संस्मरणीय कॉंग्रेसमध्यें टिळकांचें वर्णन करतांना इंग्रजी वृत्तपत्राचा बातमीदार नेव्हिनसन म्हणतो, " आभाळांत काळे ढग येऊन वीज कडाडावी आणि वादळ व्हावें, त्याप्रमाणें टिळक थेट समोरून येऊन अध्यक्षांच्या खुर्चीपुढें उभे राहिले. ते तक्रार करीत होते, निषेध करीत होते, हरकत सांगत होते. पण हें सर्व काम त्यांच्या शांत व निश्चयी स्वभावाप्रमाणें चालू होतें. त्यांचा तो आवाज ऐकून वाटे कीं हा मनुष्य भवितव्यतेलाही तुच्छ मानीत आहे...त्यांचे ते छातीवर दुमडलेले हात आणि बिनदिक्कत मुद्रा पाहून वाटे कीं हा मनुष्य अत्याचाराला व रक्तपाताला आव्हान करून म्हणतो आहे कीं, " ये, तुला माझें डोकें उडवायचें असेल तर खुशाल उडव. कोणी वाटेल तें केलें,स्वर्ग उभा केला किंवा नरक आणून ठेवला, तरी मी येथून हलणार नाहीं !"

\+ \+ \+ \+

१९२३ सालीं छोट्या भाईंच्या अध्यक्षतेखालीं भरलेली कोकोनाडाची कॉंग्रेस अनेक दृष्टींनीं गाजली ! सात कोटी अस्पृश्यांना हिंदु–मुसलमानांत निम्मेनिम वाटून घेऊन अस्पृश्योद्धाराचा प्रश्न सोडविण्याची अभिनव कल्पना मौ. महंमदअलींनीं याच वेळीं मांडली !

\+ \+ \+ \+

मौलानासाहेबांनीं या वेळीं आपलें १५४ पानाचें अध्यक्षीय भाषण साडे पांच तास वाचून लांबीचें रेकॉर्ड मोडलेंच, पण शिवाय श्रोत्यांच्या पाठीचा कणाही मोडला ! तुरुंगांतील दंडाबेडी, खोडाबेडी, यापेक्षां पुरवली, असे पुष्कळांनीं उद्गार काढले !

\+ \+ \+ \+

पण पुढील वर्षी ( १९२४ ) बेळगांवला महात्माजींनीं आंखुडपणाचें रेकॉर्ड मोडलें ! थोडक्यांत मुद्देशीर बोलण्याची प्रथा त्यांनीं सुरू केली. नियोजित अध्यक्षानें एकदम खुर्चीवर येऊन बसावे असें ठरलें. त्यांच्या नांवाची सूचना करण्याचा लांबलचक आणि कंटाळवाणा फार्स बेळगांवपासूनच बंद झाला !

( १२ )

# कॉँग्रेस व परराष्ट्रीय चळवळ

ह्यूम साहेबांनी कॉंग्रेस जन्माला घातली त्याच वेळीं तिच्या चळवळीचे पडसाद इंग्लण्डमध्यें उठत राहतील अशी तजवीज करून ठेविली होती. कॉंग्रेसची स्थापना करण्यापूर्वी तिच्यासंबधीं कच्ची योजना पार्लमेंटच्या सुमारे दीडशें सभासदांपुढें मांडून त्यांची त्यांनीं सहानुभूति मिळविली आणि हिंदुस्थानांतील चळवळीला प्रसिद्धी देण्याचें वचन तेथील कांहीं वृत्तपत्रकारांकडून मिळविलें. कलकत्त्याचे बाबू मनमोहन घोस, मुंबईचे नारायण गणेश चंदावरकर व मद्रासचे शिवालय रामस्वामी मुदलियार हे १८८५ सालीं कॉंग्रेसची स्थापना होण्यापूर्वी इंग्लण्डांत गेले होते. दादाभाई नवरोजी जरी व्यापारी मिषानें इंग्लण्डांत जाऊन राहिले होते तरी हिंदुस्थानकरितां जेवढें राजकीय काम करतां येईल तेवढें ते करीत असत. जॉन ब्राइट, हेन्री फॉसेट, चार्लस् ब्रॅडलॉ इत्यादि हिंदहितैषींचा त्यांनी चांगला गट निर्माण केला होता. ब्रॅडलॉ हे पार्लमेंटमध्यें हिंदुस्थानची वकिली इतक्या उत्तम रीतीनें करीत कीं " हिंदुस्थानचे प्रतिनिधी ( मेंबर फॉर इंडिया ) असें लोक त्यांना म्हणूं लागले. १८८९ सालीं इंग्लण्डांत कॉंग्रेसची एक **ब्रिटिश कमिटी** स्थापन करण्यांत आली व तिच्या खर्चाकरितां ४५ हजार रुपये मंजूर करण्यांत आले.

## पहिलें शिष्टमंडळ

याच सालीं काँग्रेसनें राजकीय चळवळ करण्याकरितां पहिलें शिष्टमण्डळ इंग्लंडांत पाठविलें. त्यामध्यें जॉर्ज यूल, ह्यूम, ॲडॅम, नॉर्टन हे इंग्रज व फिरोजशहा मेहता, सुरेंद्रनाथ बानर्जी, मनमोहन घोस, शर्फुद्दिन, मुधोळकर आणि उमेशचंद्र बानर्जी हे हिंदी पुढारी होते. सुरेंद्रनाथांच्या अमोघ वक्तृत्वाचा ब्रिटिश जनतेवर फारच उत्कृष्ट परिणाम झाला. पुढें थोड्या दिवसांनीं ब्रॅडलॉ यांनीं पार्लमेंटांत जें ' इंडिया बिल ' आणलें तें या शिष्टमण्डळाच्या परिश्रमाचेंच फळ होय.

## दुसरें शिष्टमंडळ

पुढील वर्षी म्हणजे १८९० सालीं दुसरें शिष्टमंडळ पुनः गेलें. त्यांत पहिल्यांतीलच बहुतेक पुढारी होते. कालीचरण बानर्जी व दाजी आबाजी खरे हे दोनच फक्त नवीन पुढारी होते. हिंदुस्थानची बाजू ब्रिटिश जनतेपुढें मांडण्याकरितां ' इंडिया ' नांवाचें पत्र १८९० मध्यें सुरू करण्यांत आलें. विल्यम डिग्बी हे त्याचे पहिले संपादक होत.

पुढें असा अनुभव आला कीं बाहेर चळवळ करण्यापेक्षां पार्लमेंटांत चळवळ करणेंच अधिक फलदायी होईल. या हेतूनें ब्रिटिश कमिटीच्या जोडीला पार्लमेंटांतील सभासदांची **"इंडियन पार्लमेंटरी कमिटी"** स्थापन करण्यांत आली. असें करण्यांत वेडर्नबर्न साहेबांनीं विशेष परिश्रम घेतले. त्यावेळीं लिबरल पक्ष अधिकारारूढ असल्यामुळें पार्लमेंटरी कमिटींत दीडशेंच्यावर सभासद नोंदून घेण्यास विशेष त्रास पडला नाहीं. या कमिटीच्या खटपटीमुळेंच पुढें वेल्बी कमिशन नेमण्यांत आलें. या कमिशनपुढें साक्ष देण्याकरितां दिनशा वाच्छा, गोपाळराव गोखले आणि सुरेन्द्रनाथ बानर्जी या तिघांची कॉंग्रेसतर्फे योजना झाली होती. या तिघांनीं आपलें काम इतकें चोख बजावलें कीं त्यामुळें त्यांचा स्वतःचा लौकिक वाढलाच पण कॉंग्रेसचेंहि वजन वाढलें. हिंदुस्थानात कर्झनशाही सुरू झाल्यावर ब्रिटिश जनतेपुढें हिंदी जनतेचें मनोगत स्पष्ट शब्दांत सांगणें जरूर होतें. त्याकरितां १९०४ सालीं कॉंग्रेसनें गोखले व लाला लजपतराय यांची नेमणूक केली. दोघांनींही अत्यंत निर्भिडपणें हिंदु-

स्थानची वकिली केली. गोखले यांच्या या सेवेबद्दल पुढील वर्षी काँग्रेसचे त्यांना अध्यक्ष करून हिंदी राष्ट्रानें त्यांचेबद्दल आपली कृतज्ञता व्यक्त केली. पुढील वर्षी गोखले पुनः विलायतेंत गेले. १८९६ पासून १९०६ पर्यंत गोखले विलायतेंत हिंदुस्थानचे बिनसरकारी वकील म्हणून काम करीत होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांची ही भूमिका लक्षांत घेऊनच भारत-मंत्री लॉर्ड मोर्ले यांनीं हिंदुस्थानास द्यावयाच्या राजकीय सुधारणांचा कच्चा मसुदा आगाऊ त्यांना दाखविला होता. १९१३ सालीं कराची येथें भर-लेल्या काँग्रेसनें आणखी एक शिष्टमंडळ विलायतेस पाठविलें. त्यामध्यें भूपेंद्रनाथ बसू, शर्मा, जिना, समर्थ, मझरुल हक आणि लाला लजपतराय ही मंडळी होती. याच वेळीं विलायतेंत आयरिश होमरूलच्या चळवळीनें आपलेकडे सर्वांचें लक्ष वेधून घेतलें असल्यामुळें या शिष्टमंडळाच्या हातून फारशी कामगिरी झाली नाहीं.

हिंदी लोकांनींच ब्रिटिश पार्लमेंटमध्यें शिरून हिंदी प्रश्नांना विशेष चालना द्यावी अशी कल्पना मध्यंतरीं निघाली होती. त्याप्रमाणें लालमोहन घोस व दादाभाई नवरोजी यांनीं पार्लमेंटांत शिरण्याचा प्रयत्न केला. पण त्यापैकीं फक्त दादाभाईनाच एक वेळ १८९२ सालीं यश आलें. हिंदुस्थानांतील प्रत्येक प्रांतांतून दोन प्रतिनिधी ब्रिटिश पार्लमेंटांत घेण्यांत यावेत, असा ठराव १९०४ सालीं मुंबई येथें भरलेल्या काँग्रेसनें पास केला होता. पण त्यानंतर पुनः तसला ठराव पास केल्याचें दिसत नाहीं. हिंदुस्थानांतील फ्रेंच मुलुखांतून फ्रान्सच्या लोकसभेमध्यें व गोव्यातून पोर्तुगालच्या लोकसत्तेमध्यें प्रतिनिधी पाठविले जातात हें प्रसिद्धच आहे. १८९२ मध्यें लंडनमध्येंच काँग्रेसचे एक अधिवेशन भरविण्याची अभिनव कल्पना पुढें आली होती. पण ती कधींच मूर्तस्वरूपाला पोंचली नाहीं. विलायतेंत जावयाचें तर समुद्रगमन करावें लागेल, तसें करण्यास किती पुढारी तयार होतील अशी शंका ठरावावरील चर्चेच्या वेळीं उपस्थित करण्यांत आली होती. पण 'राजकीय उन्नतीकरिता आम्ही आमच्या धार्मिक समजुती आड येऊं देणार नाहीं' असें जमलेल्या पुढाऱ्यांपैकीं बहुतेकांनीं आश्वासन देऊन त्या शंकेचें निवारण केलें.

विलायतेंतील चळवळ चालू ठेवण्याकरितां काँग्रेसनें दरवर्षी हजारों रु. खर्च केले. ब्रिटिश काँग्रेस कमिटीचें कार्य व इंडिया पत्र यांवरच हा खर्च मुख्यतः होत असे. १८९१ व १८९२ सालीं ४०००० रु. पाठविले. १८९३ पासून १८९८ पर्यंत सहा वर्षे दरसाल ६०००० रु. पाठविण्यांत येत होते. १८९९ सालीं ५४०००, १९०० व १९०१ सालीं प्रत्येकीं ३०००० रु. खर्च झाले. तरी इंडिया पत्र आंतबट्ट्याचेंच होऊं लागलें म्हणून १९०१ सालापासून काँग्रेसनें त्या पत्राच्या ४००० प्रति हिंदुस्थानांत खपविण्याची हमी घेतली. पत्राकरितां प्रत्येक प्रतिनिधीकडून १० रु. जास्ती घेण्यांत येऊं लागले. १९०४ सालीं इंग्लंडांत होणाऱ्या पार्लमेंटच्या जनरल निवडणुकीमध्यें ब्रिटिश मतदारापुढें हिंदुस्थानचा प्रश्न मांडण्याची काँग्रेसनें व्यवस्था करावी व त्याकरितां ३०००० रु. पर्यंत रक्कम खर्च करावी असें सर विल्यम वेडरबर्न यांनीं मांडलेल्या व लो. टिळकांनीं पुष्टी दिलेल्या ठरावावरून ठरलें. १९०६ सालीं इंडियन पार्लमेंटरी कमिटींत सर हेन्री कॉटन, डॉ. रुथरफोर्ड, रॅम्से मॅक्डोनल्ड प्रभृति २०० सभासद होते. असें होते तरी हिंदुस्तानांतून पुढें पुढें इंग्लंडांत पैसा कमी जाऊं लागला व त्या मानानें तिकडील कार्यही शिथिल पडूं लागलें. ब्रिटिश कमिटी आणि इंडिया पत्र कशीबशी चालू होतीं येवढेंच.

१९१६ मध्यें काँग्रेस टिळकांच्या म्हणजे राष्ट्रीय पक्षाच्या ताब्यांत गेल्यावरही ब्रिटिश काँग्रेस कमिटीचें आणि इंडिया पत्राचें धोरण पूर्वीचें म्हणजे नेमस्तच राहिलें. १९१८ सालीं बॅ. बॅप्टिस्टा व लो. टिळक विलायतेस गेले असतां ही गोष्ट त्यांच्या नजरेस आली. तेव्हां त्यांनी कमिटीची सूत्रें आपल्या हातांत घेऊन इंडिया पत्राच्या संपादकाला राजीनामा द्यावयास लावलें. नंतर त्याचें संपादकत्व केळकरांचेकडे जाऊन धोरण काँग्रेसच्या ठरावानुसार राहूं लागलें. १९१९ सालीं लो. टिळक व डॉ. बेझंट यांचीं स्वराज्य-संघ आणि काँग्रेस या संस्थांच्या वतीनें विलायतेंत शिष्टमंडळें गेलीं होती. त्यांची पार्लमेंटरी सिलेक्ट कमिटीपुढें साक्ष झाली. याशिवाय टिळकांनी अनेक ठिकाणीं व्याख्यानें देऊन व मजूर पक्षाशीं सहकार्य करून हिंदुस्तानचा प्रश्न पुढें रेटला.

 नि. ५८८१

ता. ६ नोव्हेंबर १९१९ रोजीं टिळकांना पाठविलेल्या पत्रांत कर्नेल वेजवूड म्हणतात, " विलायतेंत शिष्टमंडळ आल्यामुळें उभयपक्षीं निकट परिचय होण्याला फार मदत झाली. इकडे आतां वर्णद्वेष हटत चालला आहे. " मजुरांचे दुसरे पुढारी मि. बेनरपूर त्याच सुमारास टिळकांना लिहितात, " हिंदुस्तानचे इतके राजकीय पुढारी येथें आल्यामुळें त्यांना भेटून त्यांच्या तोंडून हिंदुस्थानांतील लोकमतासंबंधानें अस्सल माहिती मिळविता आली याबद्दल मला फारच आनंद होतो. "

विलायतेहून निघण्यापूर्वी टिळकांनीं विलायतेंतील कामाची पुढीलप्रमाणें व्यवस्था करून ठेविली होती—' इंडिया ' पत्राचा संपादक हिंदी असावा. त्याची नेमणूक कॉंग्रेसनें करावी व त्याला सालीना ३५० पौं. पगार मिळावा. पत्राचें धोरण कॉंग्रेसच्या ठरावाप्रमाणें चालावें. कमिटीच्या खर्चाकरितां कॉंग्रेसनें दरसाल २५०० पौं. विलायतेस पाठवावे. याशिवाय टिळकांनीं स्वयंनिर्णयावर एक पत्रक लिहून त्याच्या हजारो प्रति आपल्या खर्चानें वाटल्या. पण पुढच्याच वर्षी कॉंग्रेस गांधीजींच्या ताब्यांत जाऊन तिनें विलायतेस पैसा पाठविण्याचें अजिबात बंद केलें आणि यामुळें ब्रिटिश कॉंग्रेस कमिटी मोडली व ' इंडिया ' पत्र बंद पडलें !

टिळकांच्या स्वराज्य संघातर्फे लाला लजपतराय यांनीं डॉ. हर्डीकर यांच्या सहकार्यानें अमेरिकेंत पुष्कळच चळवळ केली. केवळ हिंदुस्थानला वाहिलेलें एक मासिक पत्रक सुरू करून स्वराज्य संघाच्या शाखा ठिकठिकाणीं स्थापन केल्या. मॉंटेग्यू—चेम्सफर्ड सुधारणांच्या निमित्तानें विलायतेंत गेलेल्या कॉंग्रेसच्या शिष्टमंडळानें आपल्या रिपोर्टांत पुढीलप्रमाणें सूचना केली होती—" यापुढील निदान पांच वर्षे साम्राज्याच्या घटनेच्या इतिहासांत फार महत्वाचीं ठरतील. राष्ट्रसंघ स्थापन झाला असून त्याच्यापुढें हिंदुस्थानला स्वयंनिर्णयाचा आपला हक्क प्रस्थापित करून घ्यावा लागेल. खुद्द इंग्लंडांतही बऱ्याच घडामोडी होऊं पाहात आहेत. यामुळें विलायतेंतील लोक साम्राज्यांतील जित राष्ट्रांच्या तक्रारीकडे अधिक लक्ष देतील. म्हणून स्वराज्याची चळवळ विलायतेपर्यंत नेऊन भिडविण्याला हीच उत्कृष्ट संधी आहे. अशी संधी पुन्हा येणार नाहीं.

याकरितां हिंदुस्थानाबाहेर इंग्लंड, अमेरिका, युरोप या ठिकाणीं सतत चळवळ चालू ठेवावी. " पण असहकारितेच्या प्रचंड झंझावातामध्यें या शिफारशी कोठल्या कोठें पार उडून गेल्या !

गेल्या पंधरा वर्षांत कॉंग्रेसतर्फे विलायतेंत किंवा अन्यत्र कांहीं चळवळ झाली नाहीं. विठ्ठलभाई पटेल, सुभाषचंद्र बोस, किंवा सरोजिनी नायडू यांनीं व्यक्तिशः काय थोडी केली असेल तेवढीच. गोलमेज परिषदेकरितां बरेचसे पुढारी विलायतेंत गेले होते, त्या वेळीं ब्रिटिश जनतेपुढें हिंदी लोकांची बाजू मांडण्याची संधी मिळाली. पण मध्यंतरी दहा वर्षें कार्यांत खंड पडल्यामुळें बरेच नुकसान झालें. महत्वाची वेळ निघून गेली. या काळांत सरकारच्या दडपशाहीचा कडेलोट झाला. या वेळीं हिंदुस्थानांतील परिस्थितीचें यथार्थ चित्र परदेशांत रेखाटलें गेलें असते तर हिंदुस्तानांतील चळवळीला अधिक पाठिंबा मिळाला असता. निदान हिंदी लोकांचे विषयीं खोडसाळपणाच्या गैरसमजुती पसरवून देण्यास तरी वाव मिळाला नसता. मिस मेयोसारख्यांच्या पुस्तकांतून आणि अनेक चित्रपटांतून हिंदी लोकांची नित्य बदनामी करण्यांत येत असते. तिला आळा घालण्याकरितां हिंदी लोकांनीं परराष्ट्रीय चळवळीकडेहि लक्ष देणें जरूर आहे. लो. टिळक, लाला लजपतराय, विठ्ठलभाई पटेल यांनीं परराष्ट्रीय चळवळीचें महत्व ओळखलें होते. विठ्ठलभाईंनीं आपल्या मृत्युपत्रांत एक लाख रुपये या कार्याकरितां निराळे राखून ठेवले आहेत. कॉंग्रेसनें प्रमुख देशांतून आपल्या वकिलाती स्थापन कराव्या असें सुभाषबाबू पुनः पुनः लिहीत आहेत. स्वराज्याचा झगडा मुख्यतः देशांतल्या देशांतच चालावयाचा असला तरी शेजाऱ्यापाजाऱ्यांचा सहानुभूतीचा पुष्कळ उपयोग झाल्यावांचून राहात नाहीं. निदान आयर्लंडच्या इतिहासावरून तरी ही गोष्ट सिद्ध आहे. परदेशांतून सहानुभूति मिळविण्यानें स्वावलंबनाच्या तत्वाला बाध येत नाहीं.

( १३ )

# कॉंग्रेस व राष्ट्रभाषा

कॉंग्रेसनें केलेल्या अनेक चांगल्या गोष्टींमध्यें तिनें राष्ट्रभाषेला दिलेले उत्तेजन या गोष्टीचाही अंतर्भाव करावा लागेल. १८८५ सालीं कॉंग्रेसची पहिली निमंत्रण पत्रिका निघाली, तीमध्यें 'इंग्रजी भाषेचा चांगला परिचय असलेले' प्रतिनिधि जमणार आहेत, असें म्हटलें होतें. हिंदुस्थाना-सारख्या विस्तीर्ण देशांत जवळ जवळ प्रत्येक प्रांताची भाषा निराळी, तेव्हां सर्वांनीं विचारविनिमय करण्याकरितां एकत्र जमावयाचें म्हणजे इंग्रजी या परकी भाषेखेरीज दुसरें साधन नव्हतें. दुसरें असेंहि म्हणावयास हरकत नाहीं कीं त्या वेळच्या उच्च सुशिक्षितांना आपले विचार मातृभाषेपेक्षां इंग्रजी भाषेंतूनच चांगले प्रदर्शित करतां येत असत! त्यामुळें गांधीजींचें वजन कॉंग्रेसमध्यें प्रस्थापित होईपर्यंत ३५।४० वर्षें कॉंग्रेसचें सर्व कामकाज इंग्रजी-तूनच चालत असे. ज्या प्रांतांत कॉंग्रेसचें अधिवेशन भरे, त्या प्रांतांतील लोक त्या अधिवेशनाला स्वाभाविकपणेंच बहुसंख्येनें हजर असल्यामुळें, त्या प्रांतांतील एकादा वक्ता आपल्या प्रांतीय भाषेंत बोले तेवढेंच. उदाहरणार्थ, १८९५ सालीं पुणें येथें कॉंग्रेसेंच अधिवेशन भरलें त्यामध्यें लो० टिळकांनीं एका ठरावावर मराठींतून भाषण केलें. बाकीच्या प्रांतांत त्यांचीं भाषणें इंग्रजींतून होत असत. मातृ-भाषेंतून केलेल्या या भाषणांचा रिपोर्ट कॉंग्रेसच्या अधिकृत अहवालांत बहुधा सांपडत नाहीं. पुढाऱ्यांनीं इंग्रजींतूनच भाषणें करण्याचें आणखीहि एक कारण

असे. तें हें कीं आपलीं दुःखें सरकारच्या कानांवर घालणें, हाच कॉंग्रेस भरविण्याचा प्रथम प्रधान हेतु होता. सरकारला समजणारी भाषा म्हणजे फक्त इंग्रजीच. म्हणून सर्व ठराव त्या भाषेंत आणि त्यावरील भाषणेंही पण त्याच भाषेंत.

पण वर्षानुवर्षें किती ओरडून सांगितलें तरी सरकार लक्ष देत नाहीं, असें कळून चुकल्यावर पुढाऱ्यांचें लक्ष जनतेकडे वळलें. जनतेंत जागृति उत्पन्न करून तिला पुरेसें संघटित केलें, तर सरकारवर वजन पडून प्रजेच्या गाऱ्हाण्यांकडे त्याला लक्ष देणें भागच पडेल, ही विचारसरणी अर्थात् बरोबरच होती. पण जनतेशीं बोलणें म्हणजे सोपी गोष्ट नव्हती. इंग्रजी समजणारे फारच थोडे आणि एका प्रांताची भाषा दुसऱ्या प्रांतांत कळत नाहीं. तेव्हां एकराष्ट्रीयत्वाची कल्पना पूर्णपणें सिद्धीस न्यावयाची तर सर्व देशाला एक राष्ट्रभाषाही असली पाहिजे. या राष्ट्रभाषेचा मान हिंदीखेरीज दुसऱ्या कोणाला मिळणें शक्य नाहीं, हें ताबडतोब लक्षांत आलें. कारण हिंदुस्थानांत हिंदी भाषा बोलणारे—निदान समजणारे—लोकच सर्वांत अधिक आहेत. पंजाब, सरहद्द प्रांत, संयुक्त प्रांत, मध्य हिंदुस्थान, बिहार, या भागांत हिंदीचा प्रसार पुष्कळ झालेला आहे. हिंदी भाषेमध्यें प्रांतानिहाय पोटभेद असले, तरी तिचें स्थूल स्वरूप सर्वत्र सारखेंच आहे. ज्या प्रांतांत मुसलमानांचें प्राबल्य विशेष व म्हणून जेथें ऊर्दू भाषा प्रचारांत आहे, तेथेंही परस्परांच्या नित्य सहवासानें हिंदी भाषा समजण्यास कठीण जात नाहीं. कर्नाटकापासून खालीं दक्षिणेचा भाग सोडला, तर वरील बहुतेक भाषा हिंदीप्रमाणें संस्कृतोत्पन्न आहेत व म्हणून हिंदींतून मथितार्थ कळण्यास कोठें फारशी अडचण भासत नाहीं.

हिंदी भाषेचें हें महत्त्व प्रथम आर्यसमाजाचे संस्थापक स्वामी दयानंदजी यांनीं ओळखलें. त्यांची स्वतःची मातृभाषा गुजराथी होती आणि त्यांचें सर्व शिक्षण झालें संस्कृत भाषेंतून. पण ज्या विशिष्ट तत्त्वांचा त्यांना देशभर प्रसार करावयाचा होता, तीं तत्त्वें हिंदी भाषेंतून सांगितल्यावांचून जास्तींत जास्ती लोकांना समजणें शक्य नव्हतें. म्हणून त्यांनीं स्वतः हिंदी भाषेचा अभ्यास केलाच पण प्रत्येक आर्यसमाजी माणसालाही तो अवश्य ठेवला. आर्यसमाजाच्या द्वारा हिंदुस्था-

नांत हिंदी भाषेचा प्रसार होण्यास पुष्कळ मदत झालेली आहे. एकलिपी आणि एकभाषा यांचें महत्व टिळकांच्या लक्षांत आलें होतें, पण स्वतः हिंदीचा लक्षपूर्वक अभ्यास करण्याचें काम त्यांचे हातून शेवटपर्यंत झालें नाहीं. यामुळें महाराष्ट्राची मर्यादा ओलांडली कीं टिळकांना परकी भाषेचाच आश्रय करावा लागे. यामुळें त्यांचें विचार सर्व प्रांतांतील सामान्य जनसमूहाला कळण्यास कठीण जाई. टिळकांच्या चळवळींत या दृष्टीनें हें मोठें वैगुण्य राहिलें.

महात्मा गांधींचे पूर्वायुष्य दक्षिण आफ्रिकेंत गेलें. तेथें निरनिराळ्या भाषा बोलणाऱ्या हिंदी लोकांत त्यांना राहावें व काम करावें लागे. त्यामुळें त्यांना सर्वांस सामान्य अशा हिंदी भाषेचा परिचय करून घेणें भागच पडलें. पण त्यांनीं दूरदर्शीपणानें त्या भाषेचें महत्व ओळखलें नसतें तर हिंदी भाषेचा एवढा निष्ठापूर्वक अभ्यास त्यांनीं केला नसता आणि त्या भाषेवर त्यांनीं प्रभुत्वाहि मिळविलें नसतें. एकराष्ट्रीयत्वाची कल्पना वाढीस लागण्यास एकभाषा अवश्य आहे, हें त्यांनीं बरोबर ओळखलें आणि आपल्या कार्यक्रमांत हिंदी भाषा-प्रचाराला महत्वाचें स्थान दिलें.

महात्माजींच्या प्रवेशाबरोबर हिंदी भाषेचाही काँग्रेसमध्यें प्रवेश झाला. त्यांच्या स्वदेशी चळवळींत राष्ट्रभाषेचा अंतर्भाव झाला आणि त्यांच्या बहिष्काराच्या कक्षेंत इंग्रजी भाषाही येऊन बसली. कोठेंही गेलें तरी शक्य तों हिंदींतून बोलावयाचें असें त्यांनीं स्वतःच्या मनाशीं ठरविलें. श्रोत्यांनी फारच तक्रार केली तर प्रथम हिंदी भाषेंतून सविस्तर बोलून नंतर इंग्रजींतून त्याचा तो सारांश सांगूं लागले. पण भाषेच्या प्रचाराची कांहींच व्यवस्था न करतां आपलें भाषण अनभिज्ञ श्रोत्यांवर लादणें गैर आहे हेंही त्यांनीं ओळखलें. कारण हिंदुस्थानांत निदान कांहीं प्रांत तरी असे आहेत कीं तेथें इंग्रजींतून बोललें काय किंवा हिंदींतून बोललें काय सारखेंच. म्हणजे सामान्य लोकांना त्यांतील अक्षरही समजणार नाहीं. कर्नाटक, म्हैसूर, मद्रास, आंध्र, हे प्रांत अशांपैकीं आहेत. गांधीजींनी या भागांत राष्ट्रभाषेच्या प्रचाराची संघटित व्यवस्था करून आपला मुलगा देविदास याला तिकडे पाठवलें. महात्माजींच्या प्रयत्नानें दाक्षिणेकडे राष्ट्रभाषेचा प्रसार झपाट्यानें चालला आहे. आतांपर्यंत ६ लाख लोकांनीं त्या भाषेचा परिचय करून घेतला आहे.

काँग्रेसचे सूत्रधार महात्मा गांधी हेच राष्ट्रभाषेतून बोलू लागल्यामुळ इतर पुढारीही त्यांचें अनुकरण करूं लागले. हळुहळू याचा परिणाम असा झाला कीं इंग्रजी भाषेतून बोलणें कमीपणाचें समजण्यांत येऊं लागलें. याच्या उलट हिंदी भाषा न समजणें लाजिरवाणें वाटूं लागलें. इंग्रजी भाषेंत बोलायाचें असलें तरी "मला राष्ट्रभाषेंतून चांगलें बोलतां येत नाहीं याबद्दल शरम वाटते" अशी प्रारंभीं खेदपूर्वक प्रस्तावना करावी लागते !

आज राजकारणांत हिंदी भाषेचा दर्जा एवढा वाढला आहे कीं तिला काँग्रेसच्या घटनेंतच स्थान मिळालें आहे. तिच्या सध्यांच्या घटनेचें १७ वें कलम पुढीलप्रमाणें आहे—

"काँग्रेस, ऑल इंडिया काँग्रेस कमिटी आणि वर्किंग कमिटी यांची कामें सामान्यतः हिंदी भाषेंतून चालविण्यांत येतील. अध्यक्षांची परवानगी असेल तेव्हां किंवा वक्ता हिंदी भाषेंतून बोलण्यास असमर्थ असेल तर इंग्रजीचा किंवा प्रांतिक भाषेचा त्यानें उपयोग करावा.

प्रांतिक काँग्रेस कमिटयांचें कामकाज त्या त्या प्रांतांच्या भाषेंत चालेल. तथापि हिंदीचा उपयोग केला तरी चालेल."

तिसऱ्या कलमाचा 'इ' पोटभाग पुढीलप्रमाणें आहे—

"अर्जदाराचें नांव 'सभासद' म्हणून नोंदल्यावर त्याबद्दल त्याला त्याच्या प्रांतिक भाषेंत आणि लिपींत किंवा देवनागरी अथवा उर्दु लिपींत लिहिलेल्या हिंदुस्थानी भाषेंत पावती मिळेल"

पुष्कळ काँग्रेस कमिटयांनीं विधायक कार्यक्रम म्हणून हिंदी भाषेचे वर्ग चालविले आहेत. एकभाषेच्या कल्पनेला जोराची चालना दिल्याबद्दल देश काँग्रेसचा ऋणी राहील.

( १४ )

# कॉंग्रेसचें यश

———:०:———

Sons of Ind, why sit ye idle,
Wait ye for some Deva's aid ?
Buckle to, be up and doing !
Nations by themselves are made !

—कॉंग्रेसचे जनक ह्यूम

ता. २८ डिसेंबर १८८५ हा दिवस हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवावा लागेल. कारण या दिवशीं अर्वाचीन इतिहासाला प्रारंभ झालेला आहे. स्वराज्य नाहींसें झालें आणि हातांपायांत पारतंत्र्याच्या बेड्या पडल्या म्हणून सर्व हिंदुस्थान किती तरी वर्षे इळहळत होतें. जे निराशावादी होते ते कपाळावर हात मारून स्वस्थ बसले. परंतु जे आशावादी होते त्यांनीं १८५७सालीं गेलेलें स्वराज्य परत मिळविण्याचा शेवटचा आणि निकराचा प्रयत्न केला. हिंदु आणि मुसलमान हे दोघेही खांद्याशीं खांदा भिडवून या संग्रामांत लढले, पण त्यांत शेवटीं यश आलें नाहीं. दंडेली करून यश मिळणें सध्यां अशक्य आहे, परकीय सरकार आपल्यापेक्षां किती तरी पटीनीं बलिष्ठ आहे, आपल्या हातांत आज हत्यारेंही राहिलेलीं नाहींत. अशा स्थितींत गोडीगुलाबीनें सरकाराशीं वागलें तर या पारतंत्र्यांत देखील आपल्याला सुख लागण्याचा बराच संभव आहे, असे विचार सुशिक्षित

जनतेच्या डोक्यांत हळुहळू येऊं लागलें आणि त्या दिशेनें हालचालीला प्रारंभही झाला. काँग्रेसचा जन्म हें या संघटित हालचालींचें पहिलें फळ होय. ब्रि. सरकार हें आपल्या कल्याणाकरतांच हिंदुस्थानांत अवतीर्ण झालेलें आहे, अशी समजूत त्या वेळीं हिंदुस्थानांत खरोखरच बऱ्याच ठिकाणीं प्रसृत झाली होती. सरकार केवळ परोपकारी बुद्धीनें हिंदुस्थानावर राज्य करीत असल्यानें आपलीं गाऱ्हाणीं योग्य शब्दांत आणि नम्रतेनें त्याच्यापुढें मांडलीं, तर तीं लवकर दूर झाल्यावांचून रहाणार नाहींत, असा बहुतेकांचा दृढ विश्वास होता; आणि म्हणूनच गेलेलें स्वराज्य परत मिळविण्याकरतां सनदशीर मार्गाचा अवलंब करण्याचें ठरलें. काँग्रेस हें त्या सनदशीर मार्गाचें एक प्रतीक होय.

काँग्रेसला जन्म देऊन तिचें संवर्धन करण्यांत जनतेचे आणि सरकारचे दोघांचेहि श्रम सारखेच खर्ची पडलेले आहेत ! काँग्रेसला जन्म देऊन तिला राजकीय स्वरूप देण्यामध्यें स्वतः व्हाइसरॉयांनींच पुढाकार घेतलेला होता. तिचें संवर्धन करण्यामध्यें लॉर्ड कर्झन, लॉर्ड चेल्म्सफोर्ड, लॉर्ड रीडिंग आणि लॉर्ड विलिंग्डन यांनीं आपलें शक्तिसर्वस्व खर्च केले आणि तिचा बोलबाला हिंदुस्थाबाहेरही होऊं दिला. काँग्रेसकडे पहाण्याची जनतेची दृष्टि निराळी आणि सरकारची दृष्टि निराळी. सात समुद्र ओलांडून इंग्लंडपेक्षां सहापट मोठ्या देशावर आपण राज्य करण्यास येतों, आपली प्रजा धर्मानें, भाषेनें, परंपरेनें आणि संस्कृतीनें सर्वस्वी आपल्याहून निराळी, अशा स्थितींत तिचें मनोगत आपणास योग्य रीतीनें कळणार नाहींत तर आपणाला तिला संतुष्ट ठेवून राज्यकारभार करतां येणार नाहीं, हें लॉर्ड डफरीनसारख्या व्हाइसरॉयांना कळून चुकलें होतें. राणीचा जाहिरनामा प्रसिद्ध होऊन अवघीं २५ वर्षेंच झालीं असल्यामुळें अधिकाऱ्यांना त्याचा विसर पडला नव्हता. प्रजेचा संतोष हेंच आमचें बल, हें त्या जाहिरनाम्यांतील महत्वाचें वाक्य, प्रजेच्या आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या कानांमध्यें सारखेंच घुमत राहिलें होतें. अर्थात् आपलें बल, म्हणजेच प्रजेचा संतोष, राखण्याकरतां प्रजेचें हृद्गत जाणण्याची लॉर्ड डफरीनसारख्या अधिकाऱ्यांना खरोखरच उत्कंठा लागून राहिली होती. काँग्रेससारखी एक अखिल भारतीय संस्था सुरू करण्याला उत्तेजन देऊन ती उत्कंठा तृप्त करून घेण्यांत आली. ज्या सद्बुद्धीनें लॉर्ड



हकीम अजमलखान
अहमदाबाद–१९२१




सर दिनशा एदलजी वाच्छा
कलकत्ता–१९०१




श्री. आनंदचारलु
नागपूर–१८९१




रहिमतुल्ला एम्. सयानी
कलकत्ता–१८९६



सर नारायण चंदावरकर
लाहोर-१९००



नवाब सय्यद महमद
कराची १९१३



सर हेन्री कॉटन
मुंबई-१९०४



श्री. योमेशचंद्र बानर्जी
मुंबई-१८८५ अलाहाबाद-१८९२

डफरीन आरंभीं कॉंग्रेसकडे पहात होते, त्याच सद्बुद्धीनें पुढचे व्हाइसरॉय आणि विलायतेंतील सरकार कॉंग्रेसकडे पहात राहिलें असतें, तर हिंदुस्थानचा इतिहास आज दिसतो त्यापेक्षां फारच निराळा दिसला असता. पण तसें झालें नाहीं. प्रजेनें आपलीं दुःखें वेशीवर टांगणें आणि तीं दूर करण्याविषयीं सरकारास काकुळतीनें विनवणें म्हणजे सरकारविरुद्ध चळवळ करणें होय, असा विपरीत अर्थ होऊं लागला ! आमचें सर्व स्वराज्य गेलें त्याच्या मोब-दला हिंदी पुढाऱ्यांनीं सरकारजवळ प्रथम प्रथम केलेल्या मागण्या पाहून हंसू येतें. आमची मोठ्यांत मोठी मागणी काय, तर वरिष्ठ नोकऱ्यांकरतां ज्या परीक्षा घेण्यांत येतात, त्या हिंदुस्थानांत आणि इंग्लंडमध्यें एकाच वेळीं घेण्यांत याव्या ! कायदेमंडळांत सगळेच सरकारनियुक्त सभासद असतात, त्यांमध्यें कांहीं लोकनियुक्तही असावे ! लष्करांत हिंदी लोकांना घ्यावें, किंवा कायम जमीनधाऱ्याची पद्धति सर्वत्र सुरू करावी ! एकादें शहाणें सरकार असतें तर या अल्प मागण्या चटूदिशीं मान्य करून प्रजेला संतुष्ट ठेवतें व दहाबारा वर्षें तरी सुखासमाधानानें कारभार करतें. पण संशय-पिशाचिकेनें पछाडल्यामुळें ही सद्बुद्धि सरकारला कधींच सुचली नाहीं. उलट जनतेच्या अंतःकरणाला चटके बसून ती संतप्त होईल अशींच कृत्यें सरकार-कडून होऊं लागलीं. राणीच्या जाहिरनाम्याप्रमाणें वागणें तर दूरच राहो, पण ती सनद अशक्य आहे असें लॉर्ड कर्झनसारखे लोक बेधडकपणें सांगत सुटले. स्वराज्याची चळवळ म्हणजे आकाशांतील चांदोबाकरतां हट्ट होय, असेंही म्हणण्यास दुसऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांनीं कमी केलें नाहीं. यामुळें सरकार आणि जनता यांचा विरोध वाढत चालला आणि त्या घर्षणामध्यें कधीं कधीं वीजही उत्पन्न होऊं लागली.

कॉंग्रेसच्या पहिल्या पुढाऱ्यांचीं भाषणें किती मृदु, किती सावधगिरीनें, आणि किती अदबीनें करण्यांत येत असत. सरकारचा निषेध करणें किंवा एकाद्या कृत्याबद्दल त्यावर असद्हेतूचा आरोप करणें म्हणजे मोठें पाप करणें होय, असें त्यांना अंतःकरणापासून वाटे. एकादी साधी तक्रार मांडावयाची झाली म्हणजे ती एवढ्या वांकड्या तिकड्या भाषेनें ते मांडीत कीं त्यामुळें सरकार-च्या मनाला हलका देखील धक्का बसूं नये ! नमुन्याकरतां एक लहानसें उदाहरण देतों—१८९२ सालीं सरकारनें कौन्सिल्स ॲक्ट पास केला. त्या

कायद्यांत वस्तुतः भरीव असें कांहींच नव्हतें; आणि जें काय थोडें होतें, तेंही अन्य नियम करून मोठ्या मुत्सद्देगिरीनें काढून घेण्यांत आलें होतें. या विषयावरील ठरावावर १८९३ मध्यें काँग्रेसमध्यें बोलतांना श्री. गोपाळराव गोखले म्हणाले,–' सद्गृहस्थ हो, या ॲक्टचा फायदा आमच्या पदरांत पडूं नये म्हणून हे नियम बुद्धिपुरःसर करण्यांत आले आहेत, असें मी म्हणणार नाहीं. पण मी असें मात्र म्हणेन कीं ज्या अधिकाऱ्याकडे हे नियम तयार करण्याचें काम देण्यांत आलें होतें त्यालाच जर असें सांगितलें असतें कीं, आपलें बुद्धिसर्वस्व खर्च करून तुम्ही नियमांचें असें जाळें तयार करा कीं त्यामुळें या ॲक्टचा हेतु सिद्धीस जाणार नाहीं तर त्या अधिकाऱ्यानें यापेक्षां अधिक चांगले नियम खास केले नसते. ' किती आढेवेढे आणि केवढा द्राविडी प्राणायाम ! आम्हाला भरीव अधिकार देण्याचें सरकारच्या मनांत नाहीं, असें सरळ सांगितलें असतें तर भागण्यासारखें होतें. पण सरकारवर असद्हेतूचा आरोप कसा करावयाचा ?

ह्याच गोपाळराव गोखल्यांनीं १९०५ सालीं अध्यक्षपदावरून काँग्रेसमध्यें केलेलें भाषण पहा. नमुन्याकरतां त्यांतील एकच उतारा येथें देतों.—

" चळवळ हा इंग्लंडच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक इतिहासाचा आत्मा आहे. इंग्लिश लोकांनीं आज जें यश मिळविलें आहे, आज ज्या स्वातंत्र्याचा आणि संपत्तीचा ते उपभोग घेत आहेत, किंबहुना जगांतील राष्ट्रांमध्यें आज जें त्यांना अग्रस्थान प्राप्त झालें आहे, त्याचें कारण 'चळवळ' या चार साध्या अक्षरांत आहे. सकाळीं उठून इंग्लंडमधील कोणतेंही पत्र हातांत घ्या. अथपासून इतिपर्यंत त्यांत चळवळीशिवाय दुसरें नांव नाहीं. सभा, परिषदा, ठराव, यांचा जिकडे तिकडे धूमधडाका चाललेला आढळतो. अगदीं मुख्य प्रधानापासून तों तहत लहानांत लहान कार्यकर्त्यांपर्यंत पहा. जें पाहिजे त्याच्याकरतां चळवळ करणें, हा एकच त्यांचा धंदा आहे. पार्लमेंट, वृत्तपत्रें, व्यासपीठें, हीं चळवळीचीं मूर्तिमंत चित्रें आहेत. चळवळ हें सुधारलेल्या लोकांचें नैतिक हत्यार आहे. पाशवी शक्तीपेक्षां हें हत्यारच त्यांना पसंत पडतें. चळवळ करा. चळवळ करणें म्हणजे आपलें ह्रद्गत दुसऱ्याला सांगणें. हिंदी लोकांना त्यांचे हक्क सांगा. ते कां व कसे मिळवले पाहिजेत, याची माहिती द्या. याच्या उलट हिंदी लोकांचे हक्क काय आहेत आणि ते त्यांना कां दिले पाहिजेत, हें ब्रिटिश जनतेला सांगा.

"आम्ही न बोलतां गप्प बसलों, तर ब्रिटिश जनतेला वाटतें आम्ही संतुष्ट आहों. याच्या उलट हिंदी लोक बोलूं लागले, तर चळवळे म्हणून त्यांना दोष देण्यांत येतो. सनदशीर रीतीनें वागा, असें हिंदी लोकांना सांगण्यांत येतें, पण सरकार मात्र बेसनदशीर रीतीनें आणि अरेरावी वृत्तीनें वागतें."

अवघ्या १२ वर्षामध्यें गोखले यांच्या वृत्तींत आणि भाषेंत केवढा फरक पडला पहा !

हा फरक अर्थातच सरकारनें पाडला. काँग्रेसनें केलेल्या मागण्यांपैकीं फारच थोड्या मागण्या सरकारनें दिल्या; आणि ज्या दिल्या त्या अशा वेळीं दिल्या कीं त्यांमध्यें कांहींच स्वारस्य उरलें नव्हतें. हिंदुस्थानांत आणि इंग्लंडांत सिव्हिल सर्व्हिस परीक्षा एकदम घेण्याची साधी मागणी. पार्लमेंटानें ती पासही केली. पण हिंदी लोकांच्या पदरांत अद्यापिही ती पडली नाहीं. साध्या मागणीची ही दशा. मग बाकीच्यांचें विचारावयासच नको ! लोकनियुक्त कौन्सिलांची मागणी जवळजवळ पाव शतकानें पदरांत पडली आणि तीही अर्ध्यामुर्ध्या स्वरूपांतच ! काँग्रेसच्या पन्नास वर्षांच्या हयातींत १८९२, १९०९, १९१९, आणि १९३५ अशा चार वेळां सरकारनें राजकीय सुधारणांचे हप्ते हिंदी लोकांना दिले. हे देऊनही वसाहतीचा दर्जा किंवा जबाबदारीचें स्वराज्य अद्यापि किती तरी दूर आहे. अर्धशतकाच्या सनदशीर चळवळीचें फळ हेंच काय, असें पाहून निराशेनें मन खिन्न होणें स्वाभाविक आहे. मिळालें हें यश जरी काँग्रेसच्याच चळवळीचें फळ असलें तरी तें इतकें अल्प आहे कीं त्यावरून सनदशीर चळवळीवरचा विश्वास तावडतोब उडून जावा.

पण वस्तुतः काँग्रेसच्या चळवळीचें यश 'इंडिया ॲक्ट'नें मोजणें अयोग्य आहे. खरें यश त्यापेक्षां किती तरी मोठें आहे. तें कोणत्याही जड वजनानें किंवा मापानें मोजतां येणार नाहीं. एका खंडाएवढ्या अवाढव्य देशांतील तीस कोटी जनतेला जागृत करून बोलायला लावणें म्हणजे सामान्य गोष्ट नाहीं. आपला उद्धार हा दुसऱ्या कोणाच्या कृपेपेक्षां आपल्या त्यागानें, हालअपेष्टांनीं आणि चिकाटीनेंच होणार आहे, हा मोठा धडा तीस कोटी प्रजेला काँग्रेसनेंच शिकविला. त्याचें मोल कसें मोजणार ? काँग्रेसनें 'मुकीं

विचारीं कुणी हका ' अशा मेंढरांना सिंह बनविलें, भिरुंना धीट केले, मुक्यांना बोलके केले, स्वार्थी लोकांना त्यागी बनविलें, घरकोंबड्यांची दृष्टि हिमालयाच्या अत्युच्च धवलगिरीपर्यंत नेऊन पोहोंचविली. हें मोल कसें मोजणार ? पन्नास वर्षें काँग्रेस नसती तर जगाच्या पाठीवर हिंदुस्थान नांवाचें राष्ट्र आहे, तेथील लोकांना संस्कृति आहे, तेथील लोकांना उज्ज्वल परंपरा आहे, तेथील लोकांना समाजव्यवस्था आहे, राजकीय महत्त्वाकांक्षा आहे, ही गोष्ट बाहेर कोणालाही कळली नसती. जगांतील कोणत्याही देशाप्रमाणें आपल्या देशाकरितां सर्वस्वाचा त्याग करणारे शेंकडों लोक या देशांत आहेत, सर्व जगाला संदेश देण्याएवढे महात्मे प्रसवण्याचें सामर्थ्य या देशामध्यें आहे, ही गोष्ट काँग्रेसवांचून जाहीर झाली नसती. आंत आणि बाहेर हिंदी लोकांचा जो कांहीं थोडा मान आहे तो काँग्रेसमुळेंच.

हा मान आणून देण्याला महर्षि दादाभाई नौरोजी, बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी, गोपाळ कृष्ण गोखले, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, लाला लजपतराय, चित्तरंजन दास, मोतीलाल नेहरू, जवाहीरलाल नेहरू, राजेंद्रप्रसाद, असल्या अनेक विभूतींचे परिश्रम आणि त्याग कारणीभूत झालेले आहेत. यांपैकीं एकएक व्यक्ति एवढी मोठी आहे कीं ती हिंदुस्थानसारख्या परतंत्र देशांत जन्माला न येतां स्वतंत्र देशांत जन्माला येती, तर तिच्या लोकोत्तर गुणांचें केवढें चीज झालें असतें ! त्यांच्या कर्तबगारीचा डिंडिम सर्व जगभर वाजला असता. आज पन्नास वर्षांनीं आमच्या हातांत कांहींच पडलें नाहीं म्हणून या सर्व व्यक्ती नालायक समजण्याचें कारण नाहीं. परिस्थितीचा किल्लाच एवढा अजिंक्य आहे कीं पहिल्या खिंडींतच या सर्व वीरांना गतप्राण व्हावें लागलें. आपल्या ऱ्याणव वर्षांच्या दीर्घ हयातींत सनदशीर मार्गानें कांहीं करण्याचें दादाभाईंनीं बाकी ठेवलें नाहीं. पण मरतांना निराशेच्या भयाण अंधारापलीकडे त्यांना कांहीं दिसलें नसेल ! तीच गोष्ट दुसऱ्या दिवंगत पुढाऱ्यांची. निराशेचे धक्के क्षणोक्षणीं बसत असतांना हिंदी लोक अद्यापि नवीन उत्साहानें लढत आहेत, प्रत्येक नवी लढाई पूर्वीच्या लढाईपेक्षां अधिक आवेशानें, अधिक धैर्यानें आणि अधिक त्यागानें लढली जात आहे, यांवरूनच त्यांचा जिवंतपणा सिद्ध होतो. ' Nations by themselves are made ' हा काँग्रेसच्या जनकानें प्रारंभींच दिलेला मंत्र

हिंदी लोक यापूर्वी कधीं विसरले नाहींत, आणि पुढेंही विसरणार नाहींत. सरकारच्या दडपशाहीनें त्यांची प्रतिकारशक्ति प्रत्येक वेळीं वाढत गेली आहे. दडपशाहीचें खत कॉंग्रेसचा वृक्ष फोंफावण्यास, त्याच्या शाखा–उपशाखा खेडोंपाडीं जाऊन पोहोंचण्यास, फार उपयोगीं पडलेलें आहे. लॉर्ड कर्झन झाले नसते तर स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण आणि बहिष्कार ही चतुःसूत्री जन्माला आली नसती. लॉर्ड चेम्सफर्ड झाले नसते तर असहकारिता जन्माला आली नसती. आणि लॉर्ड आयर्विन किंवा लॉर्ड विलिंग्डन आले नसते तर कायदेभंगही जन्माला आला नसता. कांहीं योगायोग विचित्र असतात ते असे. कॉंग्रेसला नांवारूपाला आणण्यांत दादाभाई प्रभृतींचे परिश्रम जितके कारणीभूत झाले, तेवढेच लॉर्ड कर्झनसारखे व्हाइसरॉयही कारणीभूत झाले आहेत असें ह्मणतात ते याचकरितां ! भक्तीनें आणि विरोधानें एकच कार्य घडवून आणलें. असो.

कॉंग्रेसचा पन्नास वर्षांचा इतिहास ह्मणजे अर्वाचीन हिंदुस्थानच्या सनदशीर चळवळीचा इतिहास होय. पुढील पन्नास वर्षांचा इतिहास कसा होईल तें एका सर्वसाक्षी काळालाच माहीत. त्या इतिहासाला आजच्यापेक्षां अनिष्ट वळण मिळूं नये, हें जसें पुढाऱ्यांच्या हातांत आहे, तसें किंबहुना अधिक, सरकारच्या हातांत आहे. निराशेचे धक्के सोसण्याला देखील मर्यादा असते. ही मर्यादा कमी जास्त करणें सर्वस्वी राज्यकर्त्यांच्या हातांत आहे. याच्या उलट जनतेनें मात्र आपल्या कॉंग्रेसनिष्ठेंत खंड पडूं देऊं नये. कॉंग्रेसनें पन्नास वर्षे जनतेची सेवा केलेली आहे. तिच्या हातून वेळोवेळीं चुकाही झाल्या असतील. त्या चुका दुरुस्त करावयाला लावणें, हें जनतेचेंच कर्तव्य आहे. कॉंग्रेस तारील किंवा मारील ही निष्ठा मात्र कायम पाहिजे.

# काँग्रेस व संस्थानें

( लेः–दत्तात्रय पुरुषोत्तम भागवत )

हिंदुस्थानचे ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानी हिंदुस्थान असे भेद आज आहेत. ते हिंदुस्थानच्या नकाशांत तांबड्या व पिवळ्या रंगानीं उत्कृष्ट रीतीनें दर्शविले जातात. संस्थानी हिंदुस्थान हा क्षेत्रफळाच्या दृष्टीनें ब्रिटिश हिंदुस्थानच्या निम्म्याहून अधिक व लोकसंख्येच्या बाबतींत एक चतुर्थांशाएवढा असल्यामुळें अखिल भारतीय राजकारणांत संस्थानांचें केवढें महत्त्व आहे याची जाणीव सहज होईल. शिवाय भावी फेडरल राज्यघटनेमध्यें वरिष्ठ कायदेमंडळांतून संस्थानिक व त्यांचे प्रतिनिधि यांना स्थान दिलें असून त्यांचा उपयोग हिंदवी स्वराज्याच्या मार्गांत अडथळे आणण्यासाठीं होण्याचा संभव दिसत आहे. तेव्हां यापुढें हिंदी संस्थानिक व राष्ट्रीय पक्ष यांचे झगडे वारंवार होणार, हें निश्चित आहे.

न्यायमूर्ति रानड्यांपासून म. गांधी–केळकरांपर्यंतच्या सर्व कॉंग्रेस पुढाऱ्यांना संस्थानिकांविषयीं वाटत असलेली ममत्व बुद्धि प्रसिद्धच आहे. याचा अर्थ असा नव्हे कीं संस्थानी प्रजेवर संस्थानांतून होणारा जुलूम त्यांच्या डोळ्यांना दिसत नाहीं किंवा संस्थानी प्रजेची मुस्कटदाबी संस्थानिकांनीं केली तरीही त्यांच्या मूक आक्रोशाची संवेदना या

पुढाऱ्यांना होत नाहीं. त्यांना संस्थानी प्रजेचीं दुःखें कळतात, संस्थानी प्रजेला लोकसत्तेचे व मानव्याचे हक्क मिळावे, असेंहि वाटतें. पण हें सर्व तडजोडीनें व्हावें, संस्थानी प्रजेनें आपल्या राजांकडून भांडून तंडून, बंडाळी माजवून, मिळवूं नये, असें वाटतें. त्यांनीं संस्थानिकांच्या जुलमाबद्दल, त्यांच्या बेताल कारभाराबद्दल अनेकवार वृत्तपत्रांतून वा परिषदांतून टीका केली आहे. पण ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं संस्थानिकांच्या नखास धक्का लावावा ही कल्पना मात्र त्यांना अगदीं सहन होत नाहीं. ज्या ज्या वेळीं हिंदी संस्थानिकांवर संकट आलें, त्या त्या वेळीं राष्ट्रीय सभेचे पुढारी त्यांच्या मदतीस धावले आहेत.

न्या. मू. रानड्यांपासूनच्या कॉंग्रेस पुढाऱ्यांची संस्थानाविषयीं अशी भावना आहे कीं, संस्थानें हीं आपल्या पूर्वजांची स्मृतिचिन्हें व गतवैभवाचीं अवशेष चिन्हें आहेत. तीं कांहींहि झालें तरी नष्ट होऊं नयेत. संस्थानिकांच्या दुःस्थितीबद्दलचा उल्लेख १८९३ च्या कॉंग्रेसचे अध्यक्ष दादाभाई नवरोजी यांनीं आपल्या भाषणांत करून त्यांच्याविषयीं आपली सहानुभूति व्यक्त केली. १८९६ सालीं कलकत्ता येथें भरलेल्या अधिवेशनाचे अध्यक्ष ना. महमद रहिमतुल्ला सयानी यांनीं तर असें जाहीर केलें कीं कोणत्याहि देशी संस्थानिकास गैरशिस्त कारभाराबद्दल गादीवरून काढण्य पूर्वी त्या संस्थानिकाच्या गैरवर्तनाची चौकशी लोकांच्या विश्वासास पात्र असलेल्या न्यायासनापुढें केली जावी व गुन्ह्याची चौकशी झाल्यानंतरच मग संस्थानिकास गादीवरून काढून टाकावें ! अशा अर्थाचे संस्थानिकांच्याबद्दल सहानुभूतिपर ठराव राष्ट्रीय सभेंत १८८५ पासून १९१९ पर्यंत मंजूर झाले आहेत.

राष्ट्रीय सभेची—विशेषतः राष्ट्रीय पक्षाची—चळवळ वाढूं लागली, तिचे चटके सरकारला बसूं लागले, तेव्हा त्याला स्वसंरक्षणार्थ संस्थानिकांना जवळ घेण्याची आवश्यकता भासूं लागली. १९१४सालीं सुरू झालेल्या महायुद्धानें संस्थानिकांचें द्रव्य व मनुष्यबळ यांची सरकारला फार गरज लागली. त्यामुळें संस्थानिकांना स्वतःच्या राज्यांत स्वातंत्र्यानें कारभार करण्याची मोकळीक देणें सरकारला भाग पडलें. पण महायुद्धाचा परिणाम म्हणून समता—स्वातंत्र्याचें जें

नवयुग सर्वत्र पसरलें होतें त्याच्या योगानें संस्थानी प्रजेमध्येंहि नवचैतन्य खेळूं लागलें त्यांना आपल्या हक्कांची जाणीव होऊं लागली. संस्थानी प्रजेनें दक्षिणी संस्थान हितसंवर्धक सभा व अखिल भारतीय संस्थानी प्रजा सभा या दोन संस्था स्थापन केल्या. त्यांनी संस्थानी प्रजेला संस्थानच्या कारभारांत जबाबदारी मिळावी, संस्थानिकांनीहि आपल्या छत्राखालीं जबाबदार राज्यपद्धती सुरु करावी, अशी चळवळ सुरू केली; व इकडे राष्ट्रीय सभेलाहि संस्थानी प्रजेशीं तिच्या जिव्हाळ्याच्या संबंधाची जाणीव करुन दिली. नागपूर येथें १९२० सालीं सालेमचे वृद्ध पुढारी श्री. विजयराघवाचार्य यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या राष्ट्रीय सभेत ' राष्ट्रीय सभा सर्व संस्थानाधिपतींना आपल्या संस्थानांत जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याची विनंती करीत आहे,' असा ठराव मंजूर झाला. अशा प्रकारें संस्थानी प्रजेच्या चळवळीमुळें राष्ट्रीय सभेनें संस्थानी प्रजेला संस्थानिकांनीं जबाबदारीचे हक्क द्यावे, अशी शिफारस केली असली तरी म. गांधी वगैरे काँग्रेस पुढाऱ्यांच्या पोटांतील संस्थानिकांविषयींचे ममत्व वारंवार प्रकट होत होतें.

१९२८मध्यें कलकत्ता येथें पं. मोतिलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनांत ' काँग्रेसच्या घटनें ' तील 'संस्थानच्या अंतर्गत कारभारांत राष्ट्रीय सभेनें हात घालूं नये ' हें कलम गाळण्यांत आलें व त्याशिवाय असा स्पष्ट ठराव मंजूर करण्यांत आला कीं, ' संस्थानिकांनीं आपल्या संस्थानांतून प्रातिनिधिक संस्था स्थापून त्या मार्गानें जबाबदार राज्यपद्धति निर्माण करावी व आपल्या प्रजेस नागरिकत्वाचे मौलिक हक्क मिळतील असें लेखन, भाषण व सभास्वातंत्र्य द्यावें; तसेंच संस्थानी प्रजेनें जबाबदार राज्यपद्धति मिळविण्यासाठीं जे प्रयत्न चालविलेले आहेत, त्याबद्दल राष्ट्रीय सभेस सहानुभूति असून ती संस्थानी प्रजेच्या प्रयत्नांत मदत करण्यास तयार आहे !' पुढील वर्षी म्हणजे १९३० सालीं काँग्रेसचे अधिवेशन जवाहरलालजींच्या अध्यक्षतेखालीं झालें. त्यांनीं आपल्या भाषणांत काँग्रेस संस्थानी प्रजेची हेळसांड करणार नाहीं, असें आश्वासन देतांना उद्गार काढले कीं, ' काँग्रेस स्वतःकरितां स्वयंनिर्णयाचे अधिकार मागत आहे, मग ती तोच हक्क संस्थानी प्रजाजनांना मि‍ळूं नये, असें ती कसें म्हणेल ! संस्थानांतील राजकीय सुधारणा व फेरबदल एकदम व घाईघाईनें होऊं नये, म्हणून संस्थानिकांशी

चर्चा करण्याची आमची तयारी आहे. पण कोणत्याहि कारणानें यापुढें संस्थानी मागण्यांकडे दुर्लक्ष करणें शक्य नाहीं.

यानंतरची पुढील दोन वर्षे कायदेभंगाच्या लढ्यांत गेलीं व संस्थानी राजकारणाकडे कॉंग्रेसचें दुर्लक्ष झालें. बरोबरच आहे ! कायदेभंगाच्या गगनभेदी नगाऱ्यापुढें संस्थानी प्रजेच्या टिमकीची काय पर्वा ! पण नंतर वर्तुल परिषदेचा घोष सुरू झाला. ब्रिटिश मुत्सद्यांनीं हिंदुस्थानच्या राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीला भावी राज्यघटनेंत वाव मिळूं नये म्हणून ती फेडरल स्वरूपाची असावी, त्यांत संस्थानिकांनाही स्थान असावें, असा बूट काढला. ती सूचना सर्वांना मान्य झाली. त्यामुळें संस्थानिकांची बडेजाव सर्वांनीं सुरू केली. ब्रिटिश सरकारनें संस्थानी प्रजेस भावी घटनेंत कांहींच हक्क न देऊन संस्थानिकांना मधाचें बोट दाखविलें, तर म. गांधींनीं कॉंग्रेस संस्थानांच्या बाबतींत तटस्थ राहील असें जाहीर केलें. म. गांधींच्या संस्थानी राजकारणाबाबतच्या धोरणाला डॉ. अनसारी यांच्या नेतृत्वाखालीं स्वराज्य पक्षाचें पुनरुज्जीवन होत असतां पाठिंबा देण्यांत आला. त्याचा संस्थानी प्रजेतर्फे श्री. केळकरांनीं निषेध केला. पुढें संस्थांनी प्रजेच्या शिष्टमंडळानें म. गांधींची भेट घेऊन त्यांच्याशीं चर्चा केली. पण म. गांधींनीं शिष्टमंडळाला निराशाजनक उत्तर दिलें. यानंतर १९३४ च्या नोव्हेंबर महिन्यांत मुंबई कॉंग्रेसचे अध्यक्ष बाबू राजेंद्रप्रसाद यांनीं संस्थानीं प्रजेसंबंधीचा १९२८ च्या कलकत्ता कॉंग्रेसचा ठराव व धोरण कायम आहे, असा खुलासा करून संस्थानी प्रजेची निराशा थोडीशी कमी करण्याचा प्रयत्न केला. पण कॉंग्रेसपक्षाचे असेंब्लींतील पुढारी ॲ. भुलाभाई देसाई यांनीं संस्थानिकांना फेडरेशनच्या बाबतींत संस्थानी प्रजेच्या हक्कांवर घाला घालणारा सल्ला दिला व त्यामुळेंच हिंदी राज्यघटनें-तून संस्थानी प्रजा हे शब्द काढून टाकण्यांत आले, अशी बातमी प्रसिद्ध झाली. त्यामुळें संस्थानी प्रजेच्या पुढाऱ्यांत मोठा हलकल्लोळ उठला. त्यांनीं राष्ट्रीय सभेकडे याचा जाब विचारला. तेव्हां १९३५ च्या एप्रिल महिन्यांत ता. २४ व २५ रोजीं जबलपूर येथें भरलेल्या ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या सभेंत असा ठराव मंजूर करण्यात आला कीं संस्थानेतर भागाप्रमाणेंच संस्थानांतील प्रजेच्या हितसंबंधांची काळजी वहाणें हें राष्ट्रीय सभेचें कर्तव्य आहे. आपल्या स्वातंत्र्याकरितां संस्थानी प्रजा जे प्रयत्न व

चळवळ करील, त्यांना राष्ट्रीय सभेचा पाठिंबा राहील. विद्यमान साम्राज्य-शाही बरोबरच हिंदुस्थानांतील भांडवल-शाही, जमीनदारी व संस्थानें हींहि नष्ट करणें अवश्य आहे, असें प्रतिपादन करणारा कॉंग्रेस सोशालिस्ट पक्ष आतां अस्तित्वांत आला आहे. त्याच्या तर्फे संस्थानाचें अस्तित्व नष्ट करावें, असें प्रतिपादणारा ठराव आला असतां तो अध्यक्षांनीं नियमबाह्य ठरविला. श्री. भुलाभाई देसाई यांनीं तर 'संस्थानीं प्रजेवर परकीयांचा अंमल नसून हिंदी राजांचाच अंमल आहे, तेव्हां प्रजाजनांनीं संस्थानिकांशीं गोडी-गुलाबीनें वागूनच जबाबदार राज्यपद्धती मिळवावी.' असें म्हैसूर येथें ता. ११-६-३५ रोजीं बार असोसिएशन पुढें भाषण करितांना जाहीर केलें. गेल्या आक्टोबर महिन्यांत भरलेल्या ऑल इंडिया कॉं. कमिटीच्या सभेंत संस्थानीं प्रजेनेंच आपला लढा लढविला पाहिजे, आम्हाला फक्त नैतिक व मित्रत्वाचा पाठिंबा देतां येईल, असा ठराव मंजूर झाला!

वरील विवेचनावरून संस्थानी राजकारणाबाबत कॉंग्रेसमध्यें ४ पक्ष आहेत ही गोष्ट स्पष्ट दिसते. पहिला पक्ष म. गांधी प्रभृतींचा. यांना संस्थानिक व संस्थानी प्रजा या दोघांचेंहि कल्याण व्हावें, अशी सदिच्छा वाटते. दुसरा पक्ष अॅ. भुलाभाई देसाई-अनसारी प्रभृतींचा. हे संस्थानिकाचे सल्लागार व मित्र असून संस्थानिकाच्या फायद्याकडेच यांची दृष्टी असते. तिसरा पक्ष संस्थानें नष्ट झालीं तरी हरकत नाहीं पण कॉंग्रेसच्या आजच्या दुर्बल परिस्थितींत कॉंग्रेसनें सदर धोरण जाहीर केलें तर संस्थानिक नोकरशाहीच्या बाजूनें आपलें वजन टाकतील, अशी भीति वाटत असल्यामुळें कॉंग्रेसनें तसें म्हणूं नये, असें म्हणणारा. चवथा पक्ष संस्थानें नष्ट करावी म्हणजे हिंदुस्थानांतील सर्व लोकांचे हितसंबंध सारखे होतील असें प्रतिपादणारा! पहिल्या तीन पक्षांमध्यें तात्विक मतभेद असला तरी व्यवहारतः संस्थानी प्रजेच्या दृष्टीनें त्यांचा कांहींच उपयोग नाहीं. भावी घटनेंत संस्थानिक व त्यांचे प्रतिनिधी हिंदी लोकप्रतिनिधींच्या मार्गांत अडथळे आणून कटकटी उत्पन्न करूं लागले कीं मग कॉंग्रेस पुढाऱ्यांना संस्थानिक व संस्थानी प्रजा यांच्या बाबतींतील दुहेरी धोरणाचें वैय्यर्थ्य लक्षांत येईल हें निश्चित.

---

संग्रहालय

( १६ )

# कॉंग्रेस व राष्ट्रीय शिक्षण

देशाची उन्नति त्यांतील लोकांना मिळणाऱ्या शिक्षणावर अवलंबून असल्यामुळें या विषयाकडे कॉंग्रेसचें लक्ष जाण्यास फार वेळ लागला नाहीं. शिक्षणाच्या बाबतींत कॉंग्रेसची सरकारकडे प्रथम एवढीच मागणी होती कीं, सरकारनें शिक्षणावर खर्च दरसाल कमी कमी न करतां तो वाढवीत जावा. त्याकरतां इतर खात्यांमध्यें थोडी काटकसर करावी लागली तरी चालेल. अभ्यासक्रमाचा विचार करतांना देशांतील उद्योगधंद्यांची हीन अवस्था पाहून विद्यार्थ्यांना उद्योगधंद्याचें शिक्षण कसें देतां येईल याचा सरकारनें विचार करावा. या बाबतींतील योजना करण्याकरितां वाटल्यास एखादें कमिशन नेमावें. आईबापांची हलाखीची स्थिति लक्षांत घेऊन शाळेची फी शक्य तेवढी कमी ठेवावी. सरकार शिक्षणांतील सर्व शाखांकडे अंतःकरणपूर्वक लक्ष देत आहे याबद्दल १९०१ साली भरलेल्या कॉंग्रेसनें त्या वेळचे व्हॉइसरॉय लॉर्ड कर्झन यांना दुवा दिला होता. पण लॉर्ड कर्झन यांच्या बाबतींत कॉंग्रेसनें केलेल्या दुसऱ्या अपेक्षा जशा फोल ठरल्या तसें याहि बाबतींत झालें. लॉर्ड कर्झन हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर उतरले तेव्हां कॉंग्रेसनें त्यांना स्वागतपर तार पाठविली. लॉर्ड कर्झन यांनीं उलट तारेनें या स्वागताबद्दल कॉंग्रेसचे अंतःकरणपूर्वक आभार मानले. पण योगायोग असा कीं लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दीचा

शेवट होतांना निषेधाखेरीज काँग्रेसला दुसरा शब्द सांपडला नाहीं. शिक्षणाच्या बाबतींतील लोकांची मागणी लक्षांत घेऊन हिंदुस्थान सरकारनें 'युनिव्हर्सिटीज् कमिशन' नेमलें. आजपर्यंत आपण करीत आलेली कमिशनची मागणी मान्य झाली म्हणून काँग्रेसनें मोठें समाधान व्यक्त केलें. पण कमिशनचा जेव्हां रिपोर्ट बाहेर पडला तेव्हां ' भीक नको पण कुत्रा आवर ' असें काँग्रेसला होऊन गेलें. रिपोर्टांत करण्यांत आलेल्या शिफारशी अमलांत आल्यावर देशांतील शिक्षण प्रसाराचें पाऊल पुढें न पडतां मागें पडेल आणि युनिव्हर्सिट्यांचें स्वातंत्र्य नष्ट होऊन त्या सरकारच्या ताटा खालचीं मांजरें बनतील, असा काँग्रेसला आपला अभिप्राय देणें भाग पडलें.

वंगभंगाच्या चळवळीनें इतर विषयांत क्रांति झाली तशी शिक्षणाच्या बाबतींतहि झाली. १९०६ सालीं कलकत्ता येथें भरलेल्या काँग्रेसच्या संस्मरणीय अधिवेशनांत दादाभाईनीं जी चतुःसूत्री उच्चारली त्यांत राष्ट्रीय शिक्षणाला स्थान मिळालें. स्वराज्य हें साध्य व स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण हीं तें मिळविण्याचीं मुख्य साधनें अशी संगति त्यांनीं जोडून दिली. स्वदेशी–बहिष्काराप्रमाणें राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ प्रथम बंगालमध्येंच सुरू झाली व नंतर ती हळूहळू सर्व देशभर पसरली. कलकत्याच्या काँग्रेसमध्यें शिक्षणाच्या बाबतींत दोन ठराव पास झाले. पैकीं एक पूर्वींच्या परंपरेस अनुसरून सरकारला उद्देशून होता तर दुसरा नवीन वहिवाटीस अनुसरून जनतेला उद्देशून होता. सरकारनें नवीन कायदा करून शिक्षण प्रसारास अडथळा आणला आहे व युनिव्हर्सिट्यांना आपल्या अंकित करून टाकलें आहे याबद्दल निषेध करून देशभर सक्तीचें आणि मोफत प्राथमिक शिक्षण सुरू करावें, दुय्यम शिक्षणाकरितां खर्चाचें प्रमाण वाढवावें, युनिव्हर्सिट्यांवरील सासुरवास कमी करावा आणि धंदेशिक्षणाची सोय करावी, या मागण्या पहिल्या ठरावांत केल्या होत्या. दुसऱ्या ठरावांत असें म्हटलें होतें कीं, वाङ्मयिक, शास्त्रीय आणि औद्योगिक शिक्षणाचा प्रसार करण्याची योजना जनतेनें हातांत घेण्याची वेळ आतां आलेली आहे. हें शिक्षण देशाच्या गरजेस योग्य, राष्ट्रीय धोरणाचें आणि जनतेच्या नियंत्रणाखालीं राहील,

अशा स्वरूपाचें शुद्ध राष्ट्रीय पाहिजे. ( National eduation on National lines and under National control. )

स्वराज्य, स्वदेशी आणि बहिष्कार या ठरावांची भाषा काँग्रेसच्या जुन्या पुढाऱ्यांना जशी पटली नाहीं तशी राष्ट्रीय शिक्षणावरील या ठरावाची भाषाहि त्याना पटली नाहीं. पुढच्याच काँग्रेसमध्यें वर उद्धृत केलेले इंग्रजी शब्द त्यांनीं गाळून टाकले आणि ठरावाला निराळें स्वरूप दिलें. तथापि स्वदेशी-बहिष्काराच्या चळवळी प्रमाणें या चळवळीची लाटहि सर्व देशभर पसरली. बंगालमध्यें नॅशनल एज्युकेशन बोर्ड स्थापन झालें. त्याला सुरत काँग्रेसचे अध्यक्ष डॉ. रासबिहारी घोष यांनीं स्वतःच मोठी देणगी दिली. महाराष्ट्रांत तळेगावचें समर्थ विद्यालय स्थापन झालें. या समर्थ विद्यालयाकरितां टिळकांनीं दौरा काढून बराच पैसा जमविला. पण पुढें सुरू झालेल्या सिडनहॅमशाहीच्या दडपशाहीच्या कुंडांत समितीच्या कायद्याखालीं या संस्थेचा बळी पडला. इतर प्रांतांतील संस्थांवरहि कमी अधिक प्रमाणांत असेच प्रसंग गुदरले. तथापि राष्ट्रीय शिक्षणाचें रुजत पडलेलें बीज अजिबात जळून गेलें नाहीं. दडपशाही-च्या वावटळीनें आणि जनतेच्या औदासिन्याच्या थंडीनें नुकत्याच वाढीस लागलेल्या कांहीं वृक्षांचा पाचोळा गळून पडला व ते वठल्यासारखे दिसूं लागले ही गोष्ट खरी आहे. पण १९२० सालीं असहकारितेचा मुसळधार पाऊस सर्वत्र जोरानें पडूं लागल्याबरोबर जमिनींत जीव धरून राहिलेल्या बीजांना अंकुर फुटले आणि वठलेलीं झाडें नव्या पालवीनें फुलून गेलीं ! सरकारी शिक्षण संस्थांवर बहिष्कार हें गांधींच्या कार्यक्रमांतील एक महत्वाचें कलम होतें. काँग्रेसचा ठराव पास होतांच शाळांतून आणि कॉलेजांतून हजारों विद्यार्थी बाहेर पडले. त्यांची संख्या इतकी होती कीं राष्ट्रीय शाळा स्थापन करून त्यांचें शिक्षण तावडतोब पुढें चालू ठेवणें पुढाऱ्यांना अगदीं अशक्य झालें. विद्यार्थ्यांनीं पुस्तकी शिक्षणांत आपला वेळ न घालवितां खेडोपाडीं हिंडून काँग्रेसचे सभासद वाढवावे, काँग्रेसकरितां द्रव्यनिधि जमवावा, खादीचा प्रसार करावा, मद्यपानापासून अडाणी जनतेला निवृत्त करावें, अशी स्वतः गांधी-जींची आणि दुसऱ्या कांहीं पुढाऱ्यांची इच्छा होती. त्याप्रमाणें शिक्षण-संस्था सोडून बाहेर पडलेले शेकडों विद्यार्थी काँग्रेसचे प्रचारक होऊन खेड्याखेड्यांतून पसरले. त्यांना प्रचारकी शिक्षण देण्याकरितां साबरमती

येथील सत्याग्रहाश्रमाच्या धर्तीवर कांहीं ठिकाणीं आश्रम स्थापन झाले. तथापि ज्यांना पुढें पुस्तकी शिक्षण घ्यावयाचेंच होतें त्याच्या करितां राष्ट्रीय शाळांची आणि विद्यापीठांचीहि हळूहळू व्यवस्था करण्यांत आली. अहमदाबादला गुजराथ विद्यापीठ आणि पुण्याला टिळक महाराष्ट्र विद्यापीठ स्थापन झालें. मुंबईला नॅशनल मेडिकल कॉलेज निघालें. इतर प्रांतांतून देखील राष्ट्रीय शिक्षणाकरितां अशाच स्वरूपाची संघटणा झाली. वंगभंगाच्या चळवळीपेक्षां असहकारितेच्या काळांत राष्ट्रीय शिक्षणाचा बोलबाला कितीतरी पटीनीं अधिक झाला हें मान्य केलें पाहिजे.

पण असहकारितेचा जोर कमी होऊं लागतांच राष्ट्रीय शिक्षणाच्या कार्यालाही हळूहळू उतरती कळा लागली. १५ वर्षांनंतर आज फारच थोड्या राष्ट्रीय शिक्षण संस्था अस्तित्वांत असलेल्या दिसतात. आठ दहा वर्षें पर्यंत ज्या थोड्या संस्था जीव धरून राहिल्या होत्या त्यांची कायदेभंगाच्या युद्धांत आहुती पडली. जवळजवळ सर्व संस्था सरकारनें बेकायदेशीर ठरवून त्यांची मालमत्ता जप्त करून टाकली. अनेक कारणांमुळें अशा संस्था पुनः सुरू करणें आज कठीण झाले आहे.

राष्ट्रीय शिक्षण अयशस्वी होण्याचीं अनेक कारणें आहेत. विद्यार्थ्यांचा आणि द्रव्याचा तुटवडा हें कारण मुख्य असलें तरी जनतेला या चळवळी विषयीं खरोखरच आस्था असती तर या दोन्ही गोष्टींचा पुरवठा होणें अशक्य नव्हते. अभ्यासक्रम आणि शाळा यांची आधीं व्यवस्था करून नंतर विद्यार्थ्यांना बाहेर बोलावण्यांत आलें असतें तर त्यांची गैरसोय झाली नसती. राष्ट्रीय प्रचाराला देखील लायकी पाहिजे असते. वाटेल तो मनुष्य हें काम करूं शकेल असें नाहीं; प्रचाराची लायकी नाही व राष्ट्रीय शिक्षणाची पाहिजे तशी व्यवस्था नाहीं. मग उगीच स्वस्थ बसण्यापेक्षा पूर्वीच्या सरकारी संस्थांतूनच गेलेलें काय वाईट, असले विचार पालकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या डोक्यांत सुरू झाले आणि बाहेर पडलेले बरेचसे विद्यार्थी पुन्हां परत गेले. याबद्दल कॉंग्रेसला अर्थातच दोष देतां येणार नाहीं. परतंत्र देशांत होणाऱ्या राष्ट्रीय चळवळी या भावनेच्या विशिष्ट अवस्थेतच होत असल्यामुळें तडकाफडकी

आणि आकस्मिक होतात. आगाऊ सर्व प्रकारची व्यवस्था करून नंतर हळूहळू त्या चळवळींना हात घालणें जवळजवळ अशक्य असतें. आणि आगाऊ व्यवस्था केली असती तरी देखील या संस्था अधिक वेळ जगल्या असत्या किंवा नाहीं याचा संशयच आहे. सत्तेच्या जोरावर जमविलेले कोट्यवधि रुपये दरसाल खर्च करूनहि सरकारला शिक्षणाचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडवितां आला नाहीं. बेकारी नष्ट करण्याकरितां किंवा देशांतील उद्योगधंद्यांना ऊर्जितावस्था आणण्याकरितां धंदेशिक्षणाची सोय करा, असें सरकारला सांगितलें म्हणजे सरकार आपल्या रिकाम्या तिजोरीकडे बोट दाखवितें. जेथें सरकारची ही दशा तेथें खाजगी संस्थांचा पाड काय? करांच्या रूपानें सरकारला पैसा द्यावा लागतो आणि शिवाय राष्ट्रीय कार्याकरितांही पैसा द्यावयाचा म्हणजे लोक अगदीं जिकीरीला येतात. विशिष्ट वेळीं भावनेनें उत्पन्न झालेला उत्साह फार वेळ टिकत नाहीं. दुबार करांचें ओझें सहन करणें अशक्य होऊन जातें. दुसरें असें कीं खाजगी शिक्षणाला सरकारची मान्यता नसल्यामुळें आपल्या मुलांना तिकडे घालण्यास आईबाप काकूं करतात. देशांतील शिक्षण जनतेच्या नियंत्रणाखालीं ( Under National Control ) असावें हा राष्ट्रीय शिक्षणाच्या कल्पनेतील महत्वाचा भाग अन्य रीतीनें पूर्ण होत आहे अशीही कांहीं लोकांची कल्पना होऊं लागली. मॉँटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांखालीं शिक्षणखातें लोकनियुक्त दिवाणाकडे सोंपविण्यांत आलें. पैशाच्या अभावीं या दिवाणांना गेल्या १५ वर्षांत विशेष कामगिरी करून दाखवितां आली नाहीं तरी खाजगी शिक्षणसंस्था काढण्यापेक्षां सरकारी यंत्रच आपल्या ताब्यांत घ्यावे व आपला हेतु सिद्धीस न्यावा या विचारसरणीची पक्कड कांहीं लोकांच्या बाबतींत तरी कमी झाली नाहीं. वाढत्या राजकीय हक्कांबरोबर शिक्षण खात्यावरील जनतेचा ताबाहि वाढत रहाणार आणि मगच शिक्षणाचा प्रश्न सुटला तर सुटेल अशी पुष्कळांना आशा आहे.

असहकारितेच्या वावटळींत उत्पन्न झालेल्या राष्ट्रीय शिक्षण संस्थांपैकीं आज फारच थोड्या संस्था अस्तित्वांत असल्या तरी आपल्या हयातींत आणि हयातीनंतरहि त्यांनीं केलेली कामगिरी विसरतां येणार नाहीं. गेल्या

१५ वर्षांत ज्या ज्या राष्ट्रीय चळवळी झाल्या त्या त्यां मध्यें राष्ट्रीय शाळांतील शिक्षक आणि विद्यार्थी आघाडीवर होते हें लक्षांत ठेविलें पाहिजे. चरका संघ असो, हरिजन संघ असो, किंवा ग्रामोद्योग संघ असो, या प्रत्येकांमध्यें राष्ट्रीय शाळांतील माणसांनीं अहमहमिकेनें भाग घेतलेला आहे. मातृभूमीची हांक कानावर पडतांच अर्ध्या क्षणाच्या आंत बद्धपरिकर होऊन आघाडीवर उभे राहणारे शेंकडो कार्यकर्ते राष्ट्रीय शिक्षणानें पुरवले हें यश काय थोडें झालें? कांहीं शिक्षण संस्थांनीं सरकारी शिक्षणांतील दोष प्रत्यक्ष दाखवून सरकारला एक प्रकारें साहाय्यच केलें आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

REFBK-0005246

दा. क्र. ५२४६

# मौज ऑफिसांत विकत मिळणारीं पुस्तकें

## कादंबऱ्या

१ रूढीच्या वणव्यांत कि. १॥
२ बहकलेली तरुणी ,, १॥ ,,
३ रंगेल राजकुमार ,, १ ,,
४ सतींचा हंबरडा ,, १ ,,
५ भस्मासूर ,, १ ,,
६ गोड गोखले भाग १ ,, १॥ ,,
७ गोड गोखले भाग २ ,, १॥ ,,
८ कुलदैवत ,, १॥ ,,
९ कलंकशोभा ,, २ ,,
१० मरण कीं लग्न ,, १॥ ,,

## नाटकें

११ सोन्याचा कळस कि. १ रु.
१२ गोकुळचा चोर कि. १२ आ.
१३ वीर सौभद्र कि. १ रु.
१४ लग्नसोहळा कि. १० आ.
१५ गैरसमज कि. १ रु.
१६ सावकार कि. ८ आ.

## दोन तासांच्या नाटिका.

१७ संभावित कि. ४ आ.
१८ योगायोग ,, ४ ,,
१९ बुवा ,, ६ ,,
२० कॉलेज कुमारी ,, ६ ,,
२१ सैरंध्री ,, ६ ,,

## शास्त्रीय

२२ प्रेमाच्या कानगोष्टी कि. २ रु.
२३ प्रेम कीं स्वैराचार ,, ४ आ.
२४ हिंदु धर्मशास्त्र विचार ,, २॥ रु.

## ज्योतिषविषयक

२५ संख्याशास्त्र कि. १ रु
२६ दैवदर्पण ,, २ ,,

## किरकोळ

२७ मुलांचा भक्तिमार्ग कि. ८ आ,
२८ काश्मीर प्रवास वर्णन ,, ८ आ.
२९ लोकमान्य चरित्र ,, १२ आ.
Psychology of Cotton
कि. २ रु

## मौज प्रिंटिंग ब्युरो,

खटाववाडी, गिरगांव, मुंबई.